couchpuffy
THE BIG MONSOON SALE
FLAT 50% OFF
ON DISPLAY / LAST PIECE
BUY 1 GET 1 FREE On Home Decor
B5, ड्रिम्सलँड, राजापेठ रोड, अमरावती | 99300-94691 8585-9552-85

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
✦ अमरावती, शुक्रवार ७ ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

पूनम इलेक्ट्रॉनिक्स & फर्निचर
फ्रीज, इन्व्हर्टर, मिक्सर, ओव्हन, टीव्ही, फ्रीज, वॉशिंग मशिन, अलमारी, सोफा, बेड
COMPANY DEALER SAMSUNG Godrej Panasonic
ALSO AVAILABLE LG Haier INTEX realme
मोती नगर, अमरावती. 0721-2540397 | 99216-02386

## जेन झी अधिक प्रामाणिक- मोहन भागवत

**मुंबई/प्रतिनिधी :**आरएसएस प्रमुख मोहन भागवत म्हणतात की, जेन-झी आणि जेन-अल्फा या जुन्या पीढीपेक्षा अधिक देशभक्त आणि प्रामाणिक आहेत. ते म्हणाले, आपण त्यांचे ऐकले पाहिजे. त्यांच्याशी संवादाचा अभाव होता, म्हणूनच दिल्लीतील जंतर मंतरवर आंदोलन झाले. मुंबईतील नीता मुकेश अंबानी सांस्कृतिक केंद्रात आयोजित एका कार्यक्रमात भागवत बोलत होते. इंटरनॅशनल मूव्हमेंट टू युनाईट नेशन्स (आयआयएमयूएन) आपल्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त याचे आयोजन करत आहे. नीट पेपरफुटीविरोधात देशभरात झालेल्या आंदोलनानंतर आरएसएसचा तरु णांसोबतचा हा सर्वात महत्त्वाचा संवाद मानला जात आहे. जंतर मंतरवरील ३६ दिवसांच्या आंदोलनानंतर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा देण्यास भाग पडले. मोहन भागवत यांनी दिल्लीत २० जुलै रोजी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या ४ दिवसांनंतर म्हटले होते की, आजची नवीन पीढी अनेक प्रश्न विचारते. आपण त्यांना आदेश देण्याऐवजी त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे. आपण मनमानी करू, शक्तीने सर्वांचे मालक बनू, असे होउ शकत नाही. त्यांचे हे विधान अशा वेळी आले आहे, जेव्हा देशात पेपरफुटीच्या मुद्द्यावरून विद्यार्थी जंतर-मंतरवर आंदोलन करत होते. त्यांच्या विधानानंतर १२ तासांनी शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा दिला होता.



**सरकारच्या चुकीवर:** जेव्हा संवाद अयशस्वी होतो तेव्हा आंदोलन होते. जर सरकारने आधीच संवाद साधला असता, तर आंदोलनाची गरजच भासली नसती. आंदोलन हा देखील संवादाचाच एक प्रकार आहे.

**जेन-झीच्या विचारसरणीबद्दल:** जेव्हा आम्ही जेन-झी होतो, तेव्हा आमचे वडीलधारी जे काही सांगायचे ते आम्ही स्वीकारायचो आणि त्यावर प्रश्न विचारत नव्हतो. आजची जेन-झी प्रश्न विचारते. त्यांना उत्तरे आणि प्रेम हवे आहे.

**जेन-झीच्या हक्कांविषयी:** आम्ही असे म्हणणार नाही की जेन-झीने आंदोलन करू नये. संविधानात आंदोलनांना परवानगी आहे असे म्हटले आहे, पण ते कसे करायचे याचा आपण विचार केला पाहिजे.

**जेन-झीच्या आंदोलनांविषयी:** आपण याचाही विचार करायला हवा की, जर जेन-झी ओरडत असेल, तर ते केवळ त्यांना काहीतरी समस्या आहे म्हणूनच ओरडत आहेत. ही आंदोलने आमच्या किंवा तुमच्या विरोधात नसावीत, तर व्यवस्थेतील सुधारणांसाठी असावीत.

**जेन-झी देशद्रोही असल्याच्या आरोपाबद्दल:** जर जेन-झी आंदोलन करत असेल, तर ते तसे नाहीत. ते आपलेच लोक आहेत, आपली पुढची पिढी आहे. आपले त्यांच्याशी नाते आहे. त्यांनी आपला दृष्टिकोन समजून घेतला पाहिजे आणि आपण त्यांचा.

**जंतर मंतर येथील लाठीचार्जबद्दल:** ते का आणि कोणत्या कारणासाठी झाले हे आपण समजून घेतले पाहिजे. आपल्याला हे पाहावे लागेल आणि समस्या नेमकी कुठे आहे हे ठरवावे लागेल. मी सुद्धा हे वाचल्यानंतरच बातमी देत आहे. मी वर्तमानपत्रात वाचले की यात काही दंगलखोर सामील होते. जर मला ऋद्ध-इ वर आंधळेपणाने विश्वास ठेवायचा असेल, तर मी त्यांच्यावर विश्वास ठेवू शकेन.

**शैक्षणिक संस्थांच्या दुर्दशेवर:** शिक्षण हा काही व्यावसायिक धंदा नाही. त्यासाठी सुलभ पायाभूत सुविधा असायला हव्यात. सरकारने संपूर्ण शिक्षण व्यवस्था चालवावी असे कोणीही म्हटलेले नाही. आपल्यालाही सहकार्य करण्याची गरज आहे. तरच सुधारणा होईल. अभ्यासक्रमावर नंतर चर्चा व्हायला हवी.

## गोविंदांना 10 लाखांचे विमा संरक्षण



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** ढाक्कूमाक्कूमच्या तालावर दहीहंडीच्या थरारात मानवी मनोरे रचणा-या गोविंदांना विम्याचे कवच देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. त्यानुसार दहीहंडी उत्सवात सहभागी होणा-या राज्यातील १ लाख ६० हजार गोविंदांना अपघात काढण्यात येणार असून यामध्ये मानवी मनोरे रचताना अपघाती मृत्यू झाल्यास किंवा कायमस्वरूपी पूर्ण अपंगत्व आल्यास १० लाख रुपयांची भरपाई मिळणार आहे. याशिवाय अपघातग्रस्त गोविंदांच्या उपचारासाठी एक लाख रुपयांपर्यंतचा खर्चही शासन उचलणार आहे. यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

दहीहंडी उत्सवात मानवी मनोरे उभारण्याच्या खेळास साहसी क्रिडा प्रकाराचा दर्जा देण्यात आला आहे. मात्र, दहीहंडी उत्सवादरम्यान अपघातग्रस्त होणा-या गोविंदांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व शासकीय, निमशासकीय रुग्णालयांमध्ये मोफत उपचार करण्याचा निर्णय राज्य सरकारने यापूर्वीच घेतला आहे. त्यानुसार गेल्यावर्षी १ लाख ५० हजार गोविंदांना विम्याचे संरक्षण दिले होते. परंतु, उत्सवाची लोकप्रियता व गोविंदांची वाढती संख्या विचारात घेता, यावर्षी ➪(पान २ वर)

VIDARBHA YOUTH WELFARE SOCIETY'S
PROF RAM MEGHE COLLEGE OF ENGINEERING AND MANAGEMENT
ESTD.2009
NEW EXPRESS HIGHWAY, BADNERA, AMRAVATI
ACCREDITED WITH GRADE A+ CYCLE II
(An Autonomous Institute)
DTE CODE 1128 | www.prmceam.ac.in
| B.Tech | M.Tech | MBA | Ph.D. |
ADMISSION (2026-27)

| CHOICE CODE | BRANCH |
|---|---|
| 112819110 | Civil Engineering |
| 112824210 | Computer Science & Engineering |
| 112824610 | Information Technology |
| 112891210 | Computer Science & Engg. (Data Science) |
| 112829310 | Electrical Engineering |
| 112837210 | Electronics & Telecommunication Engg. |
| 0112810110 | Master of Business Administration (MBA) |

Excellence in Education , Excellence in Placements
Total Placed 400+ | Total Offers 700+ | Heighest Package 9 Lac | Average Package 3.5 Lac | Total Companies Visited for Campus Placement 78 | Total Internships 1000+
tcs | Deloitte. | aws | Google | SIEMENS
JUNIPER NETWORKS | zscaler | paloalto | MICROCHIP | Haier
CONTACT US
9860454899, 8087275248, 7875355888, 9975539499

## आता शेणापासूनही होणार बंपर कमाई ! 'गोबरधन' योजनेला मोदी सरकारची मंजुरी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशात बायोगॅस उत्पादनाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आणि शेतक-यांचे उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने एका नवीन योजनेला मंजुरी दिली आहे. या योजनेचे नाव आहे 'गोबर्धन' योजना. केंद्रीय मंत्रिमंडळाने गुरुवारी या योजनेला मंजुरी दिली. या योजनेसाठी अंदाजे २३७३१ कोटी रुपये एवढा खर्च अपेक्षित आहे. सरकारने काही महत्त्वाचे निर्णयही घेतले आहेत.



माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही योजना २०२६-२७ ते २०३५-३६ या १० वर्षांच्या कालावधीसाठी लागू असेल. प्राण्यांचे शेण, पिकांचे अवशेष, साखरेची खोई आणि शहरातील सेंद्रिय कच-यापासून 'कंप्रेस्ड बायोगॅस' आणि सेंद्रिय खत तयार केले जाईल. कच-याचे योग्य व्यवस्थापन होउन शेतक-यांना शेण व कृषी कच-यातून अतिरिक्त कमाईचा नवा मार्ग उपलब्ध होईल. यासंदर्भात, सरकार बायोगॅस निर्मितीसाठी भांडवली मदत करेल, तसेच, कर्ज सुविधा, पाइपलाइन नेटवर्क आणि योग्य दर निश्चितीचे धोरण राबवेल.

**आसाममध्ये ८९७० कोटींचा प्रोजेक्ट** -महतवाचे म्हणजे, 'गोबरधन' ➪(पान २ वर)


### विरोधक आक्रमक, कामकाज तहकूब

***नवी दिल्ली*** : देशभरात आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवरील पोलिस कारवाईसह विविध मुद्यांवर सरकारने उत्तर द्यावे, त्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सभागृहात यावे, अशी मागणी करत विरोधकांनी आपला आक्रमक पवित्रा कायम ठेवला आहे. त्यामुळे सरकारची कोंडी झाली आहे. संसदेचे कामकाज सुरू होताच विरोधकांनी आजही आक्रमक भूमिका घेतली. त्यामुळे गुरुवारी लोकसभेचे आणि राज्यसभेचेही कामकाज तहकूब करावे लागले. कामकाजाच्या सुरुवातीला हिरोशिमा आणि नागासाकीवरील अणुब?म्ब हल्ल्यांच्या स्मृतिदिनानिमित्त सभागृहात त्या हल्ल्यांतील मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सर्व सदस्यांनी दोन मिनिटे मौन पाळून त्यांना आदरांजली अर्पण केली. त्यानंतर विरोधी पक्षाच्या खासदारांनी २० जुलै रोजी विद्यार्थी आंदोलकांवर झालेल्या पोलिस कारवाईच्या मुद्यावरून घोषणाबाजी सुरू केली आणि केंद्रीय गृहमंत्री ➪(पान २ वर)



## संप तातडीने मागे घ्या

### डॉक्टरांच्या संपावर हायकोर्टाने सुनावले खडे बोल



**मुंबई/ प्रतिनिधी-**महाराष्ट्रातील निवासी डॉक्टरांच्या सुरू असलेल्या संपावर मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी कठोर भूमिका घेतली. रुग्णसेवा विस्कळीत होत असल्याबद्दल गंभीर चिंता व्यक्त करत न्यायालयाने डॉक्टरांना तातडीने संप मागे घेण्याचे निर्देश दिले. तसेच, संप मागे घेतल्यास आम्ही तुमची बाजू लवकरात लवकर ऐकून घेउ, असे स्पष्ट आश्वासनही न्यायालयाने दिले. सुनावणीदरम्यान न्यायालयाने डॉक्टरांच्या आंदोलनावर अनेक कठोर प्रश्न उपस्थित केले. न्यायालयाने विचारले की, डॉक्टरांनी संप करणे योग्य आहे का? उपचार करण्यास नकार देणे ही वैद्यकीय व्यवसायाच्या मूलभूत तत्त्वांशी सुसंगत बाब आहे का? तसेच रुग्णांना सेवा न देणे योग्य वाटते का, असा सवालही न्यायालयाने उपस्थित केला.न्यायालयाने टअफउच्या वकिलांना स्पष्ट शब्दांत सांगितले की, आम्ही तुमची बाजू ऐकून घेण्यास तयार आहोत. मात्र त्यासाठी सर्वप्रथम संप तातडीने मागे घेणे आवश्यक आहे. संप मागे घेतल्यानंतर तुमच्या मागण्यांवर शक्य तितक्या लवकर सुनावणी घेतली जाईल.

**रुग्णांना मोठा फटका-** राज्यातील निवासी डॉक्टरांच्या संपामुळे अनेक सरकारी वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांमधील बाह्य रुग्ण विभाग , नियोजित शस्त्रक्रिया आणि इतर वैद्यकीय सेवा प्रभावित झाल्या आहेत.

SIPNA COLLEGE OF ENGINEERING & TECHNOLOGY, AMRAVATI
An Autonomous Institution
•Recognized by AICTE, New Delhi. • Approved by DTE, MS, Mumbai.• Affiliated to SGBAU, Amravati.
Our Mission Quality Education
A+ NAAC
DTE CODE : 1114
Courses Offered
B.Tech. (Bachelor of Technology)
Four Years Full Time UG Degree Programs (8 Semesters)

| Branches | Intake |
|---|---|
| Computer Science & Engineering | 180 |
| Electronics & Telecommunication Engineering | 120 |
| Information Technology | 120 |
| Civil Engineering | 120 |
| Mechanical Engineering | 60 |
| Artificial Intelligence (AI) and Data Science | 120 |

M.Tech. (Master of Technology)
Two Years Full Time PG Degree Programs (4 Semesters)

| Branches | Intake |
|---|---|
| Computer Science & Engineering | 24 |
| Information Technology | 18 |
| Electronics & Telecommunication Engineering | 18 |
| Civil-Structural Engineering | 18 |
| Mechanical Engineering (Computer Integrated Manufacturing) | 18 |

University Approved Ph.D. Research Centres
• Electronics & Telecommunication Engg.
• Mechanical Engineering
• Computer Science & Engineering
• Information Technology
• Mathematics •Physics •Chemistry
MBA (Master of Business Administration)120
Sipna School of Planning & Architecture, Amravati
B.Arch.(Bachelor of Architecture) Intake : 40
Sipna Junior College, Amravati
Science Stream
Intake : 100 (General Science : 50, Bi-focal : 50)
250+ Placement Opportunities
150+ Companies Association
700+ Internships
Highlights
• Established in the year 1999.
• Recognized under Section 12(B) & 2(f) of UGC Act.
• Accredited by NBA, New Delhi: All eligible UG Engineering Programs
• Accredited by NAAC, Bangalore with 'A+'Grade.
• A 'Mentee Institute' of COEP Technological University, Pune.
• Highest percentage of placement in the region in most renowned companies every year.
• ISO Certification-9001:2015 and 14001:2015
• Accredited by International Accreditation Organization (IAO)
• Vidharbha's First Remote Pilot Training Organisation (RPTO).Authorised by DGCA, Govt. Of India
• Recipient of IETE-Shri. P. P. Malhotra Award - Year 2019
• Girls Hostel with all amenities - 440 seats. (100 for 1st Year)
tcs Capgemini wipro accenture Tech Mahindra Infosys Justdial TRITHA HCLTech Deloitte. coditas KPIT JABIL
Opp. to Nemani Godown, Badnera Road, Amravati – 444701 (M.S.)
Visit: www.sipnaengg.ac.in

सबसे सस्ते 3 दिन
दि. 06 07 08 ऑगस्ट
गुरूवार | शुक्रवार | शनिवार
लग भग आधी किमतें
फ्रेश स्टॉक
डायरेक्ट फॅक्टरी सेल
आराधना®
होलसेल शॉपिंग मॉल
• बनारसी शालू • डिझायनर साड्या • घागरा ओढनी • सलवार सुट
• ड्रेस मटेरियल • रेडीमेड कोट • सुटिंग-शर्टिंग • टिनेज वेअर • किड्स वेअर
जवाहर रोड, अमरावती. ✆2574594
L -2, बिझीलॅन्ड, नांदगावपेठ, अमरावती.
ad square

# नांदगावतील शेकडो शेतकी धडकले जिल्हाधिकारी कार्यालयावर

## नुकसान भरपाईसाठी विशेष पॅकेज देण्याची मागणी



**नांदगाव खांडेश्वर/ प्रतिनिधीः-** ३० जुलैला नांदगाव तालुक्यात ढगफुटी सदृश्य झालेल्या मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे पिके वाहून गेली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याचे नुकसान झाले तसेच अनेक नागरिकांचे घरात पुराचे पाणी शिरल्याने घरे पडली. घरातील जीवनावश्यक वस्तू वाहून गेल्या. त्यामुळे अनेक कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. तालुक्यात काही तासातच २९६ मिलि पाऊस होऊन पावसाने कहर केला असल्याने नांदगाव तालुक्याला तुटपुंजी मदत न देता तालुक्यासाठी विशेष मदतीचे पॅकेज देण्यात यावे या मागणी संदर्भात शिवसेना उभाठा चे समन्वयक तथा न.पं. चे गटनेते प्रकाश मारोटकर यांचे नेतृत्वात शेकडो शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देऊन मागणीचे निवेदन सादर केले.

३० जुलै रोजी नांदगाव तालुक्यात पावसाने कहर केला असून काही तासातच २९६ मिलि पाऊस झाला. त्यामुळे शेतकऱ्याचे शेतात तलाव सदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. तेव्हा अनेक शेतातील पिके खरडून गेली व शेतजमिनी सुद्धा खरडून गेल्या. सोयाबीन, कापूस, तूर ,फळपिके ,भाजीपाला इत्यादी पिके पावसामुळे गाळात दबली. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादन होण्याची शक्यता मावळली आहे तसेच नांदगाव शहरासह तालुक्यातील मंगरूळ चव्हाळा, धामक , धानोरा ,शिक्रा, शिवनी, हरणी इत्यादी गावातील शेकडो नागरिकांच्या घरात पाणी गेल्याने घरातील संपूर्ण अन्नधान्य कपडे भांडे विद्यार्थ्यांचे पुस्तके वाहून गेली व खराब झाली. त्यामुळे अनेकांचे संसार उघड्यावर आले असून दुसरीकडे अनेक शेतातील शेती उपयोगी साहित्य स्प्रिंकलर पाईप टिन पत्रे ताराचे कुंपण वाहून गेले. बांधलेल्या विहिरी सुद्धा खचल्या. काही ठिकाणी कृषी पंपाचे इलेक्ट्रिक पोल सुद्धा पडले. शेतकऱ्यांच्या कांदा चाळ मधील कांदा खराब झाला असून अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील जनावरे सुद्धा वाहून गेल्याने शेतकऱ्यावर मोठे संकट कोसळले. तेव्हा शासनाने तुटपुंजी मदत न करता तालुक्याला नुकसान भरपाईसाठी विशेष पॅकेज देण्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली.

यावेळी शिवसेना उबाठा चे प्रकाश मारोटकर, बाळासाहेब राणे ,सुनील गुरमुळे ,वासुदेव लोखंडे ,गुणवंत चांदूरकर, रमेश मांडवगडे ,प्रकाश भ्रमणवाडे ,सुनील ब्राह्मणवाडे ,गजानन मारोटकर, लोकेश उटबगले ,रवि ठाकूर ,दामोधर ब्रह्मणवादे ,बाळा सुने ,बाबराव राऊत, विजय सुने ,वाल्मिक दहातोंडे ,सुरेंद्र गावफळे ,नितीन दुधे ,शंकर मांडवगडे ,विजय पेटले ,पंकज पिंपळकर, संतोष सुर्जुसे ,गजानन गंधे ,अक्षय राणे ,किशोर मुंजेवार ,मो सादिक, पांडुरंग राठोड, नरेश महल्ले ,मनोज ढोके ,भावेश भांबुरकर उपस्थित होते.

# रिपाइं विदर्भ पदाधिकारी व कार्यकर्ता बैठक २० ऑगस्ट रोजी

## केंद्रीय मंत्री रामदास आठवले करणार मार्गदर्शन

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट)च्या विदर्भ विभागातील संघटनात्मक बळकटीसाठी २० ऑगस्ट रोजी एकदिवसीय विभागीय पदाधिकारी व कार्यकर्ता बैठक आयोजित करण्यात आली आहे. राधा मंगल कलर्स (स्काय हॉटेल) कॉटन मार्केट यवतमाळ येथे दुपारी १.०० वाजता होणाऱ्या या बैठकीला पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

विदर्भ हा आंबेडकरी चळवळीचा केंद्रबिंदू असूनही पक्ष संघटना अपेक्षित प्रमाणात मजबूत झालेली नाही. ही उणीव दूर करून कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करणे, संघटन विस्ताराला गती देणे आणि पक्षाची ताकद वाढविणे हा बैठकीचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

बैठकीस माजी मंत्री अविनाश महातेकर, प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरोदे, प्रदेश सरचिटणीस गौतम सोनवणे, बाबुराव कदम, पश्चिम विदर्भ अध्यक्ष मोहन भोयर, पूर्व विदर्भ अध्यक्ष विजय आगलावे, विदर्भ प्रवक्ता राजा वाघमारे, सुधाकर तायडे यांच्यासह पक्षाचे विविध पदाधिकारी मार्गदर्शन करणार आहेत. तसेच विभागीय अध्यक्ष, विभागीय चिटणीस, कार्याध्यक्ष, सर्व जिल्हाध्यक्ष, जिल्हा सरचिटणीस आणि विदर्भातील प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.बैठकीत १५ ऑगस्ट ते १० नोव्हेंबर दरम्यान आयोजित करण्यात येणाऱ्या भीमाई स्मारक (सातारा) ते पुणे सामाजिक समता मार्चच्या नियोजनासह महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त आयोजित उपक्रम, विदर्भातील पक्ष संघटन बळकटीकरण आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणनीती या विषयांवर सविस्तर चर्चा होणार आहे. या बैठकीच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा महासचिव गोविंद मेश्राम, जिल्हा प्रवक्ता नवनीत महाजन तसेच भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष धम्मपाल माने हे नियोजनाची जबाबदारी सांभाळत आहेत. ही माहिती रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट)चे जिल्हाध्यक्ष महेंद्र मानकर यांनी दिली.

# १ व १० वरिल उर्वरित

## गोविंदांना १० लाखांचे विमा

(२०२६ मध्ये) राज्यातील १ लाख ६० हजार गोविंदांना विमा संरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विमा कंपनीची निवड करण्याची जबाबदारी क्रीडा व युवक सेवा आयुक्तांकडे देण्यात आली असून त्यासाठी आवश्यक निधी शासनाकडून उपलब्ध करून दिला जाणार आहे. शासन निर्णयानुसार, अपघाती मृत्यू झाल्यास किंवा दोन्ही अवयव अथवा दोन्ही डोळे गमावल्यास संबंधित गोविंदाच्या वारसांना १० लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळेल. एका हाताचा, एका पायाचा किंवा एका डोळ्याचा अपघातात नुकसान झाल्यास ५ लाख रुपये, तर कायमस्वरूपी पूर्ण अपंगत्व आल्यास १० लाख रुपये विमा संरक्षण दिले जाईल. कायमस्वरूपी अंशतः अपंगत्वाच्या बाबतीत विमा प?लिसीतील तरतुदीनुसार भरपाई केली जाईल. तसेच अपघातामुळे रुग्णालयात उपचार करावे लागल्यास एक लाख रुपयांपर्यंतचा वैद्यकीय खर्च विमा योजनेतून देण्यात येणार आहे.

**गोविंदांना करावी लागणार नोंदणी-** महाराष्ट्र राज्य गोविंदा असोसिएशनकडे सराव व दहीहंडी उत्सवात सहभागी होणा-या गोविंदांची नोंदणी, वयाची पडताळणी आणि आवश्यक माहिती संकलित करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यानंतरच पात्र गोविंदांचा विमा उतरविण्यात येणार आहे.

**विमा संरक्षणाची रूपरेषा**

अपघाती मृत्यू - १० लाख रूपये
दोन्ही अवयव किंवा दोन्ही डोळे गमावल्यास : १० लाख रूपये
एक हात, एक पाय किंवा एक डोळा गमावल्यास : ५ लाख रूपये
कायमस्वरूपी पूर्ण अपंगत्व : १० लाख रूपये
कायमस्वरूपी अंशतः अपंगत्व : विमा प?लिसीनुसार भरपाई
उपचारासाठी रुग्णालयीन खर्च : कमाल १ लाख रूपये

## आता शेणापासूनही होणार

योजनेशिवाय, केंद्रीय मंत्रिमंडळाने आसाममधील राष्ट्रीय महामार्ग-१५ वर १३५.८७ किलोमीटर लांबीच्या गुवाहाटी-तेजपूर ४-लेन कॉरिडॉरच्या विकासासाठी ८,९७०.२० कोटी रुपयांच्या प्रस्तावालाही मंजुरी दिली. या प्रोजेक्टमध्ये ५ प्रमुख बायपास, १५ मोठे पूल आणि १९ फ्लायओव्हरचा समावेश असेल. महत्त्वाचे म्हणजे तेजपूर बायपासवर ४.९ किमी लांबीची इमर्जन्सी लँडिंग फॅसिलिटी तयार केली जाणार आहे. जिचा वापर भारतीय हवाई दल आणीबाणीच्या प्रसंगी विमाने उतरवण्यासाठीही करू शकेल. विशे, म्हणजे, या महामार्गामुळे प्रवासाचा वेळ तब्बल ५० टक्क्यांनी कमी होईल.

## विरोधक आक्रमक, कामकाज

अमित शहा यांनी सभागृहात उपस्थित राहावे, अशी मागणी केली. काही सदस्यांच्या हातात फलकही दिसून आले. गदारोळ सुरूच राहिल्यानंतर ओम बिर्ला यांनी सदस्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र विरोधकांनी आक्रमक भूमिका कायम ठेवली आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सभागृहात उपस्थित राहावे, अशी मागणी लावून धरली. गदारोळ कायम राहिल्याने लोकसभेचे कामकाज तहकूब करण्यात आले. राज्यसभेतही तसाच गदारोळ सुरू राहिला. त्यामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाज तहकूव करावे लागले.**सहा विधेयके मंजूर-** यापैकी सार्वजनिक परीक्षा (अनुचित मार्गांचा प्रतिबंध) सुधारणा विधेयक, २०२६, राष्ट्रीय सन्मानाचा अवमान प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, २०२६, जन्म आणि मृत्यू नोंदणी (सुधारणा) विधेयक, २०२६ आणि सर्वोच्च न्यायालय न्यायाधीश (न्यायाधीशांची संख्या) सुधारणा विधेयक, २०२६ या चार विधेयकांना राज्यसभेचीही मंजुरी मिळाली आहे.

## जि.प. शिक्षक बदली घोटाळा

महिन्यांपासून माहिती अधिकार, शासकीय अभिलेख, आरोग्य विभागाचे दस्तऐवज आणि कायदेशीर नोटिसांच्या आधारे सुरू असलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर ही कारवाई झाल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. त्यामुळे ही कारवाई केवळ शिक्षकांपुरती मर्यादित न राहता, निर्णय प्रक्रियेत सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

तक्रारदारांच्या मते, या प्रकरणात अनेक वेळा संबंधित प्रशासनाला कागदोपत्री पुरावे सादर करूनही सुरुवातीला कोणतीही ठोस हालचाल झाली नाही. मात्र, कायदेशीर नोटिसा, उच्च न्यायालयात जाण्याचा इशारा आणि लोकप्रतिनिधींनी सातत्याने उपस्थित केलेल्या प्रश्नांनंतर अखेर प्रशासनाला कारवाई करावी लागली.

या संपूर्ण प्रकरणात मूर्तिजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार हरीश पिंपळे यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केल्याचा तसेच मुख्य तक्रारदार गणेश गजाननराव कुरई यांनी कायदेशीर लढा कायम ठेवल्याचा उल्लेख करण्यात येत आहे. या संयुक्त दबावानंतरच निलंबनाची कारवाई झाल्याचा दावा करण्यात आला आहे.दरम्यान, कारवाईचे आदेश प्रसिद्ध होताच प्राथमिक शिक्षण विभागाकडून प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले. मात्र, या प्रसिद्धीपत्रकावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, कारवाईचे संपूर्ण श्रेय प्रशासनाने स्वतःकडे घेण्याचा प्रयत्न केला असून, या प्रकरणाचा मूळ पाठपुरावा, तक्रारी आणि लोकप्रतिनिधींच्या हस्तक्षेपाचा उल्लेख जाणीवपूर्वक टाळण्यात आला.इतकेच नव्हे, तर चौकशीदरम्यान काही गंभीर प्रशासकीय त्रुटीही समोर आल्याचा आरोप करण्यात आला आहे. माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीने मूळ फाईल्स आणि संबंधित आस्थापना लिपिकासह उपस्थित राहण्याचे निर्देश दिले होते. मात्र, संबंधित कागदपत्रे समितीसमोर वेळेत सादर करण्यात आली नसल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे चौकशीची प्रक्रिया अनावश्यकपणे विलंबित झाल्याचेही बोलले जात आहे.तक्रारदारांनी आणखी एक गंभीर मुद्दा उपस्थित केला आहे. प्राथमिक स्तरावर गटशिक्षणाधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटिसा देण्यात आल्या, मात्र त्यानंतर कोणतीही निर्णायक कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे प्रारंभी दाखवलेली कठोर भूमिका पुढे का बदलली, याचे उत्तर प्रशासनाने द्यावे, अशी मागणी होत आहे.याचबरोबर चौकशी अधिकाऱ्यांनाच मूळ प्रशासकीय आदेशाची प्रत उपलब्ध करून न दिल्याचा आरोपही समोर आला आहे. अशा परिस्थितीत उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे चौकशी करून अहवाल सादर करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे संपूर्ण प्रक्रियेतील प्रशासकीय समन्वयावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, शिक्षक बदली प्रक्रियेसाठी वापरण्यात आलेल्या ऑनलाइन प्रणालीतील कथित अनियमिततांचाही तपास अद्याप बाकी असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. बदली पोर्टलवर सादर करण्यात आलेली कागदपत्रे, त्यांची पडताळणी, संबंधित सर्व्हर लॉग्ज आणि कथित दलाल साखळीची भूमिका तपासल्याशिवाय या प्रकरणाचे संपूर्ण सत्य समोर येणार नाही, असा दावा करण्यात येत आहे. सध्या ३३ शिक्षकांवरील कारवाई ही केवळ सुरुवात असल्याचे सांगत, आता या प्रकरणातील निर्णय प्रक्रियेत सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी अधिक तीव्र होत आहे.

## बच्चू कडू यांच्या आक्रमक

प्रश्नांवर ठोस भूमिका घेत शासनाला निर्णय घेण्यास भाग पाडले. आमदार बच्चू कडू यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस वनमंत्री गणेश नाईक, आमदार गोपीचंद पडळकर, वन विभाग, महसूल विभाग आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान आमदार बच्चू कडू यांनी दूरध्वनीद्वारे सहभाग घेत मेंढपाळ समाजाच्या प्रश्नांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची ठाम भूमिका मांडली. दरम्यान, मेंढपाळ समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांसाठी डॉ. अर्जुन नामदेवराव महानर यांनी सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाचीही शासनाने गंभीर दखल घेतली. बैठकीत वन चराई, पारंपरिक चराई हक्क, वन विभागाकडून होणारी कारवाई तसेच इतर मागण्यांवर सविस्तर चर्चा झाली. या चर्चेनंतर पाच वर्षांवरील झाडांच्या परिसरात मेंढ्यांना चराई करण्यास परवानगी देणारा शासन निर्णय पुढील दोन दिवसांत काढण्यात येईल, असे शासनाच्या वतीने आश्वासन देण्यात आले. याचबरोबर पशुसंवर्धन विभागाने शेळ्या, मेंढ्यांसह पशुधन विमा योजना पुन्हा सुरू करण्याचा निर्णय जाहीर केल्याने मेंढपाळ समाजाच्या आणखी एका महत्त्वाच्या मागणीला न्याय मिळाला आहे. हा निर्णय आमदार बच्चू कडू यांनी विधिमंडळात आणि आंदोलनाच्या माध्यमातून सातत्याने लावून धरलेल्या मागणीचे मोठे यश मानले जात आहे. या बैठकीला मेंढपाळ समाजाचे प्रतिनिधी म्हणून डॉ. अर्जुन नामदेवराव महानर, दादाराव माने, अवधूत भाऊ कोरडकर, सखारामजी कुडाळ, बंडू महानोर, संजय भाऊ ठोंबरे, रोशन शिंगाडे, बाळूभाऊ शिंदे, पंजाब भाऊ महानोर, ज्योतीरामजी बिचकुले, सोमाजी पिसाळ, मंगेश घुले तसेच राज्यभरातील अनेक मेंढपाळ समाजाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीनंतर मेंढपाळ समाजाच्या प्रतिनिधींनी आमदार बच्चू कडू यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. 'मेंढपाळ समाजाच्या प्रश्नांसाठी विधान परिषदेत सातत्याने आवाज उठवणारे, आंदोलनात खंबीरपणे पाठीशी उभे राहणारे आणि शासनावर सातत्याने दबाव निर्माण करणारे नेतृत्व म्हणून आमदार बच्चू कडू यांनी निर्णायक भूमिका बजावली. त्यांच्या आक्रमक व अभ्यासपूर्ण पाठपुराव्यामुळेच शासनाला सकारात्मक निर्णय घ्यावे लागले,' अशा भावना उपस्थित प्रतिनिधींनी व्यक्त केल्या.यावेळी डॉ. अर्जुन नामदेवराव महानर यांनीही शासनाने दिलेल्या आश्वासनांचे स्वागत करत, 'जोपर्यंत शासन निर्णय निघून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नाही, तोपर्यंत मेंढपाळ समाजाचा न्यायासाठीचा लढा सुरूच राहील,' अशी भूमिका स्पष्ट केली. राज्यातील मेंढपाळ समाजाच्या प्रश्नांवर संघर्ष करणाऱ्या नेतृत्वाला मिळालेले हे महत्त्वाचे यश मानले जात असून, शासनाने आता दिलेली आश्वासने तातडीने प्रत्यक्षात उतरवावीत, अशी अपेक्षा मेंढपाळ समाजाकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## ग्रँड विदर्भ-स्तरीय सायकलिंग स्पर्धा

प्रथम क्रमांकासाठी ५हजार , द्वितीय ३ हजार आणि तृतीय बक्षीस २ हजार रुपयांचे रोख दिले जाईल. तसेच सर्व सहभागींना ई-सर्टिफिकेट आणि पदक दिले जाईल. सहभागी खेळाडूंना शनिवार ८ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत स्पर्धेच्या ठिकाणी येऊन टी-शर्ट, किट आणि बिब क्रमांक घ्यावा लागेल. ज्यांच्याकडे हेल्मेट नाही त्यांना किरकोळ शुल्कावर हेल्मेट उपलब्ध करून दिले जाईल. स्पर्धेदरम्यान जुने प्रा.राम मेघे कॉलेज ते अंजनगाव बारी रोड मार्गे उधखेड-पारडी रेल्वे अंडरपास पर्यंतचा रस्ता बंद राहील.या स्पर्धेची संपूर्ण जबाबदारी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे १२५ अधिकारी आणि अमरावती सायकलिंग असोसिएशनचे २०० स्वयंसेवक सांभाळणार आहेत. पत्रकार परिषदेमध्ये डॉ .चंद्रशेखर कुळकर्णी, अतुल कळमकर, पियुष क्षीरसागर, संजय मेंडसे, लक्ष्मीकांत खंडागळे, प्रवीण खांडपासोळे, प्रवीण जैस्वाल आदि उपस्थित होते.वाहतूक आणि सुरक्षा व्यवस्था- स्पर्धेदरम्यान संपूर्ण मार्गावर किलोमीटर मार्कर लावण्यात आले आहेत. पोलिसांकडून बॅरिकेडिंग करण्यात येणार आहे. स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंसाठी झेनिथ हॉस्पिटल, दुबुकर हॉस्पिटल आणि रिम्स हॉस्पिटलच्या रुग्णवाहिका आणि वैद्यकीय पथक तैनात असतील.स्पर्धेच्या शेवटी अमरावती पोलीस आयुक्तालय आणि असोसिएशनच्या वतीने नशामुक्ती जनजागृती रॅली देखील काढण्यात येणार आहे.आयोजकांनी नागरिकांना या स्पर्धेत सहभागी होऊन कार्यक्रमाचा आनंद घेण्याचे आवाहन केले आहे.

## मुथूट फिनकॉर्पच्या गोल्ड लोनमध्ये

तत्कालीन शाखा व्यवस्थापकाने संगणकीय पावती देण्याऐवजी स्वतःच्या स्वाक्षरीसह बँकेचा शिक्का असलेली हस्तलिखित पावती दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, संपूर्ण कर्जाची रक्कम भरूनही त्यांचे ५८.०८ ग्रॅम सोन्याचे दागिने परत देण्यात आले नाहीत, तसेच कर्ज खातेदेखील ऑनलाइन बंद करण्यात आले नाही.तक्रारीनंतर पोलिसांनी माजी शाखा व्यवस्थापक शुभम वासेवाय याला अटक केली असून त्याची चौकशी सुरू आहे. या कथित आर्थिक गैरव्यवहारात बँकेतील आणखी कोणते अधिकारी किंवा कर्मचारी सहभागी होते, याचा पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे. **७०० ग्रॅम सोने आणि ४७ लाखांच्या गैरव्यवहाराची शक्यता-** या प्रकरणाच्या तपासादरम्यान हा गैरव्यवहार केवळ एका ग्राहकापुरता मर्यादित नसल्याची बाब समोर आली आहे. प्राथमिक माहितीनुसार, अनेक ग्राहकांच्या तारण ठेवलेल्या सुमारे ७०० ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांमध्ये आणि जवळपास ४७ लाख रुपयांच्या व्यवहारात अनियमितता झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. काही ग्राहकांच्या दागिन्यांचा अपहार झाल्याचाही संशय आहे.

## मोर्शीत घरफोडी उघड :

घराला कुलूप लावून गेल्यानंतर सायंकाळी परतल्यावर घराच्या कुडाच्या भिंतीला छिद्र पाडून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करून संदुकासह एकूण १ लाख ५०० रुपयांचा ऐवज चोरी केल्याचे उघड झाले.याप्रकरणी मोर्शी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३१ (३) व ३३१ (४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील हुड यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाच्या सूचना दिल्या. पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वाखालील गुन्हे प्रकटीकरण पथकाने तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहिती आणि स्थानिक चौकशीच्या आधारे अवघ्या २४ तासांत कुणाल प्रविण शहाणे (वय १९, रा. पिंपळखुटा मोठा) आणि प्रशिक बाळासाहेब इंगळे (वय १९, रा. हाशमपूर) या दोघांना ताब्यात घेतले.कसून चौकशीत दोघांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्या ताब्यातून २० हजार ५०० रुपये रोख, सुमारे १० हजार रुपयांचे सोन्याचे दोन डोरले व मणीची पोत, तसेच गुन्ह्यात वापरलेली हुंडाई कंपनीचीएमएच-०२-डीडब्ल्यू-२२०१ क्रमांकाची चारचाकी जप्त करण्यात आली. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ५ लाख ३० हजार ५०० रुपये आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील हुड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक तुषार चव्हाण तसेच पोलीस अंमलदार छत्रपती करपते, स्वप्नील बायस्कर आणि अथर्व कोहळे यांनी केली. पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहेत.

## घातक शस्त्रांसह तरुण जेरबंद

शिताफीने ताब्यात घेतले. अंगझडतीदरम्यान त्याच्या कमरेला लपवून ठेवलेले दोन धारदार चाकू आढळून आले. यामध्ये एक लोखंडी चाकू (किंमत १,००० रुपये) आणि एक स्टीलचा 'चायना' चाकू (किंमत ५०० रुपये) असा एकूण १,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव जाहेद शाह आबिद शाह (वय २१, रा. मुस्तफा नगर, हैदरपुरा, अमरावती) असे आहे. त्याच्याविरुद्ध खोलापुरी गेट पोलिस ठाण्यात आर्म ॲक्टच्या कलम ४/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायद्यातील कलम १३५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि पोलीस उपायुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वात सपोनि. महेश इंगोले, पोउपनि. गजानन सोनुने व गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

## भाजप पश्चिम विदर्भ विभागीय

वातावरणात पार पडली.

बैठकीत आगामी कार्ययोजना, संघटनात्मक विस्तार, बूथ सक्षमीकरण, जनसंपर्क अभियान तसेच 'सेवा, संघटन आणि समर्पण' या पक्षाच्या विचारधारेला अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. आगामी काळात संघटन अधिक सक्षम, सशक्त आणि गतिमान करण्यासाठी आवश्यक दिशा व नियोजन यावेळी निश्चित करण्यात आले.

या बैठकीस उपेंद्र कोठेकर, आमदार संजय कुटे, आमदार प्रवीण पोटे, दिनेश सूर्यवंशी, डॉ. नितीन धांडे (अध्यक्ष, अमरावती शहर जिल्हा) तसेच पश्चिम विदर्भातील सर्व जिल्हाध्यक्ष, जिल्हा महामंत्री आणि जिल्हाप्रभारी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना शिवप्रकाश यांनी संघटन विस्तार, बूथ सक्षमीकरण, कार्यकर्त्यांशी सातत्यपूर्ण संवाद आणि जनाधार अधिक मजबूत करण्यावर विशेष भर दिला. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक कार्य अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.बैठकीच्या आयोजनाची जबाबदारी सोपविल्याबद्दल पक्ष नेतृत्वाचे आभार व्यक्त करण्यात आले. तसेच मिळालेल्या मार्गदर्शनाच्या आधारे पश्चिम विदर्भात भारतीय जनता पक्षाचे संघटन अधिक सक्षम व गतिमान करण्यासाठी समर्पितपणे कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## शाळेबाहेरून भरदिवसा सात

मुख्य प्रवेशद्वाराबाहेर पार्क केली होती. त्यानंतर ते वैयक्तिक कामानिमित्त बाहेर गेले. सुमारे सकाळी ११.३० वाजता परत आल्यानंतर त्यांनी पाहिले असता कार पार्क केलेल्या ठिकाणी नव्हती. परिसरात शोधाशोध करून तसेच नागरिकांकडे चौकशी करूनही वाहनाचा कोणताही मागमूस लागला नाही. अखेर त्यांनी गाडगेनगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरुद्ध तक्रार दाखल केली. या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५(ब) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## करजगावात गोवंश तस्करीवर

, साहील शेख आझाद, शेख सहदू शेख वाहब आणि शेख जुनेद शेख जमील यांच्या घरांमधून गोवंश जनावरे, गोमांस व कत्तलीसाठी वापरलेले साहित्य जप्त करण्यात आले. संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम तसेच प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायद्यानुसार स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कारवाईदरम्यान जप्त करण्यात आलेली ४२ गोवंश जनावरे करजगाव येथील पशुपती गौशाळेत सुरक्षित ठेवण्यात आली आहेत. तसेच जप्त केलेले २३० किलो गोमांस पंचांसमक्ष नष्ट करण्यात आले. तपासादरम्यान जप्त जनावरांवर कोणत्याही प्रकारचे इअर टॅग आढळून न आल्याने ती कत्तलीसाठी आणल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी माधवराव गरूड आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अमन सिरसट, उपनिरीक्षक प्रशांत जाधव तसेच शिरजगाव कसबा पोलीस व आरसीपी पथकाने संयुक्तपणे केली. फरार आरोपींचा शोध सुरू असून पुढील तपास शिरजगाव कसबा पोलीस करीत आहेत.

## विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे कराटे

मुख्यालयातील कवायत मैदानावर तीन दिवसीय कराटे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात मनीबाई गुजराती हायस्कूल, श्रीमती शोभाबेन सेठ्ठीया हायस्कूल, वनिता समाज हायस्कूल, श्रीमती कस्तुरबा कन्या हायस्कूल, नारायणदास लढ्ढा हायस्कूल, गणेशदास राठी विद्यालय, शिवाजी बहुउद्देशीय उच्च माध्यमिक शाळा, सरस्वती विद्यालय, प्रेमकिशोर सिकची विद्यालय तसेच महेश्वरी कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले. समारोप कार्यक्रमाला पोलीस निरीक्षक ज्योती विल्लेकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक मेघाली गावंडे (भरोसा सेल) तसेच राखीव पोलीस निरीक्षक श्रीधर गुळसुंदरे उपस्थित होते. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर कराटे व जुडो प्रशिक्षक उमेश मोवळे, सागर मेश्राम, ज्योती प्रजापती, आचल कुशवाह आणि मुक्ताई धर्माळकर यांचा पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास वाढण्यासोबतच संकटाच्या प्रसंगी धैर्याने व सजगतेने परिस्थितीला सामोरे जाण्याची मानसिक व शारीरिक तयारी निर्माण होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला.

## अस्वच्छतेचा कळस, रोशनी

एफडीएने कठोर भूमिका घेत ही कारवाई केली.

एफडीएच्या अधिकाऱ्यांनी अचानक केलेल्या तपासणीत किचन परिसरात घाण साचलेली, अपुरी साफसफाई, रंगरंगोटीचा अभाव आणि देखभालीतील गंभीर त्रुटी आढळून आल्या. ग्राहकांच्या आरोग्याशी थेट संबंधित असलेल्या अन्न सुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर संचालक अनिल ठाकरे यांना नोटीस बजावण्यात आली. सर्व त्रुटी दूर करून एफडीएची पुन्हा पाहणी होईपर्यंत दोन्ही प्रतिष्ठाने बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले. या कारवाईनंतर पंचवटी चौक परिसरातील ग्राहकांची कायम गर्दी असलेले रोशनी हॉटेल आणि रोशनी रिफ्रेशमेंटचे शटर खाली आल्याने शहरात एकच खळबळ उडाली. दिवसभर या कारवाईची चर्चा सुरू होती. दरम्यान, संचालक अनिल ठाकरे यांनी एफडीएने निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटी मान्य करत, 'दोन्ही प्रतिष्ठानांमध्ये साफसफाई, रंगरंगोटी आणि आवश्यक दुरुस्तीचे काम तातडीने सुरू करण्यात आले आहे. सर्व काम पूर्ण झाल्यानंतर एफडीएकडून परवानगी मिळाल्यानंतरच प्रतिष्ठाने पुन्हा सुरू करण्यात येतील,' असे स्पष्ट केले. पंचवटी चौकातील रोशनी रिफ्रेशमेंट हे नाश्ता आणि ताकासाठी शहरभर प्रसिद्ध असून ठाकरे कुटुंबाचा हा व्यवसाय अनेक वर्षांपासून सुरू आहे. त्यानंतर विस्तार करत रोशनी हॉटेल सुरू करण्यात आले, जिथे दक्षिण भारतीय पदार्थांसह जेवणाची सुविधा उपलब्ध आहे.एफडीएच्या या धडक कारवाईने शहरातील हॉटेल, रेस्टॉरंट आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांना स्पष्ट इशारा मिळाला आहे.

## ण्ण्श्इ विरोधात र्ध्इं अमरावतीचा

अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम आहे. अपुरे शिक्षण आणि प्रशिक्षण असलेल्या व्यक्तींना MMC नोंदणी देऊन आधुनिक वैद्यक करण्याची परवानगी दिल्यास रुग्णांच्या सुरक्षेला धोका निर्माण होईल. त्यामुळे हा निर्णय तात्काळ मागे घ्यावा.या आंदोलनात आयएमएचे अध्यक्ष डॉ. दिनेश वाघाडे, सचिव डॉ. विक्रम वानखडे, कोषाध्यक्ष डॉ. रोहन बोबडे, माजी अध्यक्ष डॉ. अलका कुथे, डॉ. संदीप दानखेडे, उपाध्यक्ष डॉ. विक्रम देशमुख, डॉ. तृप्ती दानखेडे, डॉ. भूषण भोंड, सहसचिव डॉ. आशीष डगवार, डॉ. ऋतिका लांडगे, डॉ. सोमेश लाडे, डॉ. स्मिताली बोबडे, डॉ. विजय कुथे, डॉ. राधा सावदेकर, डॉ. संगीता सालुंखे, डॉ. गौरव गोहाड, डॉ. जयंत पांढरीकर, डॉ. सोहेल बारी, डॉ. सोनाली शिरभाते, डॉ. सीमा आडवाणी, डॉ. तृप्ती जवादे, डॉ. नितीन जयस्वाल, डॉ. नीलेश पाचकवडे, डॉ. अक्षय चांदूरकर, डॉ. अमित डफले, डॉ. अपूर्वा मुंदडा, डॉ. प्रवीण काकडे, डॉ. हिमांनी राठोड, डॉ. अक्षय चांदूरकर, डॉ. सिकंदर अडवाणी, डॉ. वसंत लूंगे, डॉ. अलका कुथे, डॉ. दिलीप पारवानी, डॉ. राघाणी सह इतर डॉक्टरांनी सहभाग घेतला.

## उच्च न्यायालयाच्या आवाहनानंतर

BHMS CCMP नोंदणीसाठी मानक कार्यपद्धती (SOP) तयार करण्यासाठी सर्व संबंधित घटकांचा समावेश असलेली समिती स्थापन करण्याचे स्पष्ट निर्देशही न्यायालयाने दिले आहेत.

सेवा बंद आंदोलन मागे घेतले असले तरी, CCMP कोर्स पूर्ण केलेल्या होमियोपॅथी वैद्यांच्या (चिकित्सकांच्या) नोंदणीविरोधातील आयएमएचा लढा पुढेही असाच सुरू राहील, असे स्पष्ट करण्यात आले आहे. रुग्णांच्या हितासाठी आणि आपल्या न्याय्य मागण्यांसाठी सर्व डॉक्टरांनी ही एकजुट कायम ठेवावी, असे आवाहनही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

अकोला । वाशिम । बुलडाणा

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

■ शुक्रवार, ७ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

## निवासी कॉलनीत धोकादायक व्यवसाय

# बाकलीवाल कॉलनीतील गृह निर्माण संस्थेत डॉक्टरांचा दवाखाना आणि ई-व्हेईकल शोरूम सुरू






■ पप्पु घुगे ■

**वाशिम :** शहरातील बाकलीवाल कॉलनीतील गृह निर्माण संस्थेत नियम डावलून व्यावसायिक बांधकामे आणि व्यवसाय सुरू झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. येथे दोन डॉक्टरांनी दवाखाने सुरू केले असून एका ठिकाणी इलेक्ट्रिक गाड्यांचे शोरूमही थाटण्याचे नियोजन आहे.

सध्या ज्या ठिकाणी इलेक्ट्रिक गाड्यांचे शोरूमचे नियोजन आहे, तिथे यापूर्वी अशा गाड्यांना आग लागण्याच्या घटना घडल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. निवासी भागात असा ज्वालाग्राही वस्तूंचा व्यवसाय सुरू झाल्यास रहिवाशांसाठी धोका दायक आहे.

**पार्किंग आणि बांधकामाचे उल्लंघन**

नागरिकांच्या माहितीनुसार, या दोन्ही डॉक्टरांनी दवाखान्यासाठी पार्किंगची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे रुग्णांच्या गाड्यांमुळे कॉलनीतील अंतर्गत रस्ते पूर्णपणे बंद होतात. याशिवाय गृह निर्माण संस्थेच्या नियमांना बगल देत दोन-दोन मजली व्यावसायिक बांधकामे उभी करण्यात आली आहेत.

**नगरपालिकेच्या परवानगीवर प्रश्नचिन्ह**

निवासी गृह निर्माण संस्थेत व्यावसायिक वापरासाठी आणि अशा प्रकारचे बांधकाम करण्यासाठी नगरपालिकेने कशी परवानगी दिली, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. या संपूर्ण प्रकरणात आर्थिक देवाण-घेवाणीची शक्यता असल्याचा आरोपही स्थानिकांकडून केला जात आहे.

**नागरिकांची मागणी**

आपल्या आणि कुटुंबाच्या सुरक्षेसाठी या धोकादायक शोरूम आणि अनधिकृत व्यावसायिक बांधकामांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी बाकलीवाल कॉलनीतील नागरिकांनी केली आहे. या प्रकरणी प्रशासन आणि संबंधित विभागांनी चौकशी करून कठोर पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## मूलभूत सुविधांच्या अभावाने चाकूरकर बेजार ; ग्रामस्थांचा प्रशासनाविरोधात संताप

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील मौजा चाकूर येथे गेल्या अनेक वर्षापासून विविध मूलभूत सुविधांचा अभाव असून ग्रामपंचायत माहुलीकडून गावाकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. यासंदर्भात चाकूर येथील समस्त ग्रामस्थांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती मानोरा यांच्याकडे निवेदन देऊन तातडीने स्थळ पाहणी करून आवश्यक विकासकामे मंजूर करण्याची मागणी केली आहे.

चाकूर गावात अंदाजे २५० ते ३०० मतदार असून हे गाव गट ग्रामपंचायत माहुली अंतर्गत येते. ग्रामसेवक व सरपंच यांच्याकडे अनेक वेळा तोंडी तसेच लेखी स्वरूपात समस्या मांडूनही ठोस कार्यवाही झाली नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

गावातील पिण्याच्या पाण्याची नळपाणी पुरवठा योजना बंद असल्याने नागरिकांना पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच गावातील



अंतर्गत रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब असून पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचत असल्याने नागरिक व विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. गावात योग्य गटार व सांडपाणी निचरा व्यवस्था नसल्यामुळे बुद्ध विहार परिसरात सांडपाणी साचत असल्याने अस्वच्छता निर्माण झाली आहे. विविध ठिकाणी शेणखत व कचऱ्याचे ढीग साचल्याने दुर्गंधी पसरत असून आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे ग्रामस्थांनी निवेदनात नमूद केले आहे.

दरम्यान, जिल्हा परिषद शाळेतील किचन शेड जीर्ण व धोकादायक अवस्थेत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच गावातील अंगणवाडी इमारतही जीर्ण अवस्थेत असून लहान बालकांच्या सुरक्षिततेस धोका निर्माण झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

या सर्व समस्यांची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून तसेच इतर उपलब्ध योजनांमधून तातडीने आवश्यक विकासकामे मंजूर करून पूर्ण करावीत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. याशिवाय, ग्रामपंचायत माहुलीचे संबंधित ग्रामसेवक व सरपंच यांनी या समस्यांचे निराकरण आजपर्यंत का केले नाही, याबाबत लेखी खुलासा मागवून आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही करावी अशी मागणे चाकूर वासियांनी पंचायत समिती संवर्ग विकास अधिकारी यांना लेखी निवेदन देऊन केली.

## अनसिंग बसस्थानकासमोरील 'तळे' अखेर कधी हटणार?



■ प्रतिनिधी | वाशिम ■

बसस्थानकासमोरील मुख्य रस्त्यावर पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने नागरिक, प्रवासी, विद्यार्थी, व्यापारी, रुग्ण तसेच वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या गंभीर समस्येवर तातडीने व कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात यावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते यश सतीश चव्हाण यांनी सोमवार, दि. ३ ऑगस्ट रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, वाशिम यांना सविस्तर निवेदन सादर केले.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अनसिंग बसस्थानक हे परिसरातील महत्त्वाचे वाहतूक केंद्र असून दररोज हजारो प्रवासी येथून प्रवास करतात. मात्र बसस्थानकासमोरील मुख्य रस्त्यावर पावसाचे पाणी साचत असल्याने संपूर्ण परिसर तळ्यासारखा जलमय होतो. त्यामुळे पादचाऱ्यांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. तसेच दुचाकीस्वारांचे अपघात होण्याची शक्यता वाढली असून वाहनांचे नुकसानही होत आहे. बसमध्ये चढणाऱ्या व उतरणाऱ्या प्रवाशांना, विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग व्यक्ती व शालेय विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.याशिवाय साचलेल्या पाण्यामुळे अस्वच्छता वाढून डासांची उत्पत्ती होत असून नागरिकांच्या आरोग्यालाही धोका निर्माण झाला आहे.

# मनपा सभेचा 'हायव्होल्टेज' ड्रामा!



## पहिल्याच विषयावर गदारोळ ; प्रश्नांना बगल, आरोप-प्रत्यारोप

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिकेची गुरुवारी झालेली सर्वसाधारण सभा विकासाच्या प्रस्तावांपेक्षा राजकीय आरोप-प्रत्यारोप, गोंधळ, निलंबन आणि शाब्दिक संघर्षामुळे अधिक चर्चेत राहिली. सभा सुरू होताच पहिल्याच विषयावरून वातावरण तापले आणि त्यानंतर जवळपास प्रत्येक महत्त्वाच्या विषयावर सत्ताधारी व विरोधक आमनेसामने आल्याचे चित्र पाहायला मिळाले. काहीवेळा सभागृहाचे वातावरण अक्षरशः कुस्तीच्या आखाड्याचे स्वरूप धारण करत असतानाच अखेर अनेक विकासकामांच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.

सभेच्या प्रारंभी मागील सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताला मंजुरी देण्याचा विषय पटलावर आला. त्याचवेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे नगरसेवक विजय इंगळे यांनी मनपा स्वखर्चातून खरेदी करण्यात येणाऱ्या कचरा घंटागाड्यांबाबत थेट आयुक्तांनाच प्रश्न विचारला. 'या घंटागाड्या महानगरपालिकेसाठी घेतल्या जात आहेत की कंत्राटदाराच्या सोयीसाठी?' असा थेट सवाल करत त्यांनी प्रशासनाकडून स्पष्ट खुलासा मागितला.

मात्र या प्रश्नावर उत्तर देण्याऐवजी आयुक्तांनी घनकचरा संकलनाच्या निविदेतील अटी व शर्ती तपासण्याचा सल्ला देत थेट उत्तर टाळले. इंगळे यांनी उत्तराचा आग्रह धरताच सत्ताधारी नगरसेवकांनी या विषयावर चर्चा होऊ नये, अशी भूमिका घेतली. काही काळ गोंधळानंतर सत्ताधाऱ्यांनी मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करून घेत पुढील कामकाज सुरू केले. यानंतर खासदार अनुप धोत्रे यांच्या सीएसआर निधीतून शहरातील विविध ठिकाणी ओपन जिम उभारण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचा विषय चर्चेला

### नगरसेवक निलंबित अन अखेर विकास प्रस्तावांना हिरवा कंदील | घंटागाड्यांपासून सिटी गॅसपर्यंत प्रत्येक विषयावर सत्ताधारी-विरोधक आमनेसामने | सभागृहात 'एनओसी होना की नहीं?'चा सज्जड दम



**मदर डेअरीच्या जागेवरून गदारोळ; सागर भारुका १५ दिवसांसाठी निलंबित**

मदर डेअरी बूथसाठी प्रस्तावित जागेचा उल्लेख विषयसूची आणि टिप्पणीमध्ये वेगवेगळा असल्याचा मुद्दा उपस्थित करत शिंदे सेनेचे नगरसेवक सागर भारुका यांनी प्रशासनाला धारेवर धरले. प्रत्यक्ष जागा आणि कागदपत्रांतील जागेमध्ये विसंगती असल्याचा आरोप करत त्यांनी तीव्र आक्षेप नोंदविले. गोंधळ वाढत गेल्याने सभागृहातील वातावरण तणावपूर्ण झाले. अखेर महापौरांनी शिस्तभंगाची कारवाई करत सागर भारुका यांना १५ दिवसांसाठी निलंबित करण्याची घोषणा केली.

आला. यावेळी स्वीकृत नगरसेवक सुनील इन्नानी यांनी प्रस्तावाचे स्वागत करत केवळ ओपन जिम न उभारता सामाजिक संस्थांचा सहभाग घेऊन नागरिकांच्या सोयीसाठी क्लोज जिम उभारण्याची सूचना केली. त्यांच्या सूचनेनंतरही काही काळ सत्ताधारी सदस्यांमध्ये गोंधळ झाला. अखेर हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

गीता नगर येथील श्री संत गजानन महाराज मंदिरासमोरील जागा मदर डेअरी बूथसाठी उपलब्ध करून देण्याच्या विषयावरही जोरदार चर्चा रंगली. यापूर्वी महानगरपालिकेकडे अशा स्वरूपाचे अनेक प्रस्ताव प्रलंबित असून त्यांचाही सकारात्मक विचार व्हावा, अशी मागणी सुनील इन्नानी यांनी केली. याच चर्चेदरम्यान नगरसेवक सागर भारुका यांनी प्रशासनावर सभागृहाची दिशाभूल करून अतिरिक्त जागा देण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप केला. आरोप-प्रत्यारोपांमुळे वातावरण तापले आणि गोंधळ वाढत गेला. अखेर महापौरांनी सागर भारुका यांना पंधरा दिवसांसाठी निलंबित करण्याचा निर्णय जाहीर केला. यानंतर उत्तर व पश्चिम झोनमधील काही प्रभागांसाठी आमदार स्थानिक विकास निधीतून प्रस्तावित विकासकामांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचा विषय सभेपुढे आला. या विषयावरही सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नगरसेवकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली. अखेर सभापती विजय अग्रवाल यांनी हस्तक्षेप करून वाद निवळवत प्रस्तावाला मंजुरी मिळवून दिली.

शहरातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन रेन वॉटर हार्वेस्टिंग योजना राबविण्याचा प्रस्ताव सर्व सदस्यांच्या चर्चेनंतर एकमताने मंजूर करण्यात आला. त्याचप्रमाणे राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (NCAP) अंतर्गत सुमारे ११.४४ कोटी रुपयांच्या पर्यावरणपूरक विकासकामांनाही सर्वानुमते हिरवा कंदील देण्यात आला. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने शहरातील प्रमुख मार्गांवरील होर्डिंग्जसाठी स्वतंत्र जाहिरात धोरण निश्चित करण्याच्या प्रस्तावावरही सविस्तर चर्चा झाली. यावेळी आयुक्तांनी शहराचे विद्रूपीकरण होणार नाही, याची दक्षता घेत जाहिरातींसाठी निश्चित स्पॉटच मंजूर केले जातील, असे स्पष्ट करत प्रस्ताव मंजूर करण्यात आला. मनपा अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी वैयक्तिक अपघात विमा आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी आरोग्य विमा योजना लागू करण्याच्या प्रस्तावालाही मंजुरी देण्यात आली. अधिकारी अमोल डोईफोडे यांच्या अपघातानंतर अशा संरक्षणात्मक योजनेची गरज प्रकर्षाने समोर आल्याने हा विषय सभेपुढे आणण्यात आल्याची चर्चा सभागृहात झाली.

राज्य शासनाच्या निर्देशानुसार सिटी गॅस डिस्ट्रिब्युशन नेटवर्कच्या विस्तारासाठी मनपा क्षेत्रातील जागा उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावावरही जोरदार राजकीय संघर्ष पाहायला मिळाला. विरोधी पक्षनेते डॉ. झिशान हुसैन यांनी अदानी समूहाला कवडीमोल दरात जागा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप केला. तर वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक पराग गवई यांनी 'मोठ्या कंपन्यांना स्वस्तात जागा देता, मग शहरातील बेरोजगार युवकांनाही अशाच दरात जागा द्या,' असा उपरोधिक टोला लगावला. दीर्घ चर्चेनंतर हा प्रस्तावही मंजूर करण्यात आला.

नगरोत्थान महाअभियान आणि दलितेत्तर वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्राप्त निधीच्या नियोजनासह विविध विकासकामांच्या प्रस्तावांनाही सभेने मंजुरी दिली. अन्य नियमित विषयांवरही चर्चा करून निर्णय घेण्यात आले. सभेच्या शेवटच्या टप्प्यात शहरातील मोकाट श्वानांचा वाढता उपद्रव, निर्बिजीकरण, रेबीज लसीकरण, श्वान निवारा केंद्र आणि मोकाट जनावरे पकडण्याच्या कारवाईवर विशेष चर्चा झाली.

संबंधित कंत्राटदारांकडून दाखविण्यात येणारे दावे आणि प्रत्यक्ष कामातील तफावत याकडे अनेक नगरसेवकांनी लक्ष वेधले. भविष्यात अशा प्रकारची अनियमितता होणार नाही, यासाठी प्रशासनाने कठोर दक्षता घ्यावी, अशी एकमुखी मागणी सभागृहातून करण्यात आली. एकंदरीत, विकासकामांच्या मंजुरीसह राजकीय शाब्दिक युद्ध, आरोप-प्रत्यारोप, प्रशासनाला धारेवर धरण्याचे प्रयत्न आणि निलंबनाच्या कारवाईमुळे अकोला महानगरपालिकेची गुरुवारची सर्वसाधारण सभा चांगलीच गाजली.

**'एनओसी होना की नहीं?' सभागृह नेत्याचा भरसभेत सज्जड दम**

आमदार साजिद खान पठाण यांच्या स्थानिक विकास निधीतील कामांसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचा विषय चर्चेला असताना सभागृहात वातावरण चांगलेच तापले. सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नगरसेवकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू असतानाच चर्चा भरकटू लागली. त्याचवेळी विरोधी पक्षनेते डॉ. झिशान हुसैन यांना उद्देशून सभागृह नेते पवन महल्ले यांनी आक्रमक भूमिका घेत 'एनओसी होना की नहीं?' असा सज्जड दम भरल्याचे सभागृहात पाहायला मिळाले. त्यानंतर काही काळ वातावरण इतके तापले की, सभागृहाचे रूपांतर जणू राजकीय आखाड्यातच झाले.

## जाहीर नोटीस

**विदयमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) न्यायालय, वाशिम**

सि. एम. ए. नं. १५४/२०२६ चौ. ता. २१/०८/२०२६

**पल्लवी व इतर विरूध्द निरंक**

**अर्जदार:-** १. पल्लवी प्रज्ञानंद तायडे वय अं. ४७ वर्षे, धंदा घरकाम २. तनिष्क प्रज्ञानंद तायडे वय अं. २१ वर्षे, धंदा शिक्षण ३. विदिशा प्रज्ञानंद तायडे वय अं. २४ वर्षे, धंदा शिक्षण. ४. बाबूराव झाबूराव तायडे वय अ. ७६ वर्षे, धंदा सेवानिवृत्त. ५ आशा बाबूराव तायडे वय अं. ७१ वर्षे, धंदा घरकाम.अर्जदार क्र. १ व ३ रा. कोंडाळा रोड, वॉटर टँक जवळ, सुंदर वाटीका, वाशिम ता. जि. वाशिम अर्जदार क्र. ४ व ५ रा. कापसी रोड, वार्ड नं. २, कापसी रोड, ता. जि. अकोला.

**गैरअर्जदार :-** निरंक

ज्या अर्थी या जाहीर नोटीस द्वारे सर्वांना सूचित करण्यात येते की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार क्र. १ ही मयत नामे प्रज्ञानंद बाबुराव तायडे यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ व ३ हे मयत नामे प्रज्ञानंद बाबुराव तायडे यांचे मुले आहेत.अर्जदार क्र. ४ हे मयत नामे प्रज्ञानंद बाबुराव तायडे यांचे वडील आहेत व अर्जदार क्र. ५ ही मयत नामे प्रज्ञानंद बाबुराव तायडे यांची आई आहे. मयत नामे प्रज्ञानंद बाबुराव तायडे हे दिनांक ०१/०६/२०२६ रोजी मृत्यू पावलेत. त्यांचे मृत्यूपश्चात वरील अर्जदार यांनी वि. न्यायालयामध्ये 'बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम २,' प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाही.

त्याअर्थी सदर संबंधीत कोणास कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी चौ. ता. २१/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता किंवा ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत कागदपत्रासह वि. न्यायालयात स्वतः किंवा त्यांनी निर्देशित केलेल्या वकीला मार्फत हजर राहुन आपली लेखी हरकत दाखल करावे. अन्यथा कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत नाही असे समजुन सदर प्रकरण कायदयानुसार निकाली काढण्यात येईल. आज दिनांक ०३/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

आदेशानुसार
**सही**
**अधिक्षक**
शिक्का
दिवाणी न्यायालय व. स्तर वाशीम

## जाहीर नोटीस

**विदयमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) न्यायालय, वाशिम**

सि. एम. ए. नं. १५५/२०२६ चौ. ता. २७/०८/२०२६

**देवानंद विरूध्द निरंक**

**अर्जदार : -** देवानंद साम्बर पट्टेबहादूर वय अं. ४५ वर्षे, धंदा शेती. अर्जदार रा. सोनगव्हाण पो. वारला ता. जि. वाशिम

**गैरअर्जदार :-** निरंक

ज्या अर्थी या जाहीर नोटीस द्वारे सर्वांना सूचित करण्यात येते की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार हे मयत नामे सिताराम रामजी पट्टेबहादूर यांचे पुतणे आहे. मयत नामे सिताराम रामजी पट्टेबहादूर हे दिनांक २४/०४/२०२१ रोजी मृत्यू पावलेत. तसेच मयत नामे सिताराम रामजी पट्टेबहादूर हे अविवाहीत होते. त्यांचे मृत्यूपश्चात वरील अर्जदार यांनी वि. न्यायालयामध्ये 'बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम २,' प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाही.

त्याअर्थी सदर संबंधीत कोणास कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी चौ. ता. २७/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता किंवा ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत कागदपत्रासह वि. न्यायालयात स्वतः किंवा त्यांनी निर्देशित केलेल्या वकीला मार्फत हजर राहुन आपली लेखी हरकत दाखल करावे. अन्यथा कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत नाही असे समजुन सदर प्रकरण कायदयानुसार निकाली काढण्यात येईल. आज दिनांक ०३/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

आदेशानुसार
**सही**
**अधिक्षक**
शिक्का
दिवाणी न्यायालय व. स्तर वाशीम

# सहाय्यक निबंधक कारंजा यांचा 'ॲक्शन मोड' ऑन

## प्रशिक पतसंस्थेला ठेवी ७ ऑगस्ट पर्यन्त परत करण्याचे आदेश ठेवी परत न केल्यास कठोर कारवाईचा इशारा

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा येथील प्रशिक ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्यादित विरोधात ठेवीदारांच्या वाढत्या तक्रारींची गंभीर दखल घेत सहकार विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. ठेवीदारांच्या अडकलेल्या ठेवींप्रकरणी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कारंजा यांनी संस्थेचे अध्यक्ष, व्यवस्थापक व संचालक मंडळाला ठेवीदारांची रक्कम तातडीने परत करण्याचे निर्देश देत, मुदतीत समाधानकारक कार्यवाही न झाल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अंतर्गत कठोर कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.

यासंदर्भातील अधिकृत पत्र ३० जुलै २०२६ रोजी संबंधित पतसंस्थेला बजावण्यात आल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. या पत्रानुसार संस्थेला सर्व ठेवीदारांची अद्ययावत यादी, थकीत ठेवींचा तपशील, परतफेडीची सद्यस्थिती, संस्थेची आर्थिक स्थिती तसेच पुढील कार्यवाहीचा सविस्तर अहवाल ७ ऑगस्ट २०२६ पर्यंत सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, मुदतपूर्ती होऊनही ठेवी परत मिळत नसल्याच्या तक्रारींमुळे ठेवीदारांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, लहान व्यावसायिक आणि कामगारांनी आयुष्यभराची बचत या संस्थेत ठेवली असून, वारंवार पाठपुरावा करूनही समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.



या प्रकरणी नगरसेवक सागर रामदास अंभोरे, ॲड. मिलिंद खंडारे, ॲड. राहुल मनवर, विलास शिरसाट, भाऊराव वासनिक, पुरुषोत्तम गुजाटे यांच्यासह शेकडो ठेवीदारांनी सहकार विभागाकडे संयुक्त निवेदन सादर करून संस्थेच्या कारभाराची सखोल चौकशी करावी व ठेवीदारांचे पैसे तातडीने परत मिळवून द्यावेत, अशी मागणी केली आहे. प्रशासनाकडून ठोस निर्णय न झाल्यास १५ ऑगस्ट २०२६ पासून कारंजा तहसील कार्यालयासमोर सामूहिक आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा ठेवीदारांनी दिला आहे. या आंदोलनात शंभरहून अधिक ठेवीदार सहभागी होण्याची शक्यता असून, 'आमचे पैसे परत मिळेपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही,' अशी भूमिका ठेवीदारांनी स्पष्ट केली आहे. सभासदांच्या आमरण उपोषणाच्या इशाऱ्यानंतर सहाय्यक निबंधक कारंजा (लाड) कमालीचे सक्रिय झालेत. सहाय्यक निबंधकांनी आपल्या आदेशात सहकारी संस्थांचे कामकाज पारदर्शक ठेवणे आणि ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण करणे ही संचालक मंडळाची मूलभूत जबाबदारी असल्याचे नमूद केले आहे. तक्रारींच्या पार्श्वभूमीवर आवश्यकतेनुसार संस्थेच्या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी, विशेष लेखापरीक्षण (स्पेशल ऑडिट), जबाबदार पदाधिकाऱ्यांवर वैयक्तिक जबाबदारी निश्चित करणे, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमांतर्गत दंडात्मक कारवाई तसेच पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येऊ शकते, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच मागविलेली माहिती वेळेत न देणे किंवा दिशाभूल करणारी माहिती सादर करणे ही गंभीर बाब मानली जाईल, असा इशाराही पत्रात देण्यात आला आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे कारंजा शहरासह तालुक्यात ठेवीदारांच्या पैशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, विविध सामाजिक संघटना व नागरिकांनी या प्रकरणाची निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. आता सहकार विभागाने दिलेली ७ ऑगस्टची मुदत आणि ठेवीदारांनी जाहीर केलेले १५ ऑगस्टपासूनचे आमरण उपोषण यामुळे पुढील काही दिवस निर्णायक ठरणार आहेत. संस्थेकडून समाधानकारक पावले उचलली जातात की सहकार विभाग आणखी कठोर कारवाई करतो, याकडे संपूर्ण कारंजा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २५१ ■ शुक्रवार, ७ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# भरधाव ट्रकची धडक:दोन मजूर जागीच ठार, एक गंभीर

## सावर्डीजवळ रस्ते बांधकामादरम्यान दुर्घटना, चिस्तूर गावावर शोककळा

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** अमरावती जिल्ह्यातील सावर्डी येथील जिओ पेट्रोल पंपाजवळ राष्ट्रीय महामार्गावरील रस्ते बांधकाम सुरू असताना भरधाव ट्रकने उभ्या ट्रकला जोरदार धडक दिल्याने दोन मजुरांचा जागीच मृत्यू झाला, तर एक मजूर गंभीर जखमी झाला. ही दुर्दैवी घटना ५ ऑगस्ट रोजी घडली. मृत व जखमी मजूर हे वर्धा जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील चिस्तूर गावातील असल्याने संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

या अपघातात देविदास पांडुरंग पाटील (४०) व मुकुंदा श्रीराम गणोरकर (६०) यांचा जागीच मृत्यू झाला. तर भूषण वाढोणकर (३५) हे गंभीर जखमी असून त्यांच्यावर अमरावती येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याशिवाय दिलीप मरापे व अशोक उके यांना किरकोळ दुखापत झाली.

मिळालेल्या माहितीनुसार, सर्व मजूर राष्ट्रीय महामार्गावरील काम करणाऱ्या आरबीआय कंपनीत कार्यरत होते. कामाच्या ठिकाणी पोहोचल्यानंतर ते ट्रकमधून खाली उतरण्याच्या तयारीत असतानाच मागून भरधाव वेगाने आलेल्या ट्रकने उभ्या ट्रकला जबर धडक दिली. धडकेचा जोर इतका प्रचंड होता की दोन मजुरांचा जागीच मृत्यू झाला, तर इतर तिघे जखमी झाले. मृत देविदास पाटील हे भूमिहीन होते. मजुरी करून ते कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. त्यांच्या पश्चात पत्नी व अभियांत्रिकीचे शिक्षण घेणारा मुलगा असा परिवार आहे. ते गेल्या पाच वर्षांपासून आरबीआय कंपनीत मजूर म्हणून कार्यरत होते. तर मुकुंदा गणोरकर यांच्याकडे अवघी एक एकर शेती होती. शेतीबरोबरच मजुरी करून ते पत्नी व मुलाचा सांभाळ करत होते. त्यांची मुलगी विवाहित आहे.



या भीषण अपघातामुळे चिस्तूर गावावर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. मृतांच्या कुटुंबीयांवर शोककळा पसरली असून जखमी मजुराच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# कोट्यवधींच्या नूतनीकरणानंतरही सेलू बस स्थानकाचे छत कोसळले

**दर्जेदार काम की कमिशनखोरी असा नागरिकांचा प्रश्न**

## सुदैवाने जीवितहानी टळली, पावणेदोन वर्षांतच कामाचा बोजवारा

**सेलू जनमाध्यम :** . कोट्यवधी रुपये खर्च करून नूतनीकरण करण्यात आलेल्या सेलू बस स्थानकाच्या इमारतीचे छत बुधवारी रात्री ११ च्या सुमारास अचानक कोसळल्याने एकच खळबळ उडाली. सुदैवाने ही घटना प्रवाशांची गर्दी नसताना घडल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र पावणेदोन वर्षांपूर्वीच पूर्ण झालेल्या नूतनीकरणाच्या कामाचा दर्जा पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

आमदार पंकज भोयर यांच्या माध्यमातून बस स्थानकाच्या नूतनीकरणासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यात आला होता. प्रवाशांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा दावा करण्यात आला होता. मात्र अवघ्या पावणेदोन वर्षांतच छताचा भाग कोसळल्याने कामाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

घटनेनंतर बस स्थानक परिसरात नागरिकांनी मोठी गर्दी केली. सार्वजनिक निधीतून झालेल्या कामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आले का, कामाची गुणवत्ता तपासली होती का आणि संबंधित अधिकाऱ्यांनी कामाची पाहणी केली होती का, असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. कमिशनच्या हव्यासापोटी दर्जाशी तडजोड झाली का अशी प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करीत आहेत. छत कोसळताना त्या ठिकाणी मोठी गर्दी असती तर भीषण दुर्घटना घडून अनेक निष्पाप प्रवाशांचा जीव गेला असता, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली. त्यामुळे या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी कंत्राटदार, कमीशनखोर, संबंधित अधिकारी आणि जबाबदार यंत्रणेवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

या घटनेनंतर पालकमंत्री, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आणि सार्वजनिक बांधकामाशी संबंधित यंत्रणांवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होऊनही काम इतक्या कमी कालावधीत निकृष्ट ठरत असेल, तर त्याची जबाबदारी नेमकी कोणाची, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.



दरम्यान, प्रशासनाकडून घटनेची पाहणी करण्यात आली असून तांत्रिक तपासणीनंतरच छत कोसळण्याचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. मात्र या घटनेने सार्वजनिक बांधकामांच्या दर्जाबाबत पुन्हा एकदा गंभीर चिंता निर्माण केली असून दोषींवर कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे.

# रस्त्याच्या खड्ड्यांत बसून ग्रामस्थांचा रस्तारोको

## उमरी (मेघे)-मांडवा मार्ग तातडीने दुरुस्त करण्याचा इशारा

**वर्धा जनमाध्यम :** शासन आणि प्रशासनाच्या उदासीन कारभाराविरोधात अखेर झाडगाव, बेलगाव व दिग्रस येथील ग्रामस्थांचा संताप गुरुवारी रस्त्यावर उसळला. उमरी (मेघे)-मांडवा या अत्यंत दयनीय अवस्थेतील रस्त्यावरील जीवघेण्या खड्ड्यांमध्येच बसून नागरिकांनी जोरदार रस्तारोको आंदोलन करत प्रशासनाविरोधात तीव्र घोषणाबाजी केली. अनेकदा निवेदने देऊनही दखल न घेतल्याने अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचा संतप्त सूर यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केला.



उमरी (मेघे)-मांडवा हा सुमारे १६ किलोमीटरचा महत्त्वाचा मार्ग गेल्या अनेक महिन्यांपासून खड्ड्यांनी अक्षरशः विद्रूप झाला आहे. ठिकठिकाणी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. दुचाकीस्वारांना खड्डे चुकविताना कसरत करावी लागत असून अनेक लहान-मोठे अपघात घडल्याचा दावा ग्रामस्थांनी केला. विशेषत रात्रीच्या वेळी खड्डे न दिसल्याने गंभीर अपघाताचा धोका अधिक वाढला आहे.


या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी संबंधित विभागाकडे वारंवार मागणी करूनही केवळ आश्वासनेच मिळाली, प्रत्यक्षात कोणतीही कारवाई झाली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. त्यामुळे संतप्त ग्रामस्थांनी रस्त्यावरील खड्ड्यांत बसून शासन आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेचा निषेध नोंदविला. जोपर्यंत रस्ता दुरुस्त होत नाही, तोपर्यंत आंदोलनाची तीव्रता वाढवू, असा इशाराही त्यांनी दिला.

या आंदोलनामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला. प्रशासनाने तातडीने लक्ष घालून उमरी (मेघे)-मांडवा मार्गाची कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अन्यथा यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला.

आंदोलनात झाडगाव, बेलगाव आणि दिग्रस येथील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# स्वदेशीचा धागा ठरला यशाचा मंत्र, 'कपास ते कपडा'तून ४८ लाखांची कमाई

**वर्धा जनमाध्यम :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी स्वदेशी, स्वावलंबन आणि ग्रामोद्योगाचा दिलेला संदेश आजही सेवाग्राम गांधी आश्रमात प्रत्यक्ष कृतीतून जपला जात आहे. गांधी आश्रम प्रतिष्ठानच्या वतीने सन २०१७ पासून सुरू करण्यात आलेल्या 'कपास ते कपडा' या उपक्रमाने आता यशस्वी वाटचाल केली असून सन २०२५-२६ या वर्षात खादी विक्रीतून तब्बल ४८ लाख रुपयांची उलाढाल झाली आहे. हातमाग दिनानिमित्त हा उपक्रम स्वदेशी आणि स्वयंरोजगाराचा आदर्श ठरत आहे.



सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठान शासनाचा कोणताही निधी स्वीकारत नाही. संस्थेकडे असलेल्या सुमारे १२० एकर शेतीपैकी काही क्षेत्रावर कापसाची लागवड केली जाते. या कापसापासून धागा तयार करून त्याच धाग्यापासून आश्रम परिसरातील 'कपास ते कपडा' युनिटमध्ये हातमागावर खादीचे कापड विणले जाते. सन २०२४-२५ मध्ये सुमारे १४ हजार मीटर खादी तयार करण्यात आली होती. त्यावेळी उत्पादनाची किंमत सुमारे ४२ लाख रुपये होती. त्यानंतर सन २०२५-२६ मध्ये उत्पादनात वाढ होऊन १६ हजार मीटर खादीची निर्मिती करण्यात आली. खादीच्या वाढत्या मागणीमुळे विक्रीतून सुमारे ४८ लाख रुपयांची उलाढाल झाली. स्वदेशी उत्पादनांना मिळणारा वाढता प्रतिसाद आणि गांधी विचारांबाबतची जनजागृती यामुळे या उपक्रमाला नवे बळ मिळत असल्याचे आश्रम प्रशासनाने सांगितले.

### नैसर्गिक रंगांनी खुलते खादीचे सौंदर्य

खादीच्या कापडावर रंगाई आणि छपाईसाठी पूर्णपणे नैसर्गिक रंगांचा वापर केला जातो. खरडा, बेहडा, कथ्था, झेंडूची फुले, कळस फुल, धावरी फुल, रतनज्योतीची साल, इंडिगो आणि सपन यांसारख्या नैसर्गिक घटकांपासून रंग तयार करून पर्यावरणपूरक पद्धतीने खादीला आकर्षक रूप दिले जाते.

### स्थानिक ३० महिलांना मिळाला रोजगार

कपास ते कपडा प्रकल्पामुळे स्थानिक ३० महिलांना कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध झाला आहे. या सर्व महिलांना हातमागाचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले असून त्या कापूस प्रक्रिया, धागा निर्मिती, विणकाम, रंगाई आणि छपाई अशा विविध टप्प्यांमध्ये कार्यरत आहेत. गांधीजींच्या स्वावलंबनाच्या विचाराला प्रत्यक्ष बळ देणारा हा उपक्रम ग्रामीण महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचे प्रभावी उदाहरण ठरत आहे.

# गांजा तस्कराला पीआयटीएनडीपीएसचा झटका

## जिल्ह्यातील पहिलीच कारवाई

**वर्धा जनमाध्यम :** अंमली पदार्थांच्या अवैध व्यापाराला लगाम घालण्यासाठी वर्धा जिल्हा पोलिसांनी ऐतिहासिक आणि कठोर कारवाई करत हिंगणघाट येथील कुख्यात गांजा तस्कर राकेश ऊर्फ भुऱ्या सिद्धार्थ जनबंधु याला पीआयटीएनडीपीएस कायद्यांतर्गत स्थानबद्ध केले आहे. जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच या कायद्याचा वापर करून करण्यात आलेली ही कारवाई अंमली पदार्थांच्या अवैध जाळ्यावर मोठा घाव मानली जात आहे.

टाका ग्राऊंड, हिंगणघाट येथील राकेश जनबंधु याच्याविरुद्ध हिंगणघाट पोलिस ठाण्यात गांजाची विक्री, वाहतूक आणि साठवणूक यासंदर्भातील तब्बल सात गुन्हे नोंद आहेत. यापूर्वी त्याच्यावर वारंवार प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्रही घेण्यात आले. मात्र, त्याच्या गुन्हेगारी प्रवृत्तीत कोणताही बदल झाला नाही. उलट अंमली पदार्थांच्या अवैध धंद्यात तो पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता पोलिसांनी नोंदविली.

त्याचा गुन्हेगारी इतिहास, जामिनावर सुटल्यानंतर पुन्हा अवैध धंद्यात उतरण्याची शक्यता आणि समाजासाठी निर्माण होणारा धोका लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल व अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पीआयटीएनडीपीएस कायद्यांतर्गत स्थानबद्धतेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांनी ५ ऑगस्ट रोजी प्रस्तावाला मंजुरी दिल्यानंतर पोलिसांनी तातडीने आरोपीला ताब्यात घेतले. त्याची अमरावती कारागृहात रवानगी करण्यात आली.

जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या साखळीवर निर्णायक प्रहार करण्याच्या दृष्टीने ही कारवाई अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. भविष्यातही मादक पदार्थांची विक्री, वाहतूक आणि साठवणूक करणाऱ्यांविरुद्ध अशाच कठोर कारवाया सुरू राहतील, असा स्पष्ट इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

### एसडीपीओंची मेहनत ठरली निर्णायक

पीआयटीएनडीपीएस अंतर्गत स्थानबद्धतेचा प्रस्ताव तयार करणे ही अत्यंत गुंतागुंतीची आणि कायदेशीरदृष्ट्या कठोर प्रक्रिया मानली जाते. हिंगणघाटचे उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या नेतृत्वाखाली उमाकांत लडके, रविंद्र घाटुले, संतोष वाघमारे, अनंत हराळ, भारत बुटलेकर आणि दीपक मस्के यांनी सर्व पुरावे, गुन्हे आणि कागदपत्रांची साखळी भक्कम करत प्रस्ताव तयार केला. शासनाने त्यास मंजुरी दिल्यानंतर जिल्ह्यात प्रथमच पीआयटीएनडीपीएस कायद्यांतर्गत स्थानबद्धतेची कारवाई यशस्वीपणे पार पडली. ही कारवाई वर्धा जिल्ह्यातील अंमली पदार्थविरोधातील मोहिमेतील महत्त्वाचा टप्पा मानली जात आहे.

# क्षुल्लक वादातून निर्घृण हत्या, पुरावा लपविण्यासाठी मृतदेह नदीत फेकला

**खरांगणा पोलिसांची कारवाई, दोघांना अटक**

**आंजी (मो.) जनमाध्यम :** नजीकच्या पेठ येथील मोहन पुंडलिक ठाकरे (वय ५५) यांची क्षुल्लक कारणावरील वादातून मारहाण करून निर्घृण हत्या करण्यात आली. त्यानंतर गुन्ह्याचा पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्यांचा मृतदेह धाम नदीच्या पात्रात फेकण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी खरांगणा पोलिसांनी तत्पर कारवाई करत दोन आरोपींना अटक केली असून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी संतोष बावणे (वय ३०) रा. आंजी (मोठी) आणि चिंटू कासार (वय ३५) रा. पेठ यांना अटक करण्यात आली आहे. दोघांविरुद्ध हत्या तसेच पुरावा नष्ट करण्याचा गुन्हा खरांगणा पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.



गुरुवारी धाम नदीच्या पात्रात संशयास्पद अवस्थेत एका व्यक्तीचा मृतदेह आढळल्याची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहाची पाहणी करताना मोहन ठाकरे यांच्या डोक्यावर व शरीरावर गंभीर मारहाणीच्या जखमा आढळून आल्याने पोलिसांचा संशय अधिक बळावला. त्यानंतर पोलिसांनी तांत्रिक व गोपनीय पद्धतीने तपासाची चक्रे फिरविली. तपासादरम्यान मोहन ठाकरे यांची मारहाण करून हत्या करण्यात आल्याचे निष्पन्न झाले. तसेच गुन्ह्याचा माग काढता येऊ नये आणि पुरावे नष्ट व्हावेत, या उद्देशाने आरोपींनी मृतदेह नदीत फेकल्याचेही समोर आले. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी दोन्ही संशयितांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता गुन्ह्याचा उलगडा झाला.

या घटनेमुळे आंजी व परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. प्रकरणाचा पुढील तपास खरांगणा पोलिस ठाण्याचे ठाणेदार चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक दीपक सोळंके करीत आहेत.

# बसफेरी कोलमडताच विद्यार्थ्यांचा रापम आगारावर धडक मोर्चा



**आर्वी जनमाध्यम :** आर्वी-सर्कसपूर मार्गावरील सकाळी १० वाजताची बसफेरी सलग चार-पाच दिवसांपासून पुन्हा अनियमित झाल्याने संतप्त विद्यार्थ्यांनी गुरुवारी आर्वी येथील राज्य परिवहन महामंडळाच्या आगारावर धडक देत आगार प्रमुखांना त्यांच्या दालनातच घेराव घातला. निखिल कडू यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनामुळे आगारात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. अखेर आगार प्रमुखांनी बससेवा नियमित करण्याचे ठोस आश्वासन दिल्यानंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेतले.

सर्कसपूर परिसरातील शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दररोज बसच्या अनियमिततेचा फटका बसत आहे. सकाळी १० वाजताची बस वेळेवर न आल्याने विद्यार्थ्यांचे तास बुडत असून शैक्षणिक नुकसान होत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. यापूर्वीही प्रशासनाने बससेवा नियमित करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र त्याची अंमलबजावणी न झाल्याने विद्यार्थ्यांचा संताप अनावर झाला.

विद्यार्थ्यांची समस्या ऐकून घेतल्यानंतर आगार प्रमुख अनंत ताटर यांनी संबंधित बसफेरी तातडीने नियमित करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असे स्पष्ट आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला दिलेल्या मुदतीत सुधारणा करण्याची अपेक्षा व्यक्त करत आंदोलन मागे घेतले. मात्र, आश्वासनाची पूर्तता झाली नाही तर अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही विद्यार्थ्यांनी यावेळी दिला.

# अमृतवृक्ष' मोहिमेत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अव्वल

## ३०० कोटी वृक्षलागवड अभियानाला वेग, जिल्ह्यात ४३ हजार वृक्षांची डिजिटल नोंद

**वर्धा जनमाध्यम :** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि राज्यातील वनक्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत वाढविण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने हाती घेतलेल्या ३०० कोटी वृक्षलागवड अभियानाला वर्धा जिल्ह्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे. विविध शासकीय विभाग, ग्रामपंचायती, शैक्षणिक संस्था आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली जात असून, या वृक्षांची नोंद वन विभागाने विकसित केलेल्या 'अमृतवृक्ष' ॲपवर केली जात आहे. आतापर्यंत जिल्ह्यात ४३ हजारांहून अधिक वृक्षलागवडीची नोंद झाली असून, या डिजिटल नोंदणीमध्ये राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने सर्वाधिक वृक्षलागवडीची नोंद करून आघाडी घेतली आहे.

राज्य शासनाने यंदा पर्यावरण संवर्धनाला सर्वोच्च प्राधान्य देत प्रत्येक विभागाला वृक्षलागवडीचे उद्दिष्ट निश्चित करून दिले आहे. त्यानुसार वर्धा जिल्ह्यातही विविध विभागांकडून पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड सुरू आहे. केवळ रोपे लावणे एवढ्यावरच न थांबता प्रत्येक वृक्षाची डिजिटल नोंद करण्याची जबाबदारी संबंधित विभागांवर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे वृक्षलागवडीचे नियोजन, पडताळणी आणि पुढील देखरेख अधिक प्रभावी होणार असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी यापूर्वी सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन अभियानाचा आढावा घेतला होता.




प्रत्येक विभागाला ठराविक उद्दिष्ट देत लागवडीनंतर 'अमृतवृक्ष' ॲपवर नोंद करणे अनिवार्य करण्यात आले. या प्रणालीमुळे प्रत्येक रोपाचे स्थान, संख्या आणि संबंधित विभागाची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होत आहे.


या अभियानाला बळकटी देण्यासाठी सामाजिक वनीकरण विभागाने आतापर्यंत विविध शासकीय विभागांना सुमारे सहा लाख विविध प्रजातींची रोपे वितरित केली आहेत. रस्त्यांच्या कडेला, शासकीय कार्यालयांच्या परिसरात, शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत हद्द तसेच सार्वजनिक ठिकाणी वृक्षलागवड करण्यात येत आहे. लावलेल्या रोपांचे संगोपन करण्यावरही प्रशासनाने भर दिला असून, केवळ लागवड नव्हे तर वृक्ष जगविण्यावरही विशेष लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

अमृतवृक्ष ॲपवरील नोंदीनुसार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने १७ हजार १७९ वृक्षांची नोंद करून प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याखालोखाल वस्त्रोद्योग व रेशीम उद्योग विभागाने १६ हजार ५०० वृक्षांची नोंद केली आहे. ग्रामपंचायतींकडून ७ हजार ६१२, गृह विभागाकडून १ हजार १२५, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून ३४७, शालेय शिक्षण विभागाकडून १५०, ९ वृक्षांची नोंद करण्यात आली आहे.

# कुणबी प्रमाणपत्र वाद पुन्हा पेटला !

**बीड/प्रतिनिधी-** मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी कुणबी प्रमाणपत्र रद्द करण्यासाठी सरकार कट रचत असल्याचा आरोप केला आहे. चार मराठा लोकप्रतिनिधींचे कुणबी दाखले अवैध ठरल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, चंद्रशेखर बावनकुळे आणि राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर जोरदार टीका केली.कुणबी नोंदी, जात वैधता प्रमाणपत्र तसेच इतर मुद्यांना घेउन मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी सरकरला पुन्हा एकदा घेरले आहे. तसेच मराठा समाजावर अन्याय सुरु आहे, आता सरकारविरोधात मोठी लाट येणार आहे, असा थेट इशारा मनोज जरांगे यांनी दिली. मराठवाड्यातील कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळवलेल्या चार मराठा लोकप्रतिनिधींचे जात पडताळणी समितीने दाखले अवैध ठरवल्यानंतर हा मुद्दा पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे.

याप्रकरणी प्रतिक्रिया देताना जरांगे म्हणाले की सरकार जाणीवपूर्वक मला एकटे पाडण्याचा प्रयत्न करत आहे. कुणबी प्रमाणपत्र रद्द करण्यामागे नियोजनबद्ध कट असल्याचे चित्र दिसत आहे. मराठा समाजाच्या हक्कांवर गदा आणण्याचा हा प्रयत्न आहे.मराठवाड्यातील चार लोकप्रतिनिधींच्या कुणबी प्रमाणपत्रांबाबत जात पडताळणी समितीने घेतलेल्या निर्णयानंतर मराठा समाजात संतापाची



भावना निर्माण झाली आहे. या निर्णयामुळे मराठा समाजाला मिळालेल्या कुणबी नोंदी आणि त्यासंदर्भातील प्रमाणपत्रांचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.यावेळी मनोज जरांगे यांनी राज्यातील महायुती सरकारवर जोरदार टीका करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावरही निशाणा साधला. आक्रमक भाषण करताना त्यांनी इशारा दिला की, तुमच्यापेक्षा उद्धव ठाकरे बरे म्हणायची वेळ आणू नका. या वक्तव्यामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे.जरांगे यांनी सरकारने मराठा समाजाच्या मागण्यांकडे गांभीर्याने पाहावे, कुणबी प्रमाणपत्रांबाबत स्पष्ट भूमिका घ्यावी आणि समाजात संभ्रम निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी, अशी मागणी केली. दरम्यान, जात पडताळणी समितीच्या निर्णयानंतर मराठा आरक्षण आणि कुणबी प्रमाणपत्रांचा मुद्दा पुन्हा तापण्याची चिन्हे दिसत असून, यावर सरकारची पुढील भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

**ज्योती शिंदे यांचे कुणबी प्रमाणपत्र अवैध-**जिल्हा परिषद सदस्या ज्योती शिंदे यांचे कुणबी प्रमाणपत्र अवैध ठरवण्यात आले आहे. यावरही मनोज जरांगे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. त्यांच्या रक्ताची नोंद सापडली आहे. मग आता सरकारला त्यांचे प्रमाणपत्र रद्द करण्याचा अधिकार नाही. ओबीसींचे प्रमाणपत्र रद्द केले जात नाहीत. मराठा समाजावर अन्याय का केला जातोय, हा मोठा प्रश्न आहे. सरकारने जाणीवपूर्वक मराठ्यांवर अन्याय केला आहे. हे आता मराठ्यांना समजलंय, असा हल्लाबोल जरांगे यांनी केला.

## सीजेपीकडून सप्टेंबरमध्ये 'क्या बोलती पब्लिक' अभियानाची घोषणा

**मुंबईः** देशात सुशिक्षित बेरोजगारांपैकी ८० टक्के लोकांकडे पदव्या आहेत. लहानपणापासून मेहनत करून डिग्री घेणा-या तरुणांना आता 'आम्ही शिकून काही चूक केली का?' असा प्रश्न पडत आहे, कारण ज्यांनी कधी फार्मल डिग्री घेतली नाही ते लोक सरकार



चालवत आहेत, अशा शब्दांत 'काकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजित दिपके यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. आगामी काळात बेरोजगारी हा राजकीय आणि निवडणुकीचा मुख्य मुद्दा बनवण्याचा इशाराही त्यांनी दिला.

**'क्या बोलती पब्लिक' राष्ट्रीय अभियान-** सध्याचे राजकीय पक्ष जनतेपासून पूर्णपणे 'डिस्कनेक्ट' झाले असल्याचा आरोप करत दिपके यांनी अभियानाची घोषणा केली. काकरोच जनता पार्टी येत्या सप्टेंबर महिन्यात 'क्या बोलती पब्लिक' हे राष्ट्रीय अभियान सुरू करणार आहे. देशभरात दौरा करून लोकांच्या समस्या, अपेक्षा आणि त्यांच्या भावना प्रत्यक्ष समजून घेणे, कारण सध्या लोकांचे ऐकून घेण्यास कोणीही तयार नाही. देशातील शिक्षण व्यवस्थेवर बोलताना ते म्हणाले, पहिली-दुसरीच्या मुलांसाठी वार्षिक फी १ ते १.५ लाख रुपये झाली असून प्रायव्हेट शाळांचे डोनेशन आणि कोचिंग क्लासेसमुळे पालकांवर मोठा आर्थिक बोजा पडत आहे. सरकारला फक्त 'हिंदू-मुसलमान' हा एकच मुद्दा दिसतो. मात्र बेरोजगारी, बिकट आर्थिक परिस्थिती आणि शिक्षणाचा उडालेला बोगस कारभार यावर कोणीही बोलायला तयार नाही.

## एसटी कर्मचा-यांच्या सोशल मीडिया वापरावर कडक निर्बंध

**मुंबई / प्रतिनिधी-** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने आपल्या कर्मचा-यांसाठी सोशल मीडिया वापराबाबत नवी आचारसंहिता जाहीर केली आहे. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी जारी केलेल्या अधिकृत परिपत्रकानुसार, कर्मचा-यांनी ऑन-ड्यूटी अथवा गणवेशात असताना रील्स, व्हिडिओ किंवा लाईव्ह स्ट्रीमिंग केल्यास त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल.



एसटीची प्रतिमा मलिन होण्यापासून रोखणे आणि सुरक्षेचे नियम पाळणे हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे.


नवीन नियमांनुसार चालक, वाहक आणि इतर कर्मचा-यांना एसटी बस, आगार, बसस्थानक किंवा कार्यालयीन परिसरात गणवेशात व्हिडिओ अथवा रील्स बनवण्यास पूर्णपणे मनाई करण्यात आली आहे. वाहन चालवताना शार्ट्स, रील्स किंवा लाईव्ह स्ट्रीमिंग करण्यावर सक्त बंदी घालण्यात आली असून महामंडळाशी संबंधित गोपनीय माहिती, संवेदनशील फोटो किंवा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करण्यास अटकाव करण्यात आला आहे. सकारात्मक आशयाचे व्हिडिओ पोस्ट करायचे असल्यास संबंधित सक्षम अधिका-यांची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य राहील. नियम मोडणा-या कर्मचा-यांना कारणे दाखवा नोटीस बजावून शिस्तभंगाची कारवाई केली जाईल. दुसरीकडे, सोशल मीडियावर सक्रिय असणा-या कर्मचा-यांच्या कौशल्याचा वापर महामंडळाच्या हितोद्देशासाठी करून घेण्याची योजना आखण्यात आली आहे. प्रवासी सुविधा, स्वच्छता मोहीम, लोककल्याणकारी उपक्रम आणि रस्ते सुरक्षेचा प्रसार करण्यासाठी एसटीतील इन्फ्लुएन्सर कर्मचा-यांना नियमांच्या अधीन राहून प्रोत्साहन दिले जाईल. यासाठी विभाग स्तरावर संवाद बैठका घेउन कर्मचा-यांना अधिकृत माहिती पुरवली जाईल. तसेच, मध्यवर्ती कार्यालयाच्या जनसंपर्क शाखेकडे अशा सक्रिय कर्मचा-यांची माहिती संकलित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## पाकमध्ये हिंसाचार, बहिष्कारानंतरही 56 टक्के मतदान

**रावलकोट :** पाकिस्तानने बळकावलेल्या काश्मीरमध्ये गेल्या काही महिन्यांपासून मोठा उठाव सुरु आहे. आंदोलकांवर गोळाबार केला जात आहे, मोठ्या प्रमाणावर आंदोलक रस्त्यावर उतरले आहेत, अशातच पाकिस्तानने या भागात निवडणूक घेतली आहे. एवढी आंदोलने आणि हिंसाचार होउनही पीओकेमध्ये सत्ताधारी नवाज शरीफ यांच्या पक्षाला सत्तेत बसण्याची संधी मिळण्याचे संकेत आहेत. पाकिस्तानने बळकावलेल्या काश्मीर मधील विधानसभा निवडणुकीत पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांच्या पाकिस्तान मुस्लिम लीग-नवाज या पक्षाने मुसंडी मारली आहे. पहिल्या दोन टप्प्यांतील ३४ पैकी २४ जागांवर दणदणीत विजय मिळवत पीएमएल-एम ने सत्ता स्थापनेच्या दिशेने स्पष्ट बहुमत मिळवले आहे. पाकिस्तानने निर्बंध लादलेली संघटना जीइंट अवामी ॲक्शन कमिटीने निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन करूनही स्थानिक नागरिकांनी मोठया संख्येने मतदानात सहभाग नोंदवला व ५६ टक्के मतदान केले आहे. सुरक्षेची कारणे आणि मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर पीओके मधील निवडणुका ३ टप्प्यांत घेतल्या जात आहेत. पहिला व दुसरा टप्प्यात ३४ जागांवर मतदान आणि मतमोजणी पूर्ण झाली आहे, ज्यामध्ये पीएमएल-एन ने २४ जागांवर विजय मिळवला आहे. उर्वरित ११ जागांसाठी १० ऑगस्ट रोजी मतदान होणार आहे. अनेक भागात ५० टक्क्यांहून अधिक, तर राजधानी मुझफ्फराबादमध्ये ५६ टक्क्यांहून अधिक मतदान झाले. निवडणूक प्रचारादरम्यान जेएएसी या संघटनेने सातत्याने निदर्शने केली आणि जनतेला मतदानावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले. कायदा व सुव्यवस्थेचे कारण देत प्रांतीय सरकारने या संघटनेवर बंदी घातली होती. मतदानापूर्वी आंदोलक आणि पोलिसांमध्ये अनेक ठिकाणी हिंसक चकमकी झाल्या, तरीही नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला.

## 60 व्यापारी जहाजे भारतात

**नवी दिल्ली :** मध्य पूर्वेतील अत्यंत महत्त्वाच्या आणि मोक्याच्या मानल्या जाणा-या होर्मुज सामुद्रधुनीच्या मार्गावरील जहाजांच्या वाहतुकीबाबत भारताला दिलासा देणारी महत्त्वाची बातमी समोर आली आहेत. होर्मुज सामुद्रधुनीतून ६० मोठी व्यापारी जहाजे सुरक्षितपणे बाहेर पडली असून भारतापर्यंत पोहोचली आहेत. तसेच ३९७२ खलाशांना सुरक्षितपणे परत आणण्यात आले आहे. संसदेतील एका प्रश्नाला उत्तर देताना केंद्र सरकारने सांगितले की, आखाती प्रदेशातून ३,९७२ भारतीय खलाशांना परत आणण्यात आले, तर एका



२४ तास कार्यरत असलेल्या संकट व्यवस्थापन प्रणालीने हजारो कॉल्स आणि ईमेल्स हाताळले. होर्मुजच्या सामुद्रधुनीतून ६० व्यापारी जहाजे बाहेर काढण्यात आली असून ती भारतात सुखरूप पोहोचली आहेत. सरकारने या मोहिमेसाठी विशेष योजना आखली होती. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी खलाशांना संपूर्ण प्रशिक्षण देण्यात आले होते.मंत्रालयाने म्हटले आहे की, होर्मुजच्या सामुद्रधुनीतून होणा-या सागरी प्रवासाबाबत मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्यात आली होती. त्यामुळे भारतीय प्रवशांना धोकादायक कामे करण्याबाबत दबाव नव्हता. संघर्षग्रस्त क्षेत्रांमध्ये, संबंधित खलाशाच्या संमतीने केवळ आपत्कालीन परिस्थितीतच कर्मचारी बदलास परवानगी आहे. स्थलांतर आणि मायदेशी परत आणण्याच्या कार्यांमध्ये समन्वय साधण्यासाठी, एक समर्पित २४७७ नियंत्रण कक्ष आणि नौवहन महासंचालनालयाचे सागरी क्षेत्र जागरूकता केंद्र अहोरात्र कार्यरत आहेत. नियंत्रण कक्षाने खलाशी, त्यांचे कुटुंबीय आणि सागरी क्षेत्राशी संबंधित इतर लोकांकडून आलेले १५,७७१ फोन कॉल्स आणि ३६,४९९ ईमेल्स हाताळले आहेत. भारतीय खलाशांची नियुक्ती परवानाधारक भरती आणि नियुक्ती सेवा एजन्सी मार्फत केली जाते. प्रमाणित नियामक मंजुरीशिवाय कोणताही खलाशी इमिग्रेशन क्लिअरन्स पूर्ण करू शकत नाही.

## डोनाल्ड ट्रम्प यांच्या सुरक्षेत चूक

**वॉशिंग्टन डीसी :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हवाई सुरक्षेत मोठी चूक घडल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. ट्रम्प यांना घेउन जाणारे अमेरिकेचे अतिमहत्त्वाचे मरीन वन हेलिकाप्टर वाशिंग्टन डीसीच्या आकाशात एका कमर्शियल जेटच्या अत्यंत जवळ आल्याची खळबळजनक घटना घडली. या दोन्ही विमानांमधील अंतर धोक्याच्या पातळीपर्यंत कमी झाल्यामुळे मोठी दुर्घटना होता होता टळली असून याप्रकरणी आता फेडरल एविएशन एडमिनिस्ट्रेशनने उच्चस्तरीय



तपास सुरू केला आहे. मंगळवारी दुपारी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना घेउन एका मिलिट्री हेलिकाप्टरने व्हाईट हाउसजवळून उड्डाण केले. दरम्यान, एअर ट्रॅफिक कंट्रोलरच्या चुकीमुळे उत्तर व्हर्जिनियाच्या रोनाल्ड रीगन नॅशनल एअरपोर्टवरील कमर्शियल उड्डाणे वेळेत रोखता आली नाहीत. याचदरम्यान, फ्लोरिडाच्या दिशेने जाणारे एक पॅसेंजर जेट आणि राष्ट्रपतींचे मरीन वन हेलिकाप्टर एकमेकांच्या अत्यंत जवळ आले. या लास ऑफ सेपरेशन घटनेमुळे विमानतळावरील सुरक्षा यंत्रणांची झोप उडाली आहे. गेल्या वर्षी जानेवारी महिन्यात देशाच्या राजधानीत एका कमर्शियल विमान आणि सैन्याच्या ब्लॅक हाक हेलिकाप्टरमध्ये भीषण टक्कर झाली होती, ज्यामध्ये ६७ जणांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेनंतर अमेरिकन प्रशासनाने विमान सुरक्षेचे नियम अत्यंत कडक केले होते. नव्या नियमांनुसार, विमानतळांच्या परिसरात विमानांमध्ये किमान १.५ मैल आणि ५०० फूट (व्हर्टिकल) अंतर असणे बंधनकारक आहे. मात्र, या घटनेत हे निश्चित अंतर राखले गेले नसल्याचे समोर आले आहे. या संपूर्ण प्रकरणावर स्पष्टीकरण देताना व्हाईट हाउसचे प्रवक्ता कुश देसाई यांनी सांगितले की, मरीन वन हेलिकाप्टर जगातील सर्वोत्तम आणि अनुभवी पायलट्सद्वारे चालवले जाते. या संपूर्ण प्रवासात राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांना कोणत्याही प्रकारचा धोका निर्माण झाला नव्हता. दुसरीकडे, फेडरल एविएशन एडमिनिस्ट्रेशनने आपल्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, ते या सुरक्षेतील त्रुटीची कसून चौकशी करत आहेत. प्राथमिक तपासात जरी विमान आपांपसात आदळण्याच्या स्थितीत नसले, तरी सुरक्षेच्या दृष्टीने ही एक मोठी चूक मानली जात आहे. या घटनेच्या वेळी आणखी एक तिसरे विमानही परिसराच्या अगदी जवळ आले होते, ज्यामुळे हवाई सुरक्षेवर पुन्हा एकदा मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## 2.8 कोटी बसचे भाडे थकवले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृह मंत्री अमित शहा यांच्या कार्यक्रमासाठी वापरण्यात आलेल्या राज्य परिवहन मंडळाच्या ५५४ बसेसचा खर्च अद्याप देण्यात आलेला नाही. त्यासंदर्भात उत्तराखंड रोडवेज कर्मचारी संघाने देहरादूनच्या जिल्हाधिका-यांना पत्र पाठवलं आहे. एकूण २ कोटी ८२ लाख ८९१ रुपये थकले असून ते लवकरात लवकर देण्यात यावेत अशी मागणी पत्रातून करण्यात आली आहे. परिवहन मंडळ आधीच आर्थिक संकटात असून थकित रकमेमुळे मंडळावर दबाव वाढला असल्याचे उत्तराखंड रोडवेज कर्मचारी संयुक्त परिषदेने पत्रात नमूद केले आहे. प्रकरण केवळ थकित बिलाचा नाही. उत्तराखंड रोडवेज कर्मचारी संयुक्त परिषदेने त्यांच्या पत्रात कर्मचा-यांच्या थकित वेतनाचा मुद्दाही उपस्थित केला आहे. एप्रिल २०२५ पासून नियमित वेतन मिळालेले नाही. निवृत्त कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन सप्टेंबर २०२५ पासून रखडलेले आहे, असा उल्लेख पत्रात करण्यात आला आहे. डिझेल, सुटे भाग, दैनंदिन खर्च चालवताना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे परिषदेने पत्रात नमूद केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने या प्रकरणी राज्य सरकारला पत्र लिहिले आहे. पण प्रोटोकाल



विभागाने नियमावलीचा दाखला देत बिल देण्यास नकार दिला. परिषदेचे विभागीय अध्यक्ष मुकेश नैथानी यांनी १६ जून २०२६ रोजी पत्र पाठवण्यात आले. त्यानुसार ७ मार्च २०२६ जन-जन की सरकार, ४ साल बेमिसाल कार्यक्रमात आलेल्या लाभार्थ्यांच्या वाहतुकीसाठी परिवहन विभागाच्या २९९ बस वापरण्यात आल्या. यासाठीचे १ कोटी ४४ लाख २ हजार ४३१ रुपये अद्याप थकलेले आहेत. त्या सोबतच १४ एप्रिल २०२६ रोजी पंतप्रधान मोदी यांच्या उत्तराखंड दौ-यासाठी विविध आगाराच्या २५५ बस उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. त्या चालवण्यासाठी १ कोटी ३८ हजार १८ हजार ४६० रुपयांचा खर्च आला. पण तो खर्चही अद्यापपर्यंत देण्यात आलेला नाही. याबद्दल संबंधित विभागांना आधीच बिल पाठवण्यात आले असून मुख्य विकास अधिकारी कार्यालयानेदेखील आवश्यक कार्यवाहीच्या सूचना दिल्या असल्याचा दावा परिषदेने केला आहे. मात्र यानंतर बिल थकलेलीच आहेत. रखडलेली रक्कम प्राधान्याने देण्यात यावी. जेणेकरुन कर्मचा-यांना योग्य वेळी वेतन, निवृत्त कर्मचा-यांना एका निश्चित दिवशी पेन्शन देणे शक्य होईल, असे परिषदेने जिल्हाधिका-यांना सांगितले आहे. प्रशासनाने बिल थकवल्याने परिवहन मंडळांच्या दैनंदिन कामकाजावरही परिणाम होत असल्याचे पत्रात नमूद करण्यात आलेले आहे.

## कर्जमुक्ती योजनेतील जाचक अटी रद्द करा

**छ. संभाजीनगर/प्रतिनिधी-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत शेतक-यांवर लादण्यात आलेल्या ॲग्रीस्टॅक नोंदणी व ई-केवायसीच्या जाचक अटी तातडीने रद्द कराव्यात, अन्यथा तालुकाभर तीव्र शेतकरी आक्रोश आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा गंगापूर तालुका काँग्रेस कमिटीने दिला आहे.



या मागणीसंदर्भात काँग्रेसच्या शिष्टमंडळाने तहसीलदारांना निवेदन देउन शासनाच्या धोरणाचा निषेध नोंदविला.

निवेदनात म्हटले आहे की, महसूल विभागाकडे ७/१२, ८-अ, डिजिटल ई-पीक पाहणी तसेच बँकांकडे शेतक-यांच्या खात्यांची व आधारची माहिती आधीपासून उपलब्ध असताना पुन्हा ॲग्रीस्टॅक नोंदणी आणि ई-केवायसीची सक्ती करणे म्हणजे शेतक-यांना विनाकारण वेठीस धरण्याचा प्रकार आहे. कर्जमाफीची अंमलबजावणी लांबणीवर टाकण्यासाठीच शासनाने हा तांत्रिक अडथळा निर्माण केल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे.

ग्रामीण भागात इंटरनेट सेवा खंडित होणे, सर्व्हर सतत डाउन राहणे, ओटीपी मिळणे तसेच बायोमेट्रिक प्रमाणीकरणात येणा-या अडचणींमुळे गंगापूर तालुक्यातील हजारो शेतकरी न महा-ई-सेवा केंद्रांवर हेलपाटे मारत असून मोठ्या मनस्तापाला सामोरे जात असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

काँग्रेसने शासनाकडे ॲग्रीस्टॅक नोंदणी व ई-केवायसीची अट तत्काळ रद्द करणे, उपलब्ध नोंदींच्या आधारे सर्व पात्र शेतक-यांच्या खात्यात डीबीटीद्वारे कर्जमुक्तीची रक्कम जमा करणे तसेच तांत्रिक अडचणी लक्षात घेउन ऑफलाइन अर्ज स्वीकारण्याची व्यवस्था सुरू करण्याची मागणी केली आहे.

## शब्दाला किंमत असते; अर्थ खाते राष्ट्रवादीकडे द्या!

**छ. संभाजीनगर / प्रतिनिधी-** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर राज्याचे अर्थ खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्पुरते स्वतःकडे ठेवले होते. अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर हे खाते पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसकडे दिले जाईल, असे त्यावेळी सांगण्यात आले होते. मात्र अधिवेशन संपले तरी अर्थ खाते अद्याप मुख्यमंर्त्यांकडेच असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून या खात्यासाठी जोरदार मागणी केली जात आहे. अमोल मिटकरी यांनी केलेल्या या पोस्टमुळे अर्थ खाते राष्ट्रवादी काँग्रेसकडे देण्याच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार अमोल मिटकरी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक्सवरील पोस्टद्वारे दिलेल्या आश्वासनाची आठवण करून दिली आहे. महायुतीतील विश्वास आणि परस्पर सन्मान कायम राखण्यासाठी अर्थ खाते राष्ट्रवादी काँग्रेसकडे सोपवावे, अशी त्यांनी मागणी केली आहे.अमोल मिटकरी यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांच्याकडे अर्थ खात्याची जबाबदारी सोपवली होती आणि त्यांनी ती सक्षमपणे सांभाळली. त्यानंतर अजित पवार यांच्या



निधनानंतर अर्थ खाते तात्पुरते मुख्यमंर्त्यांकडे ठेवण्यात आले. मात्र अर्थसंकल्प मांडल्यानंतर ही जबाबदारी सुनेत्रा पवार यांच्याकडे दिली जाईल, असे मुख्यमंत्री स्वतः जाहीरपणे म्हणाले होते. त्यामुळे या खात्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचाच हक्क असल्याचे त्यांनी नमूद केले.

**शब्द पाळणे ही परस्पर सन्मानाशी संबंधित बाब-** मिटकरी यांनी पुढे म्हटले की, अजित पवार यांच्यावर प्रेम करणा-या लाखो कार्यकर्त्यांच्या मनात आजही या आश्वासनाबाबत अपेक्षा आणि वेदना आहे. महायुतीतील प्रत्येक घटक पक्षाचा स्वाभिमान जपला गेला पाहिजे. राष्ट्रवादी काँग्रेसनेही सरकार मजबूत ठेवण्यासाठी सातत्याने जबाबदारीने साथ दिली आहे. त्यामुळे दिलेला शब्द पाळणे ही केवळ राजकीय बाब नसून विश्वास, पारदर्शकता आणि परस्पर सन्मानाशी संबंधित बाब आहे.

**राष्ट्रवादीच्या इतर आमदारांनाही आवाहन-**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेसबाबत दिलेले आश्वासन पूर्ण करून अर्थ खाते पक्षाकडे सोपवावे. त्यामुळे महायुतीतील विश्वास अधिक दृढ होईल आणि कार्यकर्त्यांच्या मनातील संभ्रम दूर होईल, अशी विनंतीही त्यांनी केली. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व आमदारांनी पक्षाच्या स्वाभिमानासाठी कार्यकर्त्यांच्या भावना मुख्यमंर्त्यांपर्यंत पोहोचवाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले.

## माफिया अतीक अहमदच्या मुलाचा अपघाती मृत्यू

**झाशी :** झाशी-कानपूर राष्ट्रीय महामार्गावर गुरुवारी सकाळी भीषण अपघात झाला. या अपघातात माफिया आणि माजी खासदार अतीक अहमदच्या मुलाचा मृत्यू झाला आहे. अबान अहमद असे त्याचे नाव असून अबानच्या एका सहका-याचाही मृत्यू



झाला आहे. कारमधील इतर तिघे जण गंभीर जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, अबान अहमद त्याच्या मित्रांसोबत झाशी तुरुंगामध्ये असलेला त्याचा भाउ अली अहमद याला भेटण्यासाठी गेला होता. भावाला भेटून परत येताना कानपूर-झाशी महामार्गावर पूंछ पोलिस ठाण्याजवळ त्यांच्या कारचा अपघात झाला. कार अनियंत्रित होउन डिव्हायडरला धडकली. धडक इतकी भीषण होती की कारच्या पुढच्या भागाचा पूर्णपणे चक्काचूर झाला. अपघाताच्या वेळी कारमध्ये एकूण पाचजण होते. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली. जखमींना जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, यावेळी डाक्टरांनी अबान अहमद आणि सोनू यांना मृत्यू घोषित केले. तसेच उमर अहमद, मोहम्मद जैद आणि असलम हे तिघे गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी झाशी मेडिकल कॉलेजमध्ये दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून मदतकार्य सुरू केले.

## शेतक-यांच्या शुद्ध पनीरला वाढली मागणी; ॲनालाग पनीरबंदीचे दुग्ध उद्योगाकडून स्वागत

**मुंबई /प्रतिनिधी-**राज्याच्या अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी ॲनालाग किंवा दुग्धविरहित पनीरचे उत्पादन, प्रक्रिया, तयारी, पॅकिंग, साठवण, वितरणावर एक वर्षासाठी बंदी घालण्याच्या आदेशाचे दुग्ध वर्तुळातून स्वागत



करण्यात येत आहे. यामुळे दुधापासूनच्या शुद्ध पनीरला चांगले दिवस येण्याची आशा निर्माण झाली असून, पनीर बनविण्यासाठी दूध खरेदीस स्पर्धा निर्माण होईल. त्यातून शेतक-यांनाही वाजवी दर मिळणे अपेक्षित असून, ॲनालाग पनीरवर कायमस्वरूपी बंदी घालण्याचीही मागणी होत आहे.

राज्य दूध उत्पादक व प्रक्रिया कल्याणकारी संघाच्या शिष्टमंडळाने सर्वप्रथम मुंढे यांची मुंबई येथे भेट घेउन ॲनालाग पनीरवर बंदी घालण्याची मागणी केली होती. याची दखल घेतल्याने या कल्याणकारी संघाकडून निर्णयाचे स्वागत असल्याची प्रतिक्रिया अध्यक्ष गोपाळराव म्हस्के यांनी दिली. ते म्हणाले, २०० रुपये किलोने स्वस्त मिळणा-या ॲनालाग पनीरच्या उपलब्धतेमुळे त्याचा खप राहत असे. साहजिकच डेअ-यांकडील दुधापासूनच्या शुद्ध पनीरला तुलनेने मागणी कमी राहत असे. या पनीरचा भाव सरासरी ४०० रुपये किलो आहे.

## मला नियम शिकवू नका!; मल्लिकार्जुन खर्गे किरेन रिजिजू यांच्यावर भडकले; राज्यसभेत जोरदार राडा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सध्या संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. सरकार आणि विरोधी पक्षांमधील वाद अद्यापही संपताना दिसत नाही. यातच, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू आणि विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांच्यात गुरुवारी राज्यसभेत संसदेच्या नियमांवरून जबरदस्त खडाजंगी बघायला मिळाली.

**'मी काय बोलायचे हे तुम्ही सांगणार?'** - किरेन रिजिजू यांच्या एका वक्तव्यावर खर्गे अतिशय आक्रमक झाले. ते म्हणाले, 'आता मला रिजिजूंकडून नियम शिकावे लागतील का? मलाही संसदेचे नियम माहीत आहेत. मी सभागृहात काय बोलावे, कधी बोलावे आणि कसे बोलावे, हा माझा अधिकार आहे. तुम्ही ठरवून दिलेला विषय मी वाचू का?' तसेच, सरकार विरोधकांचा अपमान करत आहे. जनतेच्या महत्त्वाच्या प्रश्नांना उत्तरे



देण्यापासून पळ काढत आहे, असा आरोपही त्यांनी यावेळी केला.

**पवन खेरा याचा उल्लेख करत काय म्हमाले खर्गे?** -किरेन रिजिजू यांनी काँग्रेसचे नवे खासदार पवन खेरा यांच्यासंदर्भात भाष्य केले. 'काँग्रेस अध्यक्ष नवीन सदस्यांना बोलण्याची संधीच देत नाहीत, यामुळे खेरा यांना अद्याप स्वागतपर भाषणही करता आलेले नाही,' असा टोला रिजिजू यानी लगावला. यावर खर्गे म्हणाले, 'पवन खेरा हे शिक्षित आणि सन्माननीय नेते आहेत. पूर्वसूचना न देता त्यांच्यावर अशा पद्धतीने बोलणे नियमांच्या विरोधात आहे.' दरम्यान, लोकशाहीत कामकाज रोखणे अथवा विरोध करणे, हाही लोकशाही प्रक्रियेचाच भाग आहे. या, भाजपचे दिवंगत नेते अरुण जेटली यांच्या जुन्या वक्तव्याची आठवणही खर्गे यांनी यावेळी करून दिली. तसेच, गृहमंत्री अमित शाह यांनी स्वतः सभागृहात यावे आणि उत्तर द्यावे. अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## पोटनिवडणुकांचा मतितार्थ

'पोटनिवडणुकांचे निकाल बहुतांश सत्ताधारी पक्षाच्या बाजूनेच लागत असतात आणि ते मुख्यतः स्थानिक परिस्थितीवरच अवलंबून असतात' अशी दोन विधानं पोटनिवडणुकांच्या निकालाचे विश्लेषण करताना सर्वसाधारणतः वापरली जातात. निकालाचं वर्णन कोणत्या चष्म्यातून करायचे, हे नक्की झाले की दोन्हीतले कोणते तरी एक विधान संदर्भासाठी घेऊन त्यावर विश्लेषणाचा डोलारा उभा केला जातो. देशात नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या तीन मतदारसंघांतील पोटनिवडणुकांमध्ये बिहारमध्ये भारतीय जनता पक्षाला आपल्या हातातली जागा गमवावी लागली. राज्यात सरकार असूनही मध्य प्रदेशातील जागा कमावता आली नाही. गुजरातमध्ये विजय मिळाला; पण मतदानाच्या टक्केवारीत बरीच काटछाट झाली. तीनही विधानसभा मतदारसंघ वेगवेगळ्या राज्यांत असल्याने आणि तीनही राज्यांत भाजपचीच सरकारे असल्याने या निकालाची चर्चा थोडी जास्त चालली आहे. या मतदारसंघांत निवडणूक आणि मतदान होत असतानाच दिल्लीत 'जंतर-मंतर' वर 'जेन झी'चे आंदोलन सुरू होते. आंदोलनाची धग आणि व्याप्ती ओळखण्यात सरकारी यंत्रणा कमी पडली, असे आता सर्वत्र मान्य होत असतानाच पोटनिवडणुकांचे निकाल आल्याने या निकालांनाही ते आंदोलन काही प्रमाणात जबाबदार आहे, असे राजकीय नेते खाजगीत मान्य करू लागले आहेत. गेल्या पाच वर्षात झालेल्या पोटनिवडणुकांचे निकाल पाहिले, तर ७८ टक्के निकाल संबंधित राज्यांतील सत्ताधाऱ्यांच्या, तर २२ टक्के निकाल विरोधकांच्या बाजूने लागल्याचे दिसते. या तीन मतदारसंघातील पोटनिवडणुकीआधी याच वर्षी सुरुवातीला सात विधानसभा मतदारसंघांत पोटनिवडणुका झाल्या. त्यातल्या ५ भाजप आघाडीने, तर कर्नाटकातल्या २ काँग्रेसने जिंकल्या होत्या. यावेळी निकाल थोडे विपरीत लागल्याने जनमत राष्ट्रीय लोकशाही आघाडीपासून दूर चालले आहे का? उमेदवारी देताना भाजपने जे निकष लावले, ते चुकले का? यासारखे प्रश्न विचारले जाऊ लागले आहेत.एखाद् दुसऱ्या निवडणूक निकालावरून संपूर्ण देशातील मतदाराचा कल मोजण्यासारखे दुसरे दुःसाहस नसेल. त्यातही सत्ताधारी म्हणून भाजपचा पोटनिवडणुकीतला हा काही पहिलाच पराभव नाही. २०१८ मध्ये उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा योगी आदित्यनाथ आणि उपमुख्यमंत्रीपदाची धुरा केशवप्रसाद मौर्य यांनी हाती घेतल्यानंतर झालेल्या गोरखपूर आणि फुलपूर या दोन्ही लोकसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीत समाजवादी पार्टीने भाजपच्या उमेदवारांचा पराभव केला होता. यावेळीही बिहारमधील बांकीपूर विधानसभा मतदारसंघ भाजपसाठी तेवढाच प्रतिष्ठेचा होता. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन २००६ पासून या मतदारसंघात सलग पाच वेळा विजयी झाले आहेत. याआधी त्यांचे वडील नवीन किशोर सिन्हा १९९५ ते २००५ पर्यंत या मतदारसंघाचं प्रतिनिधित्व करत होते. ज्या जनसुराज्य पार्टीने ही जागा जिंकली, त्यांना यावेळच्या विधानसभा पोटनिवडणुकीत संपूर्ण बिहारमधून अवघी ३.५ टक्के मते मिळाली होती. दोन उमेदवार वगळता सर्व उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त झाल्या होत्या! पक्षाचे संस्थापक प्रशांत किशोर यांनी स्वतः बाजूला राहून अन्य उमेदवारांमार्फत ती निवडणूक लढवली होती. यावेळी ते स्वतःच मैदानात उतरले आणि जिंकले. राष्ट्रीय जनता दल मैदानात असूनही प्रशांत किशोर यांनी मिळवलेला विजय भाजपच्या तिथल्या नेत्यांना विचार करायला लावणारा आहे. प्रशांत किशोर केवळ एक विजयी उमेदवार नाहीत. त्यांची राजकीय आकांक्षा बरीच मोठी आहे. पहिल्या टप्प्यात त्यांना बिहारचा नेता व्हायचे आहे. इतिहासात पहिल्यांदाच भाजपला बिहारमध्ये मुख्यमंत्रीपदाला गवसणी घालता आली आणि त्यानंतर झालेल्या पहिल्याच निवडणुकीत आपला भक्कम तटबंदीचा गड कोसळला, अशी ही स्थिती आहे. मध्य प्रदेशातील दतिया विधानसभा मतदारसंघातील परिस्थिती वेगळी होती. दतियाचे काँग्रेस आमदार राजेंद्र भारती यांना गुन्ह्यात शिक्षा झाल्याने लोकप्रतिनिधित्व कायद्यानुसार ते अपात्र ठरले. त्यामुळे, तिथे पोटनिवडणूक झाली. भाजपने तिथे माजी गृहमंत्री नरोत्तम मिश्रा यांना डावलून आशुतोष तिवारी यांना उमेदवारी दिली. मिश्रा यांची नाराजी आणि आझाद समाज पार्टी मैदानात असल्याने काँग्रेसच्या घनश्याम सिंह यांचा फायदा झाला. मिश्रा यांच्या स्वतःच्या मतदान केंद्रात काँग्रेसच्या उमेदवाराला २७ मते जास्त मिळाली. तिथल्या निकालाचे इंगित सांगण्यासाठी एवढे पुरेसे आहे. पक्षाने उमेदवार बदलाचा घेतलेला निर्णय विरोधकांच्या पथ्यावर पडला, हेच पक्षाच्या अहवालात लिहिलेले असेल.गुजरातमधल्या मांजलपूरचा निकाल भाजपच्या बाजूने लागला असला, तरी पक्षाच्या मताधिक्यात चांगलेच नुकसान आहे. भाजपचे तिथले आमदार योगेश पटेल यांच्या निधनामुळे पोट निवडणूक झाली. पटेल यांच्या वारसांपैकी कुणाला उमेदवारी देण्याऐवजी पक्षाने मतदारसंघात पूर्वेकडे राहणाऱ्या सतीश पटेल यांना उमेदवारी दिली. मुळात हा भाजपचा बालेकिल्ला; आणि त्यात पोटनिवडणूक असल्याने सगळेच बेसावध राहिले. त्यामुळे, मतदानच ३७.५ टक्के झाले. गेल्यावेळी हेच मतदान ६० टक्के होते. मतदान कमी झाले, त्यामुळे मताधिक्य घटणार हे गृहीत होते. पण, ते टक्केवारीतही घसरले. काँग्रेसचे मतदान गेल्या वेळपेक्षा वाढले. नोटाचे बटन दाबणारे २ हजार २४७ मतदार निघाले. पोटनिवडणुकीचे हे निकाल म्हणजे आकाश कोसळले, असे नाही. भाजप हा निवडणुकीबाबत नेहमीच गंभीर असलेला पक्ष आहे. त्यामुळे,ते या निकालाचा अर्थही गंभीरपणे लावतील. विश्लेषकांनी उगीच सुतावरून स्वर्ग गाठण्यात काही हंशील नाही.

# बांकीपूर, दतियाचे निकाल भाजपसाठी धोक्याची घंटा?

सध्या देशातील वातावरण कॉक्रोच पार्टीने केलेले जंतर मंतर वरील आंदोलन, संसदेवर मोर्चा आणि पोलिसांची कारवाई यांनी ढवळून निघाले आहे. त्यातच संसदेत व संसदेबाहेर रोज होत असलेल्या गदारोळाने वृत्तपत्रांचे मथळे व्यापून टाकले आहेत. पण या गदारोळातच ३० जुलैला बिहार, मध्य प्रदेश व गुजरात राज्यांत विधानसभेच्या प्रत्येकी एका जागेसाठी पोटनिवडणूक झाली. या पोटनिवडणुकांचे निकाल ३ ऑगस्टला लागले.

गुजरातमध्ये मांजलपूरची पोटनिवडणूक जिंकून भाजपने ती जागा आपल्याकडे राखली. मध्य प्रदेशमध्ये दतियाची जागा आपल्याकडे ठेवण्यात काँग्रेसने यश मिळवले. बिहारमध्ये बांकीपूर मतदारसंघात मात्र प्रशांत किशोर यांनी भाजपचा धक्कादायक पराभव करून ती जागा खेचून आणली. प्रशांत किशोर यांनी आपल्या जनसुराज पक्षातर्फे ही जागा लढवली होती. त्यांना काँग्रेसने पाठिंबा दिला होता. राष्ट्रीय जनता दलाचा उमेदवार तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला. वरील तीन निकालांपैकी बंकीपूरचा निकाल भाजपची झोप उडवणारा आहे.

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी भाजपच्या अध्यक्षपदी निवड झाल्यावर बांकीपूरच्या जागेचा राजीनामा दिल्याने तिथे पोटनिवडणूक झाली. या जागेवर नितीन नवीन सलग पाच वेळा निवडून आले होते. त्यापूर्वी त्यांचे वडील या जागेवर निवडून येत असत. १९९५ पासून सलग ही जागा भाजपकडे होती. अशा बालेकिल्ल्यात झालेला पराभव भाजपच्या निश्चितच जिव्हारी लागला असेल. असेल. त्यातून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष स्वतःचा गड राखू शकले नाहीत हा संदेश या निकालातून गेला आणि असा संदेश जाणे भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या गरिम्याला धक्का लावणारा आहे.

प्रशांत किशोर यांचा बांकीपूरचा विजय अधिक लक्षवेधक व भविष्यातील राजकारणाची दिशा दाखवणारा ठरू शकतो. केवळ नऊ महिन्यापूर्वी झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत जनसुराज पक्षाचा धुव्वा उडाला होता. त्यांना एकही जागा मिळाली तर नाहीच शिवाय



पक्षात निर्माण झालेली बेशिस्त, अंतर्गत कलह व गटबाजी हे भाजपसाठी पोटनिवडणुकांतील पराभवापेक्षा अधिक चिंतेचे कारण ठरणार आहे.

बहुतांशी मतदारसंघात त्यांचे अनामत रक्कमही जप्त झाली होती. ती निवडणूक प्रशांत किशोर यांनी लढवली नव्हती. या पार्श्वभूमीवर त्यांचा भाजपच्या बालेकिल्ल्यातील विजय बिहारच्या भविष्यातील बदलाचे संकेत तर देत नाही ना?

नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीत तामिळनाडूत द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाचा अनपेक्षित पराभव होऊन विजय जोसेफ या अभिनेत्याने केवळ दोन वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या टीव्हीके पक्षाला जनतेने पसंती दिली व सर्वात मोठा पक्ष या नात्याने इतर पक्षांच्या मदतीने विजय तामिळनाडूचे मुख्यमंत्री झाले. तामिळनाडूत जनतेने द्रविडी पक्षांची मिरासदारी मोडून काढली तशीच बिहारमधील जनता दल व भाजप यांची मक्तेदारी मोडीत काढून पुढील विधानसभा निवडणुकीत मतदार प्रशांत किशोर यांना पसंती देऊन काही चमत्कार घडवतील का? हा उत्सुकतेचा विषय राहील. बंकीपूरचा विजय हा त्या दृष्टीने भविष्यातील बदलाची नांदी आहे का?

बिहारमध्ये नुकतेच सत्तांतर होऊन नितीश कुमार दिल्लीला राज्यसभेत गेले आणि भाजपचे सम्राट चौधरी बिहारचे भाजपचे पहिले मुख्यमंत्री बनले. सम्राट चौधरींनी मुख्यमंत्रीपद स्वीकारल्यावर झालेल्या पहिल्याच पोटनिवडणुकीत भाजपला पराभव पत्करावा लागला आहे.

अर्थात बंकीपूरचा पराभव भाजपसाठी अगदीच अनपेक्षित नसेल. भाजपने उमेदवार निवडीत घातलेला गोंधळ या पराभवाला प्रामुख्याने जबाबदार आहे. प्रथम ज्या उमेदवाराला तिकीट देण्यात आले त्याला उमेदवारी अर्ज भरल्यानंतर अर्ज मागे घेण्यास सांगण्यात आले आणि त्या जागी दुसरा उमेदवार उभा केला गेला. पहिल्या उमेदवाराचे आई वडील चारा घोटाळ्यात दोषी ठरले होते हे उमेदवारी दिल्यानंतर लक्षात आले म्हणून त्याची उमेदवारी रद्द केली गेली. यामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला. त्यातच प्रशांत किशोर यांना तुल्यबल लढत देईल असा उमेदवार भाजपकडे नव्हता. नितीन नवीन यांनी कार्यकर्त्यांची दुसरी फळी तयार केली नाही असा याचा अर्थ निघतो.प्रशांत किशोर यांच्यासारखा तगडा ब्राह्मण उमेदवार मिळाल्यावर भाजपची हक्काची उच्चवर्णीय मते त्यांच्याकडे वळली असण्याची शक्यता आहे. तसेच तरुणांनी सुद्धा प्रशांत किशोर यांच्यावर विश्वास दाखवलेला दिसतो.


मध्य प्रदेशमधील दतिया मतदारसंघात तर कहरच झाला. शिस्तबद्ध पक्ष या भाजपच्या प्रतिमेला पूर्णपणे काळिमा फासणारा घटनाक्रम येथे घडला. या मतदारसंघात २००८ पासून भाजपचे नरोत्तम मिश्रा हे बडे नेते निवडून येत असत. मात्र २०२३ च्या निवडणुकीत त्यांचा काँग्रेसच्या उमेदवाराने पराभव केला त्यावेळी मिश्रा राज्याचे गृहमंत्री होते. काँग्रेसच्या आमदाराची निवड रद्द ठरल्याने ही जागा रिकामी झाली. तेव्हापासून आपली उमेदवारी गृहित धरून मिश्रा हे तयारीला लागले. पण ऐन वेळी त्यांचे तिकीट कापण्यात आले आणि आशुतोष तिवारी यांना भाजपची उमेदवारी मिळाली. यावरून मिश्रा यांचे कार्यकर्ते प्रचंड आक्रमक झाले आणि त्यांनी हाय वे रोखून धरणे, टायर जाळणे, पोलिसांवर हल्ला करणे, दगडफेक करणे अशी हिंसक कृत्ये केली. नंतर पक्षश्रेष्टींनी तात्पुरता समेट घडवून आणला आणि मिश्रा यांनी तिवारी यांना पाठिंबा जाहीर केला. पण मिश्रा यांच्या दुखावलेल्या समर्थकांनी आशुतोष तिवारी यांना दगाफटका केलेला दिसतो.

बिहार व मध्य प्रदेश या दोन्ही राज्यांत भाजप सत्तेत असूनसुद्धा त्यांचा पराभव झाला. बांकीपूर व दतिया येथील पराभव भाजपमधील अंतर्गत गटबाजीमुळे झाल्याचे प्रथमदर्शनी दिसते. भाजप श्रेष्टीनी याची नोंद घेतली असेलच. भाजप आपल्या चुका दुरुस्त करण्यात तत्पर असतो. महाराष्ट्रात सुद्धा २०२३ मध्ये पुण्यातील कसबा या भाजपच्या बालेकिल्ल्यात भाजपचा पराभव झाला होता. मात्र त्यापासून योग्य तो बोध घेऊन चुकांची पुनरावृत्ती टाळण्यात आली आणि २०२४च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने ती जागा पुन्हा आपल्याकडे खेचून आणली. अशीच तत्परता बांकीपूर व दतिया या दोन मतदार संघात दाखवली जाईल व पुढच्या विधानसभा निवडणुकीत दोन्ही जागा भाजप जिंकेल, ही शक्यताही नाकारता येत नाही, मात्र पक्षात निर्माण झालेली बेशिस्त, अंतर्गत कलह व गटबाजी ही भाजपसाठी पराभवापेक्षा अधिक धोक्याची घंटा आहे हे खरे आहे.

**रघुनंदन भागवत**

# चीन AI मधली सुपरपॉवर कसा बनत आहे

**चीनबद्दलचे आपले सर्व पूर्वग्रह बाजूला ठेवून, एक देश तंत्रज्ञानातली सुपरपॉवर बनण्यासाठी काय करू शकतो हे समजून घेण्यासाठी ही लेखमाला..**




१७ जुलै २०२६ चा दिवस. अमेरिकेत रात्र होती, वॉल स्ट्रीट झोपलेले होते. आणि याच वेळी, चीनमधल्या Moonshot नावाच्या एका कंपनीने त्यांचे नवीन AI मॉडेल Kimi K3 प्रकाशित केले.दुसऱ्या दिवशी सकाळी अमेरिकेतल्या टेक कंपन्यांना धक्का बसला कोडिंगच्या एका मोठ्या स्पर्धेत (Arena नावाच्या व्यासपीठावर), हे चीनी मॉडेल थेट १७व्या क्रमांकावरून पहिल्या क्रमांकावर उडी मारून पोहोचले! अमेरिकेच्या Anthropic आणि OpenAI च्या सगळ्यात नव्या मॉडेल्सना एका रात्रीत त्याने मागे टाकले. तेही निम्म्याहून कमी किमतीत!

हे पहिल्यांदाच घडलेले नाही.२०२५ च्या सुरुवातीला चीनच्या DeepSeek नावाच्या मॉडेलने अमेरिकन AI मॉडेल्सना असाच धक्का दिला होता. एप्रिल २०२६ मध्ये चीनच्या GLM-5 नावाच्या मॉडेलने Google च्या Gemini ला कोडिंगमध्ये मागे टाकले होते. आणि आता जुलैमध्ये Kimi K3 ने पुन्हा तेच केले आहे.

अर्थात, अमेरिकाही गप्प बसत नाही. काही आठवड्यांतच ती परत मुसंडी मारून पुढे येते. पण एक गोष्ट स्पष्ट आहे.चीनचा वेग थांबत नाहीये, आणि असे धक्के आता वारंवार बसतायत.म्हणजे ही चीनच्या एखाद्या AI मॉडेलची योगायोगाने मिळालेली यशोगाथा नाही. हा एक ट्रेंड आहे. दर काही महिन्यांनी, चीनमधून एक नवीन मॉडेल येते, अमेरिकेच्या सगळ्यात प्रगत मॉडेलला टक्कर देते. आणि तेही खूपच कमी किमतीत.

प्रश्न आता 'चीन अमेरिकेला मागे टाकेल का?' हा राहिलेला नाही. प्रश्न 'पुढचा धक्का कधी बसणार?' हा आहे.पण ही चीनची हुशारी अचानक आली नाही. याची सुरुवात एका बंदीतून झाली होती.

चार वर्षांपूर्वी अमेरिकेने चीनला अत्याधुनिक AI chips द्यायला बंदी घातली. त्याबद्दलचे कोणतंही तंत्रज्ञान द्यायला मनाई केली. तिथपासून ते स्वतःचे AI तंत्रज्ञान विकसित करण्यापर्यंत चीन कसा पोचला, ही अत्यंत रोचक कथा आहे. ती मी पुढच्या पाच भागांच्या लेखमालेतून मांडणार आहे.

**-प्रसाद शिरगावकर**

# डिझेल घुसखोरीनंतरची शेती

राज्याच्या बऱ्यापैकी पाऊस झालेल्या भागात पेरण्या झाल्या आहेत. बियाणे, खते, कीटकनाशकांच्या किमती तर वाढल्या आहेतच; परंतु पेरणी करणाऱ्या ट्रक्टरच्या भाडय़ातही वाढ झाली आहे. खर्च वाढीवरून आपल्याकडे जी चर्चा होते ती बियाणे, खते, मजुरीदरापुरती मर्यादित असते. परंतु सद्यस्थितीत सामान्य वाटणारे घटकही खर्च वाढीला मोठा हातभार लावत असल्याचे पाहायला मिळते.पेरणी, मशागतीसाठी लागणाऱ्या ट्रक्टरचे व मळणीयंत्राचे भाडे आणि हे भाडे ज्यावरून ठरते त्या डिझेल दराची चर्चा मात्र होत नाही. अमेरिका, इस्रायल-इराण युद्धाच्या पहिल्या टप्प्यात डिझेलच्या दरात लिटरमागे ७ रुपयांनी वाढ झाली. ट्रक्टर मालकांनी लगेच भाडय़ात २०-२५ टक्केने वाढ केली आणि शेतकऱ्याच्या अडचणी वाढल्या. एक काळ असा होता की, पेरणीसाठी शेतकऱ्याला एक छदामही मोजावा लागायचा नाही. बियाणे, खते, अवजारे, माणसे सगळे काही घरचे होते. त्या काळात शेतकरी खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर होता. कर्जबाजारीपणा, आत्महत्या यापासून तो दूर होता. काळ बदललाष्ठ त्याच्या परावलंबनात, शोषणात वाढ होत गेली. या बदलाला हरित क्रांतीपासून सुरुवात झाली म्हणायला हरकत नाही. संकरीत



बियाणे, खते, कीटकनाशकांच्या वापरांबरोबर शेतीवरील कामासाठी यंत्रांचा वापर वाढत गेला. अनुदान, कर्ज व अन्य सवलतींच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारांनी ट्रक्टर आदी यंत्रांच्या वापराला प्रोत्साहन दिले. यात यंत्र उत्पादक भांडवलदारांच्या हिताचा विचार किती आणि शेतकऱ्याच्या भल्याचा विचार किती, हा तसा अभ्यासाचा विषय. 'एक आधार, एक ट्रक्टर'सारख्या योजना राबवण्यापर्यंत काही राज्यांची मजल गेली. महाराष्ट्र यात पिछाडीवर राहाण्याचे कारण नव्हते. २०२५-२६ या वर्षात महाराष्ट्र सरकारकडून या योजनेवर तब्बल रुपये १०५६ कोटी खर्च केले जाणार आहेत. मजुरांचा तुटवटा, वाढते मजुरी दर याला वैतागलेल्या शेतकऱ्यांनी शासनाच्या या योजनेला भरभरून प्रतिसाद दिला. याचा परिणाम म्हणून की काय २०२५ या एका वर्षात ११ लाख ट्रक्टरची विक्री करणे पंपन्यांना शक्य झाले.

यांत्रिकीकरणाच्या आर्थिक लाभाची बरीच चर्चा होते; परंतु त्याच्या सामाजिक परिणामाविषयी कोणी ब्रही उच्चारायला तयार असत नाही. वाढती व्यसनाधिनता, उद्ध्वस्त होणारी कुटुंबे, वाढते ग्रामीण अपघात याही अंगाने यांत्रिकीकरणाचा अभ्यास होणे गरजेचे आहे. अमेरिका-इराण युद्धाला तोंड फुटल्यानंतर आखाती देशांकडून भारताला कच्चे तेल व नैसर्गिक वायूची वाहतूक करणारा होर्मुझ समुद्री मार्ग बंद झाला. त्याबरोबर कच्च्या तेलाचे दर प्रति पिंप ५० डॉलरवरून एकदम १०० पार करून गेले. तेल विक्री पंपन्यांनी डिझेलच्या दरात लिटरमागे ७ रुपयांनी वाढ केली खरी परंतु ट्रक्टर मालकांनी भाडय़ात २०-२५ टक्क्यांनी वाढ करून आपला भार शेतकऱ्यांकडे हस्तांतरीत केला. मशागत व पेरणीचा हंगाम असल्याने वाढलेला भार उचलणे शेतकऱ्याला भाग पडले.

**केंद्र सरकार व राज्यांनी डिझेलवरील करात कपात केल्यास उत्पादन खर्चातील घटीच्या रूपाने शेतकऱ्याला दिलासा मिळू शकतो. वाहतूक खर्च कमी झाल्याने महागाईचा दर घटल्याने सामान्य नागरिकांची नाराजी दूर होऊ शकते. हमी भावाबरोबर कर कपातीच्या मार्गाचा अवलंब केल्यास शेतकऱ्याची दुरवस्था दूर होण्यास मदत होऊ शकते.**

परिणामी उत्पादन खर्च वाढला. भाव वाढविणे हाती नसल्याने नुकसान सहन करून आतबट्टय़ाचा व्यवसाय करणे शेतकऱ्याला भाग पडले.

पारंपरिक शेती पद्धती सर्व संसाधने शेतकऱ्याची स्वतःची असत. त्यामुळे त्याच्या किंमतीतील चढउताराचा फटका बसण्याचा प्रश्न उद्भवत नसे. तेव्हा चार पैसे गाठीला बांधण्याची सोय शेतकऱ्याला होती. आता जमीन वगळता सर्व संसाधनं विकत घ्यावी लागतात. त्यांच्या किंमतीतील चढउताराचा फटका शेतकऱ्याला बसल्याशिवाय राहत नाही. बहुतेक वेळा संसाधानांच्या किमती कमी होण्याच्या ऐवजी कमीअधिक प्रमाणात वाढतच असतात आणि आपल्या प्रत्येक वाढीबरोबर त्या शेतकऱ्याला दिवाळखोरीकडे रेटत असतात. बियाणे, खते, मजुरी दर ही त्याची नेहमीची उदाहरणे. डिझेल हे वर्तमानातील उदाहरण. डिझेलच्या बाबतीतील गंमत अशी की, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाचे दर वाढले की वाढीव दराचा भार वाढीव ट्रक्टर भाडय़ाच्या रूपाने शेतकऱ्याकडे हस्तांतरीत केला जातो. दर घटल्यानंतर शेतकऱ्याचा भारदेखील घटावयास हवा. परंतु तसे होत नाही. पेट्रोल, डिझेल दरावरील निर्बंध दशकभरापूर्वीच उठविल्याचे सरकार वारंवार सांगत असते. परंतु आजही दर ठरविण्याचे काम तेल पंपन्या नव्हे तर सरकारकडून केले जाते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दर घटल्यानंतरही अंतर्गत बाजारपेठेतील चढय़ा डिझेल दराच्या जबाबदारीतून सरकारची सुटका होऊ शकत नाही.

पेट्रोल, डिझेलवर अधिक कर आकारणाऱ्या काही मोजक्या देशांमध्ये भारताची गणना होते. बहुतेक वस्तू व सेवा जीएसटीच्या कक्षेत आल्या आहेत. परंतु पेट्रोल, डिझेल अजूनही जीएसटी प्रणालीच्या बाहेर असल्याने त्यावर कर आकारण्याचे काम केंद्र व राज्य अशा दोन्हीही सरकारांकडून केले जाते. कर आकारण्याच्या त्यांच्यातील चढाओढीचा फटका वाढीव दराच्या रुपाने सामान्य ग्राहक व शेतकऱ्याला बसतो.केंद्र सरकार व राज्यांनी डिझेलवरील करात कपात केल्यास उत्पादन खर्चातील घटीच्या रूपाने शेतकऱ्याला दिलासा मिळू शकतो. वाहतूक खर्च कमी झाल्याने महागाईचा दर घटल्याने सामान्य नागरिकांची नाराजी दूर होऊ शकते. हमी भावाबरोबर कर कपातीच्या मार्गाचा अवलंब केल्यास शेतकऱ्याची दुरवस्था दूर होण्यास मदत होऊ शकते.

**प्रा. सुभाष बागल**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# 'सावित्रीच्या लेकी'ना दिलासा! पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्तक्षेपाने आश्रयालयाला तात्पुरते संरक्षण..

## ७० पारधी मुलींचे शिक्षण वाचले

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ , दि. ६ : वाघाडी परिसरातील पारधी समाजातील वंचित मुलींसाठी कार्यरत असलेल्या 'आम्ही साऱ्या सावित्रीच्या लेकी' आश्रयालया वरील प्रस्तावित अतिक्रमण हटाव कारवाईला अखेर तात्पुरती स्थगिती मिळाली आहे.**



जिल्ह्याचे पालकमंत्री तथा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या हस्तक्षेपानंतर प्रशासनाने कारवाई थांबवून आश्रयालयाची जागा शासनाच्या नियमांनुसार नियमित करता येईल का, याची कायदेशीर व प्रशासकीय पडताळणी करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. गुरुवारी पालकमंत्री राठोड यांनी आश्रयालयाचे संस्थापक इसू माळवे व अध्यक्षा पपिता माळवे यांना जिल्हाधिकारी कार्यालयात बोलावून संपूर्ण परिस्थितीची माहिती घेतली. त्यानंतर जिल्हाधिकारी विकास मीना व नगर परिषद मुख्याधिकारी शुभम क्यातमवार यांच्यासोबत चर्चा करून सामाजिक कार्य करणाऱ्या या संस्थेच्या अडचणी संवेदनशीलतेने सोडविण्याचे निर्देश दिले.

> **"सावित्रीच्या लेकींचे शिक्षण थांबू देणार नाही"**
>
> **पालकमंत्री संजय राठोड म्हणाले, "वंचित, निराधार व पारधी समाजातील मुलींचे शिक्षण आणि भविष्य कोणत्याही परिस्थितीत बाधित होऊ दिले जाणार नाही. प्रशासनाने कायदेशीर चौकटीत संवेदनशील निर्णय घेऊन या मुलींचे भविष्य सुरक्षित करावे."**

यापूर्वी युवासेना जिल्हाप्रमुख प्रद्युम्न जवळेकर यांनी माळवे दाम्पत्यासह पालकमंत्र्यांची भेट घेऊन आश्रयालयावरील कारवाई थांबविण्याची मागणी केली होती. त्यानंतर झालेल्या हस्तक्षेपामुळे आश्रयालयात वास्तव्यास असलेल्या सुमारे ७० पारधी व वंचित मुलींच्या शिक्षणावरील संकट तात्पुरते दूर झाले आहे. बैठकीत पालकमंत्री राठोड यांनी समाजोपयोगी संस्थांच्या पाठीशी शासन व प्रशासन कायम उभे राहील, अशी ग्वाही देत, कायदेशीर चौकटीत सकारात्मक तोडगा काढण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. या निर्णयाचे युवासेनेने स्वागत करून पालकमंत्र्यांचे आभार मानले आहेत.

# केदारेश्वर मंदिरातील वाद न्यायालयात; २२ ट्रस्टींना नोटीस

### ७ ऑगस्टपर्यंत उत्तर सादर करण्याचे आदेश; गैरहजेरी राहिल्यास एकतर्फी निर्णयाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ६ :** यवतमाळ येथील प्रसिद्ध केदारेश्वर मंदिराशी संबंधित दिवाणी वादाला नवे वळण मिळाले असून, दिवाणी न्यायालयाने मंदिराचे अध्यक्षांसह २२ ट्रस्टींना नोटीस बजावत ७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता न्यायालयात स्वतः किंवा अधिकृत वकिलामार्फत हजर राहून उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहेत. आदेशाचे पालन न झाल्यास प्रकरणात एकतर्फी निर्णय दिला जाऊ शकतो, असा स्पष्ट इशारा न्यायालयाने दिला आहे.

मंदिरातील पुजारी श्रीमती रूपा गिरी यांनी मंदिर प्रशासनातील कथित अनियमितता, व्यवस्थापनातील बाबी तसेच सात पिढ्यांपासून वास्तव्यास असलेल्या जागेतून बेदखल करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत दिवाणी दावा दाखल केला आहे. न्यायालयाने यापूर्वी समन्स बजावण्याचे प्रयत्न केले; मात्र ते निष्फळ ठरल्याची नोंद घेत दिवाणी प्रक्रिया संहितेतील तरतुदीनुसार दावा क्र. १५४/२०२६ ची नोटीस मंदिराच्या सूचना फलकावर लावण्याचे निर्देश दिले. दरम्यान, न्यायालयाच्या आदेशानुसार लावण्यात आलेली नोटीस अज्ञात व्यक्तींनी काढून टाकल्याचा आरोप श्रीमती रूपा गिरी यांनी केला आहे. न्यायालयाची परवानगी न घेता नोटीस हटविणे हा न्यायालयाचा अवमान ठरू शकतो, असे त्यांनी म्हटले असून याबाबत न्यायालयाला माहिती देणार असल्याचे सांगितले. आता ७ ऑगस्ट रोजी होणाऱ्या सुनावणीकडे आणि न्यायालयाच्या पुढील आदेशांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# काँग्रेसच्या जिल्हा कार्यकारिणीत अरविंद वाढोणकर, रवींद्र निवल, शशांक केंढे यांची वर्णी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ अरविंद तेलंगे.



अरविंद वाढोणकर, जिल्हा उपाध्यक्ष



रविंद्र निवल, जिल्हा सचिव



शशांक केंढे, जिल्हा सचिव

**राळेगाव , दि. ६ :** तालुक्यातील वाढोणाबाजार येथील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती इंजिनिअर अरविंद वाढोणकर यांची भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष म्हणून तर खैरी येथील प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते रविंद्र निवल व राळेगाव शहरातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते शशांक केंढे यांची यवतमाळ जिल्हा सचिव म्हणून पक्षाच्या वरीष्ठ पदाधिकाऱ्यांनी निवड करून यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीने नेहमीच्या प्रथेला फाटा देत जंबो कार्यकारणी न बनवता मर्यादित कार्यकारणी जाहीर करून सर्वांवर जबाबदारी देणार आहे.

या झालेल्या निवडीत यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्यकारणी जाहीर करताना सर्व समाजांला छोट्या समूहाचा सुद्धा विचार या कार्यकारणी मध्ये करण्यात आला. सोबतच कायम निमंत्रित पदाधिकाऱ्यांमध्ये खासदार,आमदार ,माजी खासदार ,आमदार आजी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष गटनेते आणि सोबतच सर्व नगर पालिकेचे चे विद्यमान नगराध्यक्ष आणि गटनेते यांना सुद्धा समाविष्ट करण्यात आलेले आहे. या निवडीने राळेगाव तालुक्यातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये एक उर्जा निर्माण झाली असून तालुक्यात या निवडीने आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे असून सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अभाविप वणी नगरच्या कार्यकारिणीची घोषणा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**वणी , दि. ६ :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) वणी नगरच्या सत्र २०२६-२७ साठीच्या नगर कार्यकारिणीची घोषणा उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली.विद्यार्थी संघटनात्मक कार्याला अधिक बळकटी देण्यासोबतच विविध क्षेत्रांत विद्यार्थ्यांचे नेतृत्व विकसित करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. सत्र २०२६-२७ साठी वणी पुढील प्रमाणे कार्यकारिणीची घोषणा निर्वाचन अधिकारी वैभव देहेकर यांनी केली.

शहर अध्यक्ष चैतन्य तुरविले,तर नगरमंत्रीपदी अंकित भालेराव यांची निवड करण्यात आली.नगर सहमंत्रीपदी वेदांत भोयर यांची नियुक्ती करण्यात आली.नवीन कार्यकारिणीत राष्ट्रीय कलामंच संयोजकपदी योगिनी खारकर, तंत्रशिक्षण प्रमुखपदी प्रतीक बोंडे,विकासार्थ विद्यार्थी विभाग प्रमुखपदी नमन रावणहत्ते, SFS प्रमुखपदी प्रणव ओझा,खेलो भारत संयोजकपदी पियुष वाढई,सहसंयोजकपदी यश गायकवाड,मीडिया संयोजकपदी विवेक झाडे, सोशल मीडिया संयोजकपदी आयुष अक्कलवार,कार्यालय मंत्रीपदी विधान फुल्लेवार,नगर छात्रा प्रमुखपदी अश्विनी डाहुले यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणीच्या सदस्य म्हणून केशर रायपुरे,तनवी धानोरकर, गौरी बर्डे, करण मेडपटलवार, विनय पुरणकर आणि समीर राऊत यांचा समावेश करण्यात आला.यावेळी निर्वाचित अधिकारी म्हणून प्रा.वैभव देहेकर,प्रा. चैतन्य तुरविले,वणी जिल्हा संयोजिका आयुष्य फुलेवार, दक्ष राजुरकर,नयन क्षीरसागर आणि वणी जिल्हा विद्यार्थी विस्तारक जय टोंगे यांच्यासह अभाविपचे इतर प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. नवनियुक्त कार्यकारिणीचे उपस्थितांनी अभिनंदन करून आगामी सत्रात विद्यार्थीहिताचे प्रश्न,शैक्षणिक उपक्रम, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील विविध उपक्रम तसेच संघटनात्मक कार्य प्रभावीपणे राबविण्याच्या शुभेच्छा दिल्या.

## थोडक्यात




### यवतमाळ जिल्हा काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी राजीव कासावार

**झरी :** प्रदेश काँग्रेस कमिटीने यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीच्या नव्या कार्यकारिणीला मंजुरी दिली असून, जिल्ह्यातील संघटनात्मक बांधणीला नवी गती मिळाली आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या मंजुरीनंतर जिल्हा काँग्रेसची कार्यकारिणी अधिकृत करण्यात आली असून, या कार्यकारिणीत राजीव कासावार यांची यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांच्याकडे नव्या कार्यकारिणीची अधिकृत यादी पाठविण्यात आली आहे. त्यामध्ये राजीव कासावार यांच्यावर उपाध्यक्षपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे झरी जामणीसह जिल्ह्यातील काँग्रेस संघटनेला अधिक बळ मिळेल, अशी प्रतिक्रिया कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे. राजीव कासावार यांच्या नियुक्तीबद्दल तालुक्यासह जिल्हाभरातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिले आहे.

### अंबोडा येथील ज्येष्ठ नागरिकाचा विहिरीत मृतदेह आढळला!



**महागाव :** महागांव तालुक्यांतील मौजा अंबोडा येथे गुरुवारी (दि. ६ ऑगस्ट २०२६) दुपारी एका शेतातील विहिरीत ७२ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाचा मृतदेह आढळून आल्याने अंबोडा गावात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रणवीर प्रशांत राऊत यांच्या शेतातील (सर्वे क्रमांक ३५७) विहिरीत अंबोडा येथील नारायण माधव व्हगाडे (वय ७२) यांचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी घटना स्थळी धाव घेत आवश्यक कार्यवाही सुरू केली. प्राथमिक माहिती नुसार, मृत नारायण व्हगाडे यांच्या नावावर अंबोडा येथे शेती नसून त्यांच्या मुलाच्या नावावर शेत जमीन असल्याचे सांगण्यात आले आहे. वृद्ध नागरिकास शारीरिक व्याधी असल्याचे ग्रामस्थातून कळाले. नेमकेच यवतमाळ येथून उपचार घेऊन घरी अंबोडा येथे आले. मुतखड्याचा त्रास असल्याने त्रासापायी आत्महत्या सारखे मृदाणे वृद्धाने टोकाचे पाऊल उचलण्याची ग्रामस्थातून बोलल्या जात आहे.मृतांच्या पश्चात पत्नी शांताबाई नारायण व्हगाडे, मुलगा दत्ता नारायण व्हगाडे, सून शालिनी अनिल व्हगाडे तसेच रेखा लक्ष्मण लांडगे, वर्षा विजय वानखेडे आणि ज्योती संदीप साबळे या तीन मुली असा परिवार आहे.घटनेचा पुढील तपास महागाव पो.स्टेशनचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शना खाली जमादार जरांडे व बीट जमादार करीत आहेत.

# श्रद्धेय आबासाहेब देशमुख पारवेकर सहकारी संस्थेची गरुड झेप

### पारवा येथील पारवेकर सहकारी संस्था सलग दोन वर्ष महाराष्ट्र सहकार कृषीरत्न पुरस्काराने सन्मानित

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**घाटंजी , दि. ६ :** तालुक्यातील पारवा येथील सहकारी संस्थेची स्थपना स्व. आबासाहेब देशमुख यांनी २२ जानेवारी १९५८ रोजी केली. सुरुवातीला शेतकरी, शेतमजूर यांची आर्थिक गरज पुर्ण करणे हाच मुख्य उद्देश होता परंतु वर्षानुवर्षे संस्थेने केलीली विकासात्मक कामे, व्यवसाय, आणि स्थावर मालमत्तातून स्व आबासाहेब देशमुख यांनी संस्थेच्या रूपात लावलेलं रोपटं आता वटवृक्षात रूपांतर झाल्याचे दिसून येते.अलीकडच्या काळात संस्थेनी स्वखर्च्यातून अनेक विकासात्मक कामे करून वाटचाल केली असल्याचे मत संस्थेचे विद्यमान अध्यक्ष सचिन देशमुख पारवेकर यांनी व्यक्त केले. त्यांनी स्पष्ट केले की संस्थेची यशस्वी वाटचालीस स्व. आबासाहेब पारवेकर, लोकनेते अण्णासाहेब पारवेकर आणि आज पर्यंत झालेल्या सर्व आजी माजी अध्यक्ष आणि संचालक मंडळाचे मोलाचे सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले सोबत तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांनी आमच्या संस्थेला मिळालेल्या बहुमनाबद्दल आपल्या वृत्तपत्रातून प्रसिद्धी देऊन महाराष्ट्रभर संस्थेच नाव लौकिक करण्यात मोलाची साथ दिली.

तेव्हाच हे सर्व शक्य झाल्याचे मत त्यांनी आयोजित आभार व स्नेहमीलन सोहळा दरम्यान स्पष्ट केले. संस्थेची असलेली स्थावर मालमत्ता त्यात स्वतःची ऑफिस, इमारत स्वतः अध्यक्ष किंवा संचालक मंडळाकरिता न वापरता त्यात स्वस्त धान्य दुकान, सि. एस. सि. सेंटर,गाळा, जनऔषधी केंद्र जे महाराष्ट्रात एकमेव पारवा सहकारी संस्थेत असून, कृषीकेंद्र, गोदाम, संचालक मंडळ सभागृह, विजबिल भरना केंद्र, व्यापार संकुल बांधून १० दुकाने भाड्याने दिले, AIF योजनेअंतर्गत २५० मेघा टनचे गोदाम बांधकाम करण्यात आले, नाबार्ड मार्फत संस्थेला सोलर प्लांट लावून विजपुरवठा पुरविण्यात आले. बि -बियाणे, व रासायनिक खते विक्री केंद्र,माती परीक्षण केंद्र,वाटर फिल्टर प्लांट, कृषी उत्पन्न बाजार समिती घाटंजी येथे अडत परवाना, बचत बँक यासारखी स्थावर मालमत्ता उभारून अनेक विविध विकासात्मक व्यवसाय सुरु करून आर्थिक लाभ संस्थेला मिळत असल्याने संस्था आज आर्थिक बाजूने परिपूर्ण आहे. अशी व्यवसाय करणारी राज्यातील नामवंत संस्थेत पारवा सहकारी संस्थेचे नाव असल्याने २०२५ आणि २०२६ या दोन्ही वर्षी महाराष्ट्र शासनामार्फत पारवा सहकारी संस्थेला महाराष्ट्र सहकारी कृषी रत्न पुरस्कार मिळाला. अशा संस्थेच्या विकासात्मक वाटचालीस सहकार्य, मार्गदर्शन, आणि साथ देणाऱ्या सर्व हितचिंतकाचे आणि विशेष करून ज्यांनी या सर्व कार्याला आणि बहुमनाला प्रसिद्धी दिली आणि महाराष्ट्रात नाव लौकिक केला अशा लोकशाहीचे चौथा आधारस्थंभ म्हणून तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांचे यावेळी आभार आणि सत्कार करून त्यांना सन्मानित करण्यात आले यावेळी संस्थेचे अध्यक्ष सचिन देशमुख पारवेकर, सुहास पारवेकर, सुरेश डहाके, अनुप अप्पनवार, महेश ठाकरे, नितीन नार्लावार, संजय आरेवार, विलास रेड्डीवार, अर्जुन आत्राम, भगवान सक्कनवार सह संस्थेचे आजी माजी अध्यक्ष आणि संचालक, सचिव यांचे सह पत्रकार राजू चव्हाण, महेंद्र देवतळे, कय्युम कुरेशी, दिनेश गाऊत्रे, संतोष पोटपिल्लेवार, अरुण कांबळे, अरविंद जाधव, मनोज राऊत, योगेश ढवळे, ओम ढवळे, जितेंद्र जुनघरे आदी उपस्थित होते. पत्रकार संघाकडूनही यावेळी संस्थेचे अध्यक्ष सचिन देशमुख व संचालक मंडळाचे सत्कार करण्यात आले.

# मुकुटबनमध्ये आज एनसीएमसी कार्ड नोंदणी विशेष शिबिर

### महिला व ज्येष्ठ नागरिकांना लाभ घेण्याचे आवाहन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी जामणी , दि. ६ :** महामंडळाच्या (एमएसआरटीसी) वतीने राष्ट्रीय कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) अर्धी तिकीट सवलत मिळावी या उद्देशाने नोंदणीसाठी आज शुक्रवारी (७ ऑगस्ट) मुकुटबन येथे विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सकाळी ८ वाजल्यापासून रफिक कनोजे यांच्या कॉम्प्लेक्ससमोर हे शिबिर होणार आहे.

या शिबिरात १० वर्षांवरील सर्व महिला तसेच ६५ वर्षांवरील पुरुषांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्ड नोंदणीसाठी आधार कार्ड, आधारशी संलग्न मोबाईल क्रमांक आवश्यक असून संबंधित लाभार्थीने स्वतः उपस्थित राहणे बंधनकारक आहे. नोंदणी शुल्क प्रति व्यक्ती २५० रुपये निश्चित करण्यात आले आहे. मुकुटबन व परिसरातील पात्र नागरिकांनी या विशेष संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक रफिक कनोजे व सुरेंद्र गेडाम मित्रपरिवाराने केले आहे. अधिक माहितीसाठी प्रा. अड्डीवार बंधू यांच्याशी संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# अनुसूचित जमातीच्या ५५ शेतकऱ्यांना कृषिउपयोगी साहित्याचे वाटप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. ६ :** दि. ३० जुलै २०२६ भारतीय कृषी अनुसंधान परिषद (ICAR) अंतर्गत केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर यांच्या वतीने गाव मोखाड, ता. पुसद, जि. यवतमाळ येथे केंद्र शासन पुरस्कृत अनुसूचित जमाती विकास कृती आराखडा (DAPST Plan) अंतर्गत एकदिवसीय शेतकरी प्रशिक्षण, कार्यशाळा व कृषिउपयोगी निविष्ठा वितरण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. हा कार्यक्रम केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे संचालक डॉ. व्ही. एन. वाघमारे तसेच योजना समन्वयक अधिकारी व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दीपक नगराळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमास डॉ. रामकृष्ण जी. आय. (वरिष्ठ शास्त्रज्ञ, कृषी विद्याशाखा), डॉ. राहुल फुके (वरिष्ठ शास्त्रज्ञ, पादप प्रजनन), डॉ. नारायण बोरकर (शास्त्रज्ञ, कृषी अभियांत्रिकी), श्री. आर. एम. रामटेके (वरिष्ठ तांत्रिक सहाय्यक), श्री. एन. वाय. अंभोरे (सहाय्यक कृषी अधिकारी), श्री. सचिन सोनोने (सरपंच) यांच्यासह मोखाड गावातील मोठ्या संख्येने महिला व पुरुष शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भगवान जननायक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान डॉ. रामकृष्ण जी. आय. यांनी कपाशीची सघन व जवळची लागवड तसेच पीक वाढ व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. राहुल फुके यांनी कपाशी पिकासाठी योग्य वाणाची निवड, विविध वाणांची वैशिष्ट्ये याबाबत माहिती दिली. डॉ. नारायण बोरकर यांनी अनुसूचित जमाती विकास कृती आराखडा (DAPST) योजनेची उद्दिष्टे व रूपरेषा तसेच शेतीसाठी उपयुक्त आधुनिक कृषी अवजारे, त्यांचा योग्य वापर व देखभाल याबाबत मार्गदर्शन केले. श्री. आर. एम. रामटेके यांनी कापूस पिकावरील प्रमुख किडी व रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन याबाबत शेतकऱ्यांना माहिती दिली. यावेळी श्री. एन. वाय. अंभोरे यांनी कृषी विभागाच्या विविध योजना तसेच गटशेतीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. ५५ शेतकऱ्यांना कृषी साहित्याचे वाटप कार्यक्रमात मोखाड येथील अनुसूचित जमाती प्रवर्गातील ५५ शेतकऱ्यांना कृषिउपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये फवारणी यंत्र, फवारणीसाठी संरक्षक किट, कापूस वेचणीसाठी बॅग, बुरशीनाशके, कीटकनाशके तसेच कामगंध सापळे आदी साहित्याचा समावेश होता. या उपक्रमामुळे अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती मिळण्यासोबतच प्रत्यक्ष शेतीकामासाठी आवश्यक निविष्ठा उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. आर. एम. रामटेके यांनी केले. शेवटी श्री. एन. वाय. अंभोरे यांनी उपस्थित मान्यवर, अधिकारी, कर्मचारी तसेच शेतकरी बांधवांचे आभार मानले.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पुसद जि. यवतमाळ यांचे कार्यालय, पुसद**

**जाहीर - नोटीस**

एम.आर.सी. ८१/३७६/२०२६
तहसिल कार्यालय, पुसद
दिनांक ०६/०८/२०२६

**आवेदक- श्री. सौ. शिवकन्या विजय दिंडे रा. हेगडी ता. पुसद जि. यवतमाळ**

**अपावेदक नगर परिषद, पुसद सचिव, ग्राम पंचायत हेगडी ता. प्रसद-जि. यवतमाळ**

ज्याअर्थी अर्जदार नामे श्री. सौ शिवकन्या विजय दिडे पुसद जि. यवतमाळ यांनी त्यांचे मुलगा नामे श्री/सी/श्रीमती कार्तिक विजय दिडे । हेगडी यांच्या जन्माची नोद न्यायालयात जन्म मृत्यू नोंदणी कायद्याचे कलम १३ (३) प्रमाणे दिनांक १२/०९/२०१४ रोजी त्यांच्या अन्य त्याने राहत्या घरी मौजा हेगड्डी ता. पुसद जि. यवतमाळ येथे झाला आहे. या बाबत यांच्या जन्माची नोंद सचिव, ग्रामपंचायत शेगडी पंचायत समिती पुसद यांना घेण्याकरीता आदेश देण्यात यावा याकरीता दि. ०५/०८/२०२६ रोजी अर्ज या कार्यालयास प्राप्त झाले आहे. या करीता एम.आर.सी. ८१/ ३७६ /२०२६ तहसिल कार्यालय, पुसद च्या वतीने सचिव, ग्रामपंचायत हेगडी यांना पत्र देण्यात येत आहे. ज्याअर्थी सर्वत्र जनतेस या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार नामे, श्री. शिवकन्या विजय दिंडे रा. हेगडी स्वतः आई मुलगा मुलगी वडील भाऊ बहिण पूतण्या/आजोबा नामे श्री. सौ. कार्तिक विजय दिडे रा हेगडी ता. पुसद यांच्या जन्माची नोंदणी बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असेल तर त्यांनी हि जाहिर नोटीस प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या कार्यालयात आपण स्वतः हजर अगर आपले वकिला मार्फत हजर राहुन आपली हरकत अथवा आक्षेप लेखी स्वरुपात नोंदवावा, अन्यथा कोणालाही काहीही सांगवयाचे नाही असे गृहीत धरुन सदरहु अर्जदाराचा अर्ज निकाली काढण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व शिक्यानिशी दिली आहे.

**तहम्रिलेदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, पुसद**

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पुसद जि. यवतमाळ यांचे कार्यालय, पुसद**

**जाहीर - नोटीस**

एम.आर.सी. ८१/३७२/२०२६
तहसिल कार्यालय, पुसद
दिनांक ०६/०८/२०२६

**आवेदक- श्री. सी. बळवंत अर्जुन राठोड रा. हेगडी ता. पुसद जि. यवतमाळ**

**अनावेदक- नगर परिषद, पुसद सचिव, ग्राम पंचायत हेगडी ता. पुसद जि. यवतमाळ**

ज्याअर्थी अर्जदार नामे श्री. सो बळवंत अर्जुन राठोड पुसद जि. यवतमाळ यांनी त्यांचे स्वतः नामे श्री/सी/श्रीमती बळवंत अर्जुन राठोड रा हेगडी यांच्या जन्माची नोद न्यायालयात जन्म / मृत्यू नोंदणी कायद्याचे कलम १३ (३) प्रमाणे दिनांक ०५/०७/२००७ रोजी त्यांच्या जन्म त्याचे राहत्या घरी मौजा हेगडी ता. पुसद जि. यवतमाळ येथे झाला आहे. या बाबत यांच्या जन्माची नोंद सचिव, ग्रामपंचायत हेगडी पंचायत समिती पुसद यांना घेण्याकरीता आदेश देण्यात यावा याकरीता दि. ०५/०८/२०२६ रोजी अर्ज या कार्यालयास प्राप्त झाले आहे. या करीता एम.आर.सी. ८१/ ३७२ /२०२६ तहसिल कार्यालय, पुसद च्या वतीने सचिव, ग्रामपंचायत हेगडी यांना पत्र देण्यात येत आहे. ज्याअर्थी सर्वत्र जनतेस या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार नामे, श्री. बळवंत अर्जुन राठोड रा. हेगडी स्वतः आई मुलगा मुलगी / वडील / भाऊ बहिण पुतण्या/आजोबा नामे श्री. सो. बळवंत अर्जुन राठोड रा हेगडी ता. पुसद यांच्या जन्माची नोंदणी बाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असेल तर त्यांनी हि बाहिर नोटीस प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या कार्यालयात आपण स्वतः हजर अगर आपले वकिला मार्फत हजर राहुन आपली हरकत अथवा आक्षेप लेखी स्वरुपात नोंदवावा, अन्यथा कोणालाही काहीही सांगवयाचे नाही असे गृहीत धरुन सदरहु अर्जदाराचा अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व शिक्यानिशी दिली आहे.

**तहम्रिलेदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, पुसद**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## शेतकऱ्यांच्या प्रश्नावर काँग्रेस आक्रमक, तहसीलदार यांना निवेदन

# अतिवृष्टी बाधितांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्या

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

तालुक्यात ३० जुलै रोजी झालेल्या ढगफुटीसदृश अतिवृष्टीमुळे शेती, घरे आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट ५० हजार प्रति हेक्टर आर्थिक मदत, घरांचे पंचनामे करून तातडीने नुकसानभरपाई, पीकविम्याची २५ टक्के आगाऊ रक्कम आणि बांधकाम कामगारांच्या पाल्यांसाठी बंद करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती योजना तात्काळ पूर्ववत सुरू करण्याच्या मागणीसाठी काँग्रेस, युवक काँग्रेस व NSUI च्या वतीने नांदगाव खंडेश्वर तहसील कार्यालयावर धडक देण्यांत आली.



यावेळी तहसीलदारांमार्फत शासनाला निवेदन देण्यात आले.अतिवृष्टीमुळे तालुक्यातील शेकडो हेक्टरवरील उभी पिके पाण्याखाली गेली असून नदी-नाल्यांच्या पुरामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे.

शेतातील स्प्रिंकलर संच, पाईप, नोझल व इतर सिंचन साहित्य पुराच्या पाण्यात वाहून गेले.

अनेक गावांमध्ये घरांमध्ये पाणी शिरून घरे कोसळली असून बाधित कुटुंबांना तातडीने पंचनामे करून प्रति घर १ लाखांची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली. पीकविमा भरलेल्या शेतकऱ्यांना त्वरित २५ टक्के आगाऊ पीकविमा मंजूर करावा तसेच अतिवृष्टीग्रस्त विद्यार्थ्यांचे शाळा व महाविद्यालयांचे १०० टक्के शैक्षणिक शुल्क माफ करावे या मागणीचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे महासचिव परीक्षित जगताप,तालुका युवक काँग्रेस अध्यक्ष दीपक भगत,शहर काँग्रेस अध्यक्ष अमोल धवसे, NSUI अध्यक्ष ऋषिकेश मुंदे, तालुका युवक काँग्रेस उपाध्यक्ष व सोशल मीडिया प्रमुख मंगेश जोगे,जिल्हा युवक काँग्रेस उपाध्यक्ष प्रसाद भगत, प्रवीण मोकडे, शिवाजी चव्हाण, सुनील इंझडकर, गोलू मेटे, ज्योतिपाल चवरे,शंतनू धवस,कैलास लांडे,तन्वीर पटेल, अतुल दुधे,शेख हारून, मो. समीर,विजय चिंचे, उत्तमजी पवार, प्रतीक गावणार,हरिओम सारवे, जुनेद, कुंदन राऊत,प्रमोद इंझडकर, मोफिक शेख यांच्यासह कॉंग्रेस,युवक काँग्रेस, काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात विविध तज्ञ डॉक्टरांचे पद रिक्त

## आयसीयू आणि रक्तपेढी केंद्राचा अभाव

**अचलपूर/वार्ताहर**

शहरातील जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात अचलपूर तालुक्यातून नव्हे तर मेळघाटसह जिल्ह्यातील विविध शहरी व ग्रामीण भागातून उपचारासाठी रुग्ण मोठ्या संख्येने येतात.यात प्रस्तुतीसाठी गर्भवती महिलांची संख्या अधिक असताना या रुग्णालयात विविध तज्ञ डॉक्टरांचे पद रिक्त असल्याने याचा फटका उपचारासाठी आलेल्या रुग्णांना सहन करावा लागतो आहे.

विशेष म्हणजे रुग्णालयात गर्भवती महिलांची प्रसुती दरम्यान प्रकृती बिघडली तर आयसीयूची सुविधा येथे उपलब्ध नाही.यामुळे ५ ऑगस्ट रोजी एका गर्भवती महिलांची ब्लड प्रेशर वाढल्याने तिला पुढील उपचारासाठी अमरावती येथे रुग्णालयात दाखल करण्यात आले.याची माहिती मिळताच नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने यांनी रुग्णालयात भेट देऊन संबधित रुग्णाच्या प्रकृतीबाबत डॉक्टरांशी चर्चा केली. मात्र यावेळी अनेक रुग्णांच्या नातेवाईकांनी काही डॉक्टर , नर्स स्टाफ चा मनमानी व उद्धट वागणुकीबाबत नगराध्यक्षांकडे तक्रार केला.एकीकडे अचलपूर ते अमरावती शहराचा अंतर ५० किलो मीटर आहे. आणि रात्री दरम्यान रुग्णाची काही प्रकृती बिघडली तर रुग्णांना विविध अडचणीचा सामना करावा लागतो.यामुळे अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात आय . सी.यू केंद्र ,रक्त संकलन केंद्राची निर्मिती करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.सोबतच फिजीशियन, स्त्री रोग तज्ञ,मेडिकल ऑफिसर चे रिक्त पदे तत्काळ भरण्याची मागणी सुद्धा होत आहे.

आरोग्याचा विषय महत्त्वपूर्ण आहे.अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात रिक्त पदे तत्काळ भरून रुग्णांना उपचारासाठी सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्या यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार,राज्याचे कॅबिनेट मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे याबाबत निवेदन देऊन पाठपुरावा करणार आहे.

**-सुरेखा ठाकरे,**
माजी अध्यक्ष ,अमरावती जिल्हा परिषद.



यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती,आढावा घेऊन शासन स्तरावर पाठपुरावा करणार आहे.

**-बच्चू कडू,**
विधानपरिषद आमदार शिवसेना शिंदे गट.

अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात रिक्त पदे लवकरच शासन स्तरावरून भरली जाणार आहे.याबाबत राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला आहे.तसेच जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्या यासंदर्भात जिल्हाशल्याचिकित्सक यांच्याशी चर्चा करून ठोस उपाययोजना राबविण्याचे निर्देश देणार आहे.

**-आ.प्रवीण तायडे,**
आमदार,अचलपूर मतदार संघ.

अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात उपचारासाठी मोठ्या संख्येने रूग्ण येतात. या रुग्णालयात शासन स्तरावरून जिल्हा निर्मितीच्या दृष्टीने सर्व मूलभूत सुविधा भविष्यात उपलब्ध होणार आहे.मात्र या रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना व नातेवाईकांना नर्स स्टाफ कडून चांगली वागणूक मिळणे अपेक्षित आहे. यासाठी मी अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयाला भेट दिली होती.यादरम्यान प्रसूतीसाठी आलेल्या गर्भवती महिलांची साधी आरोग्य तपासणी झाली नव्हती.यामुळे याबाबत ठोस उपाययोजना राबविण्याची गरज आहे.

**-रुपाली माथने,** नगराध्यक्ष, अचलपूर

### रुग्णांची गैरसोय थांबवा; शासकीय रक्तपेढी द्या

अचलपूर हे उपजिल्हा तसेच भविष्यातील जिल्हा म्हणून महत्त्वाचे केंद्र मानले जाते. मेळघाटासह अचलपूर परिसरातील हजारो रुग्ण सर्वप्रथम अचलपूर जिल्हा स्त्री व बाल रुग्णालयात उपचारासाठी येतात. मात्र रक्तपेढी नसल्यामुळे रुग्णांना, विशेषतः गर्भवती माता, अपघातग्रस्त आणि गंभीर आजार असलेल्या रुग्णांना रक्तासाठी अमरावती किंवा खाजगी रक्तपेढ्यांवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे आर्थिक भार वाढण्याबरोबरच उपचारालाही विलंब होतो.अमरावतीनंतर धारणीपर्यंत शासकीय रक्तपेढी नसल्याने अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात तातडीने शासकीय रक्तपेढी सुरू करणे ही काळाची गरज आहे.तसेच रुग्णांना मोफत रक्त उपलब्ध होईल. शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित कार्यवाही करावी, हीच सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा आहे.

**-राजू उर्फ नील माहेश्वरी,** स्वीकृत नगरसेवक, अचलपूर नगर परिषद

## अमरावतीत सायबर पोलिसांची कारवाई

# ‘म्युल अकाउंट’ रॅकेटचा पर्दाफाश; मुख्य आरोपीसह तिघे जेरबंद

**अमरावती/का.प्र.**

सायबर फसवणुकीतून मिळणारी रक्कम स्वीकारण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या ‘म्युल अकाउंट’च्या माध्यमातून सायबर गुन्हेगारांना मदत करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा शहर सायबर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे.या प्रकरणात मुख्य आरोपीसह तिघांना अटक करण्यात आली असून त्यांच्या ताब्यातून मोबाईल हँडसेट, सिमकार्ड तसेच विविध बँक खात्यांची माहिती असलेली कागदपत्रे जप्त करण्यात आली.

सायबर पोलीस स्टेशन, अमरावती शहर यांनी ‘म्युल अकाउंट हॉटस्पॉट’चे तांत्रिक विश्लेषण करताना बँक ऑफ इंडिया,येथील एका खात्यात देशातील तब्बल २० राज्यांमधील सायबर फसवणुकीची रक्कम जमा झाल्याचे उघडकीस आले. तपासादरम्यान हे खाते शेख अमीन शेख लतीफ यांच्या नावावर असल्याचे निष्पन्न झाले. तपासात सायबर फसवणुकीतून आलेली रक्कम या खात्यात जमा करून ती पुढे विविध बँक खात्यांमध्ये व इतर माध्यमांतून हस्तांतरित केली जात असल्याचे स्पष्ट झाले. हे खाते ऑनलाइन गेमिंग, क्रिप्टोकरन्सी व्यवहार आणि सायबर फसवणुकीसाठी ‘म्युल अकाउंट’ म्हणून वापरण्यात आले असून या खात्यातून सुमारे ७१ लाख रुपयांचे व्यवहार झाल्याची माहिती समोर आली. या प्रकरणी सायबर पोलीस स्टेशनमध्ये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३१८(४), ११२(२), ३(५), ६१(२) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कलम ६६(डी) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तांत्रिक तपासात शेख अमीन शेख लतीफ याने पैशाच्या मोबदल्यात हे खाते रवी विश्वनाथ गडलिंग (रा.राहुल नगर, अमरावती) याला उपलब्ध करून दिल्याचे समोर आले.त्यानंतर रवी गडलिंग याने ते खाते आकाश दीपक जयसिंघानी (रा.रामनगर,वर्धा) याच्याकडे दिल्याचे तपासात निष्पन्न झाले.पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने वर्धा येथे छापा टाकून मुख्य आरोपी आकाश जयसिंघानी याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चार सिमकार्ड, विविध बँक खात्यांच्या तपशीलाच्या चिठ्ठ्या आणि दोन मोबाईल फोन जप्त करण्यात आले. या प्रकरणात शेख अमीन शेख लतीफ, रवी विश्वनाथ गडलिंग आणि आकाश दीपक जयसिंघानी या तिघांना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे.ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त (मुख्यालय) प्रांजली सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांच्या नेतृत्वात सायबर पोलिसांच्या पथकाने केली.

### नागरिकांना पोलिसांचे आवाहन

कोणत्याही कमिशनच्या किंवा आर्थिक आमिषाच्या मोबदल्यात स्वतःचे बँक खाते,एटीएम कार्ड, यूपीआय किंवा बँकिंग माहिती इतरांना देऊ नका.असे खाते ‘म्युल अकाउंट’ म्हणून वापरणे किंवा उपलब्ध करून देणे हा गंभीर गुन्हा आहे.अशा प्रकारची माहिती तात्काळ सायबर पोलीस स्टेशनला द्यावी. सायबर फसवणूक झाल्यास त्वरित १९३० या हेल्पलाइनवर संपर्क साधावा किंवा www.cybercrime.gov.in या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी.

# मैत्री दिनाच्या निमित्ताने विशेष व्याख्यान



**अमरावती/का.प्र.**

श्री .आर .आर. लाहोटी विज्ञान महाविद्यालय मोर्शी येथे महिला तक्रार निवारण समिती व सखी सावित्री समितीअंतर्गत ‘मैत्री दिनाचे’औचित्य साधून विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. व्याख्यानाचा विषय ‘संवाद :निखळ मैत्रीचा आणि सुरक्षिततेचा’ हा होता .या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी .एन .चौधरी तर प्रमुख वक्ता म्हणून राहुलजी आठवले ठाणेदार,वक्त्या ॲड.मंजुषा खांडेकर या उपस्थित होत्या. प्रमुख अतिथी म्हणून पर्यवेक्षक अतुल वानखडे,विनोद सावरकर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या समन्वयिका डॉ.दिपाली चिखले ,डॉ. स्वाती गेडाम याही उपस्थित होत्या.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ठाणेदार राहुल आठवले यांनी मैत्रीचे बंध जपता जपता सुरक्षिततेचा मार्ग कसा अवलंबवावा व या तरुण वयातील मुलांनी व्यसनांपासून दूर राहून स्वतःच्या सुरक्षिततेची कशी काळजी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले.

ॲड. मंजुषा खांडेकर यांनी सायबर सुरक्षिततेबरोबरच लैंगिक अत्याचार व त्यासाठी कायदा कसा सहकार्य करू शकतो या कायद्याचे ज्ञान तरुण वयातील मुला मुलींनी कसे ठेवावे याबाबत मार्गदर्शन केले तर अध्यक्षीय भाषणामध्ये मा. प्राचार्य डॉ. जी .एन. चौधरी यांनी विद्यार्थ्यांनी मैत्री जपता जपताच विवेकी मार्गाचा अवलंब करावा व सद विचारांची कास धरावी असे सांगितले.प्रास्ताविक डॉ. दिपाली चिखले यांनी केले.संचालन शितल भांडे यांनी तर आभार प्रदर्शन कु.सुमय्या शेख यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# मनपाचा स्थापना दिन विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा होणार:महापौर

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिकेचा १५ ऑगस्ट रोजी होणारा स्थापना दिन यंदा सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन, आरोग्य जनजागृती आणि सांस्कृतिक वैभवाचा संगम ठरणाऱ्या विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या अनुषंगाने महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या अध्यक्षतेखाली स्व. सुदामकाका देशमुख सभागृहात महत्त्वपूर्ण नियोजन बैठक पार पडली.

बैठकीत स्थापना दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता ‘जनतेचा उत्सव – शहराच्या विकासाचा संकल्प’ या संकल्पनेतून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. नागरिकांचा जास्तीत जास्त सहभाग मिळावा यासाठी सामाजिक, सांस्कृतिक आणि जनकल्याणकारी उपक्रमांचे नियोजन करण्यात आले असून सर्व विभागांनी परस्पर समन्वयातून कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले.

स्थापना दिनाच्या पूर्वसंध्येला शहरभर मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण अभियान राबविण्यात येणार आहे.त्याचबरोबर भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. युवकांनी आणि सामाजिक संस्थांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून सामाजिक जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन करण्यात आले.स्थापना दिनानिमित्त विविध मान्यवरांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.



महानगरपालिकेच्या स्थापनेपासून शहराच्या विकासात मोलाचे योगदान देणाऱ्या सर्व माजी महापौरांचा विशेष सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे. याशिवाय संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे भव्य सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. स्वातंत्र्यदिन आणि महानगरपालिका स्थापना दिन या दुहेरी पर्वाचे औचित्य साधणारा हा सोहळा नागरिकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे. कार्यक्रमांतर्गत देशभक्ती गीत गायन स्पर्धा, ‘वर्धापन दिन व १५ ऑगस्ट’ या विषयावरील रांगोळी स्पर्धा, महाराष्ट्राच्या संस्कृतीवर आधारित नृत्य, अभंग, गवळण, भारुड अशा विविध लोककलांचा २५ पेक्षा अधिक कलाकारांच्या सहभागातून रंगणारा मनोरंजक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.स्थापना दिनानिमित्त अमरावती महानगरपालिकेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या ऐतिहासिक प्रवासाचे दर्शन घडविणारी दुर्मीळ छायाचित्रांची विशेष प्रदर्शनीही तयार करावी. तसेच सफाई कर्मचारी, इतर मनपा कर्मचारी आणि नागरिकांसाठी रक्तातील विविध तपासण्या, सर्वसमावेशक आरोग्य तपासणी शिबीर, नेत्र तपासणी शिबीर आयोजित करण्यात येणार असून ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध शासकीय योजनांची माहिती व लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष सुविधा केंद्र उभारण्यात येणार आहे.

यावेळी शहरातील सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना, शैक्षणिक संस्था, व्यापारी संघटना, युवक मंडळे तसेच सर्व नागरिकांनी स्थापना दिनानिमित्त आयोजित विविध उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी करावेत, असे आवाहन महापौर श्रीचंद तेजवानी यांनी केले.या बैठकीत उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेते चेतन गावंडे, विरोधी पक्षनेते विलास इंगोले, गटनेते नाना आमले, नगरसेवक रतन डेंडुले, डॉ. प्रशांत देशपांडे, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त भाग्यश्री बोरेकर तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# जनार्दन स्वामी खेर चॅरिटेबल ट्रस्टतर्फे ३५ हजारांची देणगी



**अमरावती/का.प्र.**

विदर्भ महारोगी सेवा मंडळाच्या तपोवन संस्थेतर्फे मेळघाटातील दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी राबविण्यात येत असलेल्या ‘निवारा’ या स्वअर्थसहाय्यित प्रकल्पासाठी टाकरखेडा, जि. धुळे येथील परमहंस सद्गुरु श्री जनार्दन स्वामी खेर चॅरिटेबल ट्रस्टतर्फे ३५ हजार रुपयांची देणगी देण्यात आली. या मदतीचा उपयोग ‘निवारा’ प्रकल्पातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शालेय गणवेशासाठी करण्यात येणार आहे.संस्थेत सौरभ पाचखेडे व राहुल नाटकर यांनी ३५ हजार रुपयांचा धनादेश संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी तपोवन संस्थेचे उपसचिव ऋषिकेश देशपांडे उपस्थित होते.याप्रसंगी प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांच्या हस्ते सौरभ पाचखेडे व राहुल नाटकर यांचा देऊन सत्कार केला.

# वर्ककोड,जॉबकार्ड त्रुटींमुळे घरकुल निधी रखडला

## उपसरपंचांचे बीडीओंना निवेदन, प्रश्न न सुटल्यास स्वातंत्र्यदिनानिमित्त आंदोलनाचा इशारा

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

तालुक्यातील ग्रामिण भागातील अनेक घरकुल लाभार्थ्यांना जॉबकार्डवरील चुकीचे क्रमांक तसेच अनेक लाभार्थ्यांचे वर्ककोड जनरेट न झाल्यामुळे घरकुलाचा निधी आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) मिळणारे मजुरीचे पैसे रखडल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात चांदूरवाडीचे उपसरपंच अब्दुल शहजाद अब्दुल रज्जाक (शेख सोनू) यांनी गटविकास



अधिकारी, पंचायत समिती चांदूर रेल्वे यांना लेखी निवेदन देऊन १५ ऑगस्टपर्यंत प्रश्न मार्गी न लावल्यास पंचायत समितीसमोर जनआंदोलन व उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, संपूर्ण तालुक्यात अनेक घरकुल लाभार्थ्यांच्या जॉबकार्डवरील क्रमांक चुकीचे नोंदविण्यात आले आहेत, तर अनेकांचे वर्ककोड अद्याप तयार झालेले नाहीत. त्यामुळे घरकुलासाठी मंजूर झालेला निधी तसेच मनरेगा अंतर्गत मिळणारी मजुरी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होत नसल्याने अनेकांचे घरांचे बांधकाम अर्धवट अवस्थेत आहे. या समस्येबाबत पंचायत समितीकडे गेल्या दोन वर्षांपासून वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप ठोस तोडगा निघालेला नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे १५ ऑगस्ट पर्यंत सर्व लाभार्थ्यांच्या अडचणी दूर करून रखडलेला निधी वितरित करण्यात यावा, अन्यथा पंचायत समिती चांदूर रेल्वे कार्यालयासमोर जनआंदोलन व उपोषण करण्यात येईल. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही चांदूरवाडीचे उपसरपंच अब्दुल शहजाद अब्दुल रज्जाक (शेख सोनू) यांनी निवेदनातून दिला आहे.

# ‘राजमाता जिजाऊ’ अत्याधुनिक बससेवा-आ.सुलभा खोडके

## बससेवेचे आमदारांच्या हस्ते लोकार्पण

**अमरावती/का.प्र.**

राजमाता जिजाऊ ही बस सेवा सुरु झाल्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची क्षमता आणि गुणवत्ता दोन्ही वाढण्याची शक्यता आहे. या बस सेवेचे नाव राजमाता जिजाऊ ठेवण्यात आले असून त्यामागे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक प्रेरणा आहे. एकंदरीत राजमाता जिजाऊ बस सेवा ही एसटीच्या आधुनुकीकरणातील एक महत्वाची पायरी ठरत असून यामुळे प्रवाशांचा अनुभव अधिक चांगला होण्याची अपेक्षा आहे. सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम आणि आकर्षक बनवण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्वाचा ठरणार असून भविष्यात या



सेवेचा विस्तार आणि प्रभाव याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. असे प्रतिपादन आ.सुलभा खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले.

अमरावती मध्यवर्ती बस स्थानक व राज्य परिवहन महामंडळाच्या आगार क्रमांक - १ येथील परिसर स्थित राजमाता जिजाऊ बससेवा लोकार्पण कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी सर्वप्रथम राष्ट्रमाता, राजमाता-माँ जिजाऊ यांच्या प्रतिमेस आ.खोडके यांच्या हस्ते नमन-माल्यार्पण करण्यात आले.तद्नंतर ‘राजमाता जिजाऊ’ बससेवेचे त्यांनी पूजन करून फीत कापून या बससेवेच्या लोकार्पणाची औपचारिकता साधली.

यावेळी अभियंता नरसिंग चव्हाण तसेच आगार क्रमांक - १ च्या व्यवस्थापक आनंदी बेलोरकर यांनी आ.खोडके यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.लोकार्पण कार्यक्रमाप्रसंगी विभागीय वाहतूक अधिकारी पवन लाजूरकर, आगार क्रमांक-१ व्यवस्थापक आनंदी बेलोरकर, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक - हर्षल धारणे, प्रभारक - नाजूकराव राणे, सहायक वाहतूक अधीक्षक कमल वानखडे यासोबतच प्रशासकीय चालक वाहक व यांत्रिक कर्मचारी तसेच प्रवासी व विद्यार्थी प्रामुख्याने उपस्थित होते.



# जेन झी विचारत आहे आम्ही कोठे आहोत?

जेन झी 'जीडीपी-इझम' (GDPism) च्या थोथरीत देऊन विचारत आहे तू एवढी इतकी वर्षे चमकोगिरी करत आहेस, पण आम्हाला काय मिळाले? गेली अनेक वर्षे भारताची अर्थव्यवस्था किती ग्रेट काम करत आहे याचे नगारे पंतप्रधानांपासून सर्व प्रवक्ते वाजवत असतात. देशाची जीडीपी जगात सर्वात वेगाने वाढत आहे यासाठी नाणेनिधी पासून अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची सर्टिफिकेट मिरवली जात असतात.

जगातील सर्व देशांमध्ये आपल्या जीडीपीचा नंबर पाचवा आहे तो लवकरच चौथ्या स्थानावर जाणार आहे इत्यादी. जगात दरडोई जीडीपी मध्ये आपला कितवा नंबर कितवा होता त्यात किती सुधारणा झाली ष्ठहे मात्र एकही सरकारी प्रवक्ता कधीही सांगायचे धाडस करत नाही. हा काही बौद्धिक प्रामाणिकपणा खचितच नाही.

दहा वर्षांपूर्वी दोन ट्रिलियन डॉलर्स असणारी आपली जीडीपी आज चार ट्रिलियन डॉलर्स वर गेली आहे. त्यात भर घालून बघा आमचे शेयर मार्केट निर्देशांक, त्याचे बाजारमूल्य देखील वेगाने वाढले हे आवर्जून सांगितले जात आहे. सेन्सेक्स दहा वर्षापूर्वी २८,००० अंशावर होता तो आज ७८,००० अंकावर आहे. यातील कोणतेच आकडे हे शिजवलेले नाहीत. चला चर्चेसाठी मान्य करू.

जेन झी विचारत आहे? यात आम्ही कोठे आहोत.गेली अनेक दशके कोट्यावधी पालकांनी बरोबर निरीक्षण केले होते की आपल्या मुला मुलीला कॉलेजचे शिक्षण दिले तर त्यांना चांगल्या पगाराची नोकरी मिळेल. अनेक पिढ्यांचे आपले दारिद्र्य कमी होईल.वीस वर्षांपूर्वी देशात कोणती ना कोणती पदवी असणाऱ्यांची संख्या ५ कोटी होती ती आता १५ कोटी झाली आहे. यातील एक तृतीयांश बॉटम ऑफ पिरॅमिड कुटुंबातून आलेले आहेत.

आज देशात कॉलेज डिग्री आणि त्यावरील शिक्षण देणाऱ्या ७०,००० संस्था आहेत. त्यातील ८० टक्के खाजगी आहेत. खासगी हा महागडे यासाठी प्रतिशब्द आहे. याचा अर्थ असा की त्या कुटुंबांनी आपल्या पोटाला चिमटा काढून, कर्जे काढून, वेळ पडली तर सोने, जमिनी गहाण ठेवून वा विकून आपल्या पाल्यांना उच्च शिक्षण दिले आहे. कशासाठी? तर चांगली नोकरी मिळेल या आशेनेष्ठवस्तुस्थिती काय आहे.

वीस वर्षात ज्या १० कोटी तरुणांनी कॉलेज शिक्षण घेतले त्यापैकी फक्त ३.४ कोटी तरुणांना काहीबाही नोकरी मिळाली. २.२ तरुण स्वयंरोजगार किंवा कॅज्युअल जॉब करत आहेत. म्हणजे ४.४ कोटी रोजगार, स्वयंरोजगाराच्या शोधात असतात.बारा पदवी धारकांपैकी फक्त एक जण असे काम करत आहे ज्याचा त्याने घेतलेल्या कॉलेज शिक्षणाशी काहीतरी संबंध आहे. देशात डिलिवरी बॉईज म्हणून काम करणाऱ्यापैकी एक तृतीयांश पदवी धारक आहेत. रोजगारासाठी एवढी तीव्र स्पर्धा आहे ज्याचा फायदा नोकरी देणारे घेत आहेत. या सर्व वर्षात महागाई लक्षात घेतली तर या वर्गाचे वेतनमान वाढलेले नाही.

(सर्व आकडेवारी संदर्भ RUPE INDIA website)

लक्षात घेऊया की, वरील आकडेवारीत अर्थात जेन झी च्या पुढे मागे असणारे वयोगट आहेत. ज्यांनी देशभर आंदोलन करून आपली भडास बाहेर काढली. फक्त आकडे बघा. म्हणजे सर्व देशात का आगडोंब उसळला ते कळेल. जीडीपी वाढली, शेयर मार्केट वधारले की नाही? तर हो. पण त्याचा फायदा अगदी विषम स्वरूपात, १५ ते २० टक्के नागरिकांना झाला आहे. इतरांना उरले सूरले. फक्त दारिद्र्यामुळे असंतोष तयार होत नाही. आर्थिक विषमतेमुळे काही पटींनी जास्त असंतोष तयार होत असतो.

देशात राजकीय लोकशाही आहे म्हणजे मतदार नागरिक राज्यकर्त्यांना निवडतात म्हणून त्यांना विविध निर्णय घेण्याचे अधिकार मिळू शकतात. ते काही देवाने पाठवलेले नाहीत. कशासाठी निवडतात? तर हे राज्यकर्ते आपले भले करतील या आशेने. त्यांच्यावर आशा का ठेवतात? कारण मत मागताना त्या नेत्यांनी आश्वासने दिलेली असतात. आठवून बघा.

जेन झी देशाच्या आणि एकूणच राजकीय अर्थव्यवस्थेबाबत गाभ्यातील प्रश्न विचारत आहे. आर्थिक विकास म्हणजे नक्की काय? आणि हा प्रश्न ते पुन्हा पुन्हा विचारणार आहेत. त्यांच्या नंतर येऊ घातलेल्या अल्फा, बीटा पिढ्या हे सर्व बघत आहेत. येणाऱ्या पिढ्या जेन झी ची बाप असणार आहेत. कृती देखील करू लागले आहेत.

खरेतर शाळेतील मुला मुलींना त्यांच्या शिक्षक, टॉयलेट अशा साध्या मागण्यांसाठी रस्त्यावर यावे लागते ही एक समाज, राष्ट्र म्हणून शरमेची बाब आहे.. सगळी मज्जा आहे. शरम वाटणे कमकुवतपण मानले जाते तेथे काय?

**संजीव चांदोरकर**

# स्तनपान बाळाचा सर्वोत्तम आहार

दरवर्षीप्रमाणे १ते ७ ऑगस्ट दरम्यान जगभरात जागतिक स्तनपान सप्ताह म्हणून साजरा केला जातो. नवजात बालकांसाठी आईच्या दुधाचे महत्त्व पटवून देणे आणि स्तनपान बाबत समाजामध्ये जागरूकता निर्माण करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश.स्तनपानाचे महत्त्व आणि फायदे याविषयी समाजात जागृती करणे हा या सप्ताह निमित्त अतिशय महत्त्वाचा असा उद्देश समाजापुढे ठेवते आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार नवजात बाळाला जन्माच्या एका तासाच्या आत स्तनपान करणे हे अत्यंत महत्त्वाचे आणि गरजेचे आहे. पहिल्या सहा महिन्यात पर्यंत बाळाला आईचे दूध आणि दूधच पाजणे अतिशय महत्त्वाचे आहे. स्तनपान ही केवळ बाळाची भूक भागविण्याची प्रक्रिया नसून तर आई आणि बाळाच्या भावनिक संबंधाची सुदृढता आहे. आजही समाजात स्तनपाना बाबत काही गैरसमजुती आहे आणि त्या दूर करणे ही काळाची गरज आहे. बालकाच्या मेंदू विकासाबाबत अमेरिकेच्या हॉवर्ड मेडिकल संस्थेतील डॉक्टर मिनीयर यांनी मातेच्या स्तनपानावर विशेष भर दिला आहे. मातेच्या दुधात उत्तम पोषणमूल्य तर आहेतच, पण स्तनपानामुळे आई आणि मुलांमध्ये घट्ट नातेसंबंध निर्माण होतात. शक्य असेल तर दीड दोन वर्षापर्यंत ही स्तनपान चालू ठेवावे. स्तनपान करीत असताना बाळाच्या मेंदूला चालना मिळते, असे संशोधनातून सिद्ध झालेले आहे.



**स्तनपानाचे महत्त्व आणि बाळासाठी फायदे**

१)संपूर्ण पोषण-कार्बोहायड्रेट्स,पाणी हे सर्व पदार्थ आईच्या दुधात मिसळलेले असतात.आईच्या दुधाला अमृताची उपमा दिलेली आहे कारण बाळाच्या सहा महिन्याच्या पोषणाचे संपूर्ण पोषक घटक,जीवनसत्वे यासाठी स्तनपान हे अतिशय महत्त्वाचे आहे.यामुळे बाळाची वाढ, वजन आणि रोगप्रतिकारक शक्ती उत्तम प्रकारे वाढते.

२) रोगप्रतिकारक शक्ती-आईच्या पहिल्या पिवळसर दुधामध्ये खेरस (कोलेस्ट्रम)भरपूर प्रमाणात अँटीबोडीज असतात.पोषणाला विविध आजारापासून व संसर्गापासून वाचवतात आईच्या दुधाला बाळाचे कवच कुंडले सुद्धा म्हटलेले आहे ते याच कारणांमुळे.

३)पचनक्रिया सुधारते- बाळ सहजपणे आईचे दूध पचवू शकतो आणि त्यामुळे पोटाचे विकार किंवा डायरियाचा धोका राहत नाही कारण आईचे दूध बाळासाठी सर्व दृष्टीने पोषक असते अनेक रोगांपासून त्याला मुक्त ठेवण्यास मदत होते.

**आईसाठी महत्त्व-** ज्याप्रमाणे स्तनपान बाळासाठी वरदान आहे त्याचप्रमाणे त्याचे फायदे आईला सुद्धा आहे.कर्करोगापासून संरक्षण- स्तनपान नियमितपणे केल्यास त्यांना कर्करोगाचे प्रमाण कमी होते. स्तनपानामुळे दुधाच्या गाठी तयार न होत न होता त्यामुळे स्तन कर्करोग आणि गर्भाशयाचा कर्करोगाचा धोका महिलांमध्ये कमी होतो.

भावनिक जवळीक- स्तनपानामुळे आई आणि बाळ यांच्यामध्ये एक सुंदर भावनिक नाते निर्माण होते.अनेक संशोधकाय आणते असे सिद्ध झालेले आहे की बाळाला आणि आईला स्तनपानामुळे भावनिक संरक्षण आणि ऊर्जा मिळते.आईच्या दुधामध्ये बाळाच्या विकासासाठी सर्व पोषक घटक उपलब्ध असतात.बाळाला विविध आजारांपासून संरक्षण मिळते आणि आईचे सुद्धा अनेक आजारापासून संरक्षण होते.

स्तनपान हे केवळ एक पोषण नसून बालकाच्या निरोगी भविष्यासाठी पायाभरणी आहे. जागतिक स्तनपान सप्ताहाच्या निमित्याने आपण सर्वांनी मिळून समाजात याविषयीचे गैरसमज दूर केले पाहिजेत आणि मातांना स्तनपानासाठी अनुकूल वातावरण मिळवून देण्याचे गरज आहे. बाहेरील जंतू संसर्गापासून एलर्जी यासारख्या रोगात प्रतिकार करणे शक्य होते . तसेच स्तनपानामुळे अस्थमा व दमा होण्याची शक्यता फार कमी होते. सणापणामुळे मुलांच्या मेंदूचा विकास वेळीच झाल्यामुळे बौद्धिक क्षमता उंचावते व बाळाची रोगप्रतिकारक क्षमता वाढते.यासाठी स्तनपान ही काळाची गरज आहे आई आणि बालकांसाठी दोघांसाठीही हे संरक्षणात्मक कवच आहे.

**डॉ.अश्विनी सु.हूड (जवळकार)**
गृह अर्थशास्त्र विभाग प्रमुख-
मो.९०११४७७४२३

# देश प्रगतीकडे की अधोगतीकडे...

देशात आज जात,धर्म अल्पसंख्याकवाद,बहुसंख्यांक वाद याच गोष्टींना प्राधान्य दिल्या जात आहे.इतर देशांसोबत तुलना केली तर तिथेही अनेक धर्मांचे लोक राहतात.परंतू त्याचा उपयोग राजकारणाशी कधीच करत नाही कारण त्या देशातील लोकांना आपल्या देशाची प्रगती अखंडता महत्वाची असते. देशात धर्मवाद, जातीवाद,अल्पसंख्याकवाद असा वाद करून देशाला घातक होईल अशी परिस्थिती कधीच निर्माण होऊ देत नाही.

आज सर्वसामान्यावर लावलेला कर तर तर जणू इंग्रजी लूटच वाटत आहे.नागरीकांच्या मुलभूत गरजा शिक्षण,आरोग्य, हे सुद्धा कराविना सोडले नाही आणि आपल्या राजकीय स्थैर्यासाठी अनाठायी अनेक कुचकामी योजना चालू करून लोकांना असे छंद केले की त्यांनी कधी महागाई,रोजगार,आवश्यक सुविधा या विषयी आवाजच उठवला नाही पाहिजे अशी परिस्थिती निर्माण करुन ठेवली आहे. लाडकी बहीण,भांडे वाटप,अश्या प्रकारच्या अनेक कुचकामी योजना स्वराजकीय हित डोळ्यासमोर ठेऊन तुम भी खावो हम भी खाते खरंच असल्याने देशाचा विकास खरोखरच होणार आहे का?

भारत हा कृषिप्रधान देश आहे.हा बळीराजा राबराब राबतो पण त्यांच्या मालाला आपण भाव काय देतो त्याचा उत्पादन खर्च काय असतो त्याची मेहनत काय आहे. त्याचा माल निघाला की आपले आयात धोरणे राबवून त्यांच्या मालाच्या किमती पाडणे हे धोरण कितपत योग्य आहे. उद्योगपती आपल्या मालाची किंमत ठरवून शकतो पण शेतकरी नाही अशी छडयंत्री व्यवस्था सरकारचे सुरुवात पासूनच करून ठेवली आहे.ह्या अन्नदात्या बळीराजाचा जेव्हा विकास होईल तेव्हाच या देशाचा विकास होऊ शकते.आज शेत अवजारे,बियाने, औषधे यावर तरी जी एस टी चे भूत नको. आज कित्येक बळीराजे आत्महत्या करतात का?

भ्रष्टाचार हा देशाच्या प्रगतीला तेवढाच बाधक आहे. जर राजाच भ्रष्ट असेल तर प्रशासन कुठे निकोप राहणार.राजा भ्रष्ट असल्यामुळे प्रशासनावर तो नियंत्रण ठेवून शकत नाही. अशी ज्या देशाची परिस्थिती असते तो देश प्रगती ऐवजी अधोगतीकडेच जाते. देशाला पोखरणारी कीड जिथेही लागली तो देश आतूनच खोकला बनत जातो आणि ही एक लागलेली चटक सहजासहजी जात नाही. उदा.तुकाराम मुंढे सारखे अधिकारी तयार होवो अशी जनता वाट पहात आहे. जनता आज या सरकारी अनैतिक धोरणाला कंटाळली आहे.

**संजय देशमुख**
म्मो.९४२१७८९००९

# दमदार कलावंत-प्रदीप रावत

भारतीय चित्रपटसृष्टीत दमदार आवाज, भेदक नजर आणि रांगड्या व्यक्तिमत्त्वामुळे प्रेक्षकांच्या मनात धडकी भरवणारे ज्येष्ठ अभिनेते प्रदीप रावत यांचे ४ ऑगस्ट रोजी निधन झाले. वयाच्या ७४ व्या वर्षी ब्लड कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराशी त्यांची झुंज संपली. त्यांच्या जाण्याने भारतीय सिनेसृष्टीने केवळ एक उत्कृष्ट खलनायकच नव्हे, तर एक अत्यंत ताकदवान आणि अष्टपैलू चरित्र अभिनेता गमावला आहे.

काही काळ बँकेत नोकरी केल्यानंतर त्यांनी आपल्यातील अभिनय गुणांना वाव देण्याचे ठरवून सिनेसृष्टीची वाट धरली. त्यांची अभिनय कारकीर्द तब्बल चार दशकांहून अधिक काळ विस्तारलेली होती. बी. आर. चोप्रा यांच्या 'महाभारत' या अजरामर पौराणिक मालिकेत त्यांनी साकारलेला 'अश्वत्थामा' आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहे; मात्र ते केवळ खलनायकी किंवा नकारात्मक भूमिकांमध्ये अडकून पडले नाहीत. आशुतोष गोवारीकर यांच्या 'लगान' या ऑस्कर नामांकित चित्रपटात त्यांनी 'देवा सिंग सोधी' या शूर आणि तापट शीख सैनिकाची भूमिका ताकदीने साकारली होती. 'सरफरोश' चित्रपटातील 'सुलतान' ही त्यांची भूमिका त्यांच्यातील अभिनयाची खोली आणि गांभीर्य दाखवून देणारी होती.

प्रदीप रावत यांचे नाव घेताच आजच्या पिढीच्या डोळ्यांसमोर उभा राहतो तो 'गजनी'. ए. आर. मुरुगादास दिग्दर्शित या ब्लॉकबस्टर चित्रपटात त्यांनी साकारलेला 'गजनी धर्मात्मा' हा भारतीय चित्रपटसृष्टीतील अविस्मरणीय खलनायकांपैकी एक मानला जातो. हिंदी 'गजनी'साठी दिग्दर्शकाला आमीर खानचे नाव सुचवण्यात त्यांचाच मोठा वाटा होता. यावरून त्यांचे आपल्या सहकलाकारांसोबतचे सलोख्याचे संबंध दिसून येतात. त्यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य म्हणजे संवादांपेक्षा त्यांची देहबोली आणि डोळ्यांतील भाव खूप काही सांगून जायचे. खलनायक साकारताना त्यांच्या केवळ पडद्यावर येण्यानेच एक प्रकारची दहशत निर्माण होत असे. दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत, विशेष करून तेलुगू चित्रपटांमध्ये (उदा. एस. एस. राजामौली यांच्या 'साय' चित्रपटातील 'भिक्षू यादव') त्यांनी आपला एक वेगळाच दबदबा निर्माण केला होता.



अलीकडेच त्यांनी 'धर्मरक्षक महावीर छत्रपती संभाजी महाराज' या मराठी चित्रपटात 'मुकर्रब खान' ही व्यक्तिरेखा साकारली होती.पडद्यावर अत्यंत क्रूर, हिंसक आणि निर्दयी दिसणारे प्रदीप रावत खऱ्या आयुष्यात मात्र अगदी याच्या उलट स्वभावाचे होते. पत्नी कल्याणी आणि मुलगा विक्रमादित्य यांच्यासह कुटुंबात रमणारे प्रदीप रावत मनमिळाऊ, शांत आणि सहकाऱ्यांशी आदराने वागणारे साधे गृहस्थ होते. त्यांच्यातील साधेपणा त्यांच्या अवाढव्य शरीरयष्टी आणि गंभीर चेहऱ्याच्या आड दडलेला असायचा. सेटवर ते नेहमी हसतमुख असत आणि नव्या कलाकारांना मार्गदर्शन करत असत. १५० हून अधिक चित्रपटांतून हिंदी, तेलुगू, तमिळ, मल्याळम, कन्नड आणि मराठी अशा अनेक भाषांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारे प्रदीप रावत खऱ्या अर्थाने एक पॅन इंडिया स्टार होते. त्यांच्या निधनाने रांगड्या पर्वाचा अंत झाला आहे. 'गजनी' आणि 'अश्वत्थामा' यांसारख्या सशक्त व्यक्तिरेखांमधून ते नेहमीच प्रेक्षकांच्या स्मरणात राहतील.

**तानाजी खोत**


## त-ड-का

### पेपरफुटी-षढयंत्र

पेपर फुटी म्हणजे
ब्लॅकमनी कमविण्याचे धंदे
यांच्यामुळेच तरुणाईच्या
जीवनाचे होत आहे वांदे..

परिक्षार्थी जाती जिवानिशी
गद्दारांची होतेय मजा
गळाला लागतील मोठे मासे
दयाच त्यांना फाशीची सजा..

हुशार विद्यार्थ्यांचे होते मरण
धनवान भोगती पदे
अशाने देशाचा विकास सांगा
कधी शक्य होईल का गडे..



**प्रा.अशोक सारडा, मेहकर**
मो.९४२१३९४३३९

# 'लेखणी थांबली..पण संघर्षाची प्रेरणा अमर झाली!'



निर्भीड पत्रकार, समाजसेवक नितीन थोरात यांना महाराष्ट्राची अश्रुपूर्ण श्रद्धांजली समाजातील अन्याय,भ्रष्टाचार आणि सर्वसामान्यांच्या वेदनांना शब्द देणारी एक निर्भीड लेखणी आज कायमची शांत झाली.पत्रकारिता आणि समाजसेवा हीच आपली जीवनसाधना मानणारे, विविध सामाजिक संघटनांच्या माध्यमातून जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करणारे नितीन थोरात यांचे अल्पशा आजाराने झालेले अकाली निधन ही संपूर्ण महाराष्ट्रासाठी अत्यंत दुःखद घटना आहे.

नितीन थोरात यांनी पत्रकारितेला केवळ बातम्यांचे माध्यम न मानता ती समाजपरिवर्तनाची ताकद बनवली. भ्रष्टाचार उघडकीस आणणे, सर्वसामान्य नागरिकांवरील अन्यायाला वाचा फोडणे, गरजू आणि वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनापर्यंत त्यांचा आवाज पोहोचवणे, तसेच सामाजिक प्रश्नांवर निर्भीड भूमिका घेणे ही त्यांच्या कार्याची खरी ओळख होती.

विविध सामाजिक संघटनांमधून त्यांनी लोकहिताची अनेक कामे केली. त्यांची स्पष्टवक्ती भूमिका, निःस्वार्थ सेवा, प्रामाणिकपणा आणि समाजाप्रती असलेली तळमळ यामुळे त्यांनी अनेकांच्या मनात मानाचे स्थान मिळवले. समाजासाठी जगणारा हा तरुण चेहरा आज आपल्यात नसला, तरी त्यांचे कार्य आणि विचार समाजाला कायम प्रेरणा देत राहतील.

नितीन थोरात हे फक्त संपादक नव्हते; ते आमचे अभिमान होते, समाजासाठी झटणारा एक जिद्दी कार्यकर्ता आणि सत्यासाठी निडरपणे उभा राहणारा योद्धा होता. त्यांच्या अकाली जाण्याने आमच्या पत्रकार कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ही वेदना शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे. या दुःखद प्रसंगी संपूर्ण महाराष्ट्रातील पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि नागरिकांनी थोरात कुटुंबाच्या दुःखात सहभागी व्हावे, हीच अपेक्षा. दिवंगत नितीन थोरात यांना हीच खरी श्रद्धांजली ठरेल की, त्यांनी जपलेले सत्य, न्याय आणि समाजसेवेचे विचार आपण पुढे नेऊ.

**सागर सव्वालाखे**
नांदगाव खंडेश्वर

श्रध्दांजली

# सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्व:भैय्यासाहेब पुजदेकर

आज श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे उपाध्यक्ष, माजी जिल्हा सरकारी वकील, ज्येष्ठ विधीज्ञ, उत्कृष्ट शेतकरी जयवंत उर्फ भैय्यासाहेब विनायकराव पाटील पुजदेकर यांचा आज वाढदिवस.आमचे पुजदा, जिल्हा अमरावतीतील खानदानी श्रीमंती असलेले व पिकाऊ भारी जमीन असलेले,गाव ,जमीन धारणा पण सरासरी भरपूर,परिणामी आधीपासूनच उंचावलेले राहणीमान.याच गावात ५५०० एकर शेतीचे मालक व बँकर असलेले स्व वामनराव आनंदराव पाटील हे दानशूर ,धार्मिक, व सावकारी व्यवसाय असून सुद्धा सामाजिक दायित्व व संवेदशिल व्यक्तिमत्त्व होते. त्या काळी डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्याशी त्यांचा विशेष स्नेह होता. डॉ भाऊसाहेबांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना बहुजन समाजातील शेतकरी कष्टक-यांचे मुलांना शिक्षण मिळावे हा उद्देश ठेवून केली,त्यासाठी ज्या मोजके लोकांनी आर्थिक व इतर मदत केली,त्यात मुख्य आश्रयदाते म्हणून त्यांचे नाव आजही आदराने घेतले जाते.गावात भव्य राम मंदिर बांधून मंदिराचे देखभालीसाठी १०० एकर जमीन देवून भव्य राम जन्मोत्सव सुरू केला. स्व वामनराव पाटील,यांनी ब्रिटिश सरकारचे कायदे सावकारांच्या बाजूने असताना कधीच शेतकऱ्याची जमीन ताब्यात न घेता,त्याला उध्वस्त न करता,तडजोडी व सवलती देवून अनेक शेतकऱ्याना भूमिहीन होण्यापासून वाचवले. त्या तडजोड चेअनेक शेतकरी लाभार्थी होते,त्यामुळे आज त्यांच्या पुढील पिढ्या जमिनी कायम ठेवून समृध्द जीवन जगत आहेत.



त्यांचेच पुत्र स्व. नानासाहेब उर्फ विनायकराव पाटील यांनी हाच वारसा कायम ठेवून सामाजिक बांधिलकी जपून श्रीराम मंदिर व श्रीराम नवमी जन्मोत्सव सुरू ठेवत,तेव्हढीच भव्यता या उत्सवाची कायम ठेवली.हा उत्सव आधी ७दिवस चालत असे,गाव पाहुणे मंडळी नी भरून जाई,बहुरूपी कोल्हाटी ,याना इनामे जमिनी देवून त्यांची सेवा श्रीराम चरणी रुजू होत होती.तोच वारसा आज भैय्यासाहेब चालवत आहे.आजही रामनवमी उत्सव तेव्हढेच उत्साहात सुरू आहे,पण काळाचे ओघात मनोरंजनाची साधने वाढली,दळणवळण जलद झाले.त्यामुळे हा उत्सव १दिवस वर आला.त्याचे महत्व पंचक्रोशित तेव्हढेच आहे. हा वारसा भैय्यासाहेब चालवत आहेत,DGP असताना अनेक गरीब लोकांना कायदा विषयक मदत मोफत दिली आहे,सरकारी जमिंनविष्यक अनेक कायदे आले,भूदान, कुळ कायदा,२वेळ सीलिंग कायदा यामुळे शेतीच क्षेत्र कमी झाले,तरी आजही भरपूर जमिनीची मालकी त्यांचेकडे आह. शेती करता गावाशी, गावकऱ्यांशी सतत संपर्क असतो. अमरावतीला कॅम्प परिसर मधला दीड एकर मधला बंगला,प्रभात टॉकीज समोर ची पुजदेकर बिल्डिंग(नुकतीच ती शिकस्त झाली म्हणून पडली आहे) आमचे पुजदेकरांच्या वैभवाची साक्ष देतात.

श्री भैय्यासाहेब यांची श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्षपदी निवड झाली. तिथे पण,अध्यक्ष व कार्यकारिणी सोबत,भाऊसाहेबांच्या विचाराने ही संस्था चालावी हीच धडपड कायम दिसून येते.ॲड भैय्यासाहेब हे अमरावती शहरातील सांस्कृतिक सामाजिक चळवळ मधी अग्रभगी असलेल्या निळकंठ व्यायाम मंडळाचे,सक्रिय पदाधिकारी, कार्यकर्ते या माध्यमातून शहरातील अनेक उपक्रमामध्ये त्यांचा सातत्यपूर्ण सहभाग असतो. अशा या जन्मजात समृध्द व मनाने समृध्द असलेले सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्व असलेले आदरणीय ॲड. भैय्यासाहेबांना ईश्वर दीर्घआयु प्रदान करो,ही ईश्वर चरणी प्रार्थना.

**डॉ.नरेंद्र जानराव देशमुख**
पुजदा,जि. अमरावती
मो.९७३०६४३५०१

# 'न्यू नितीन बार' मालक नितीन शहाकार यांना अंतरिम जामीन

## बनावट विदेशी मद्यसाठा प्रकरणी जिल्हा न्यायालयाचा दिलासा

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील गीतानगर येथील न्यू नितीन बारमध्ये कथित बनावट विदेशी मद्यसाठा जप्त झाल्याच्या प्रकरणात महत्त्वपूर्ण न्यायालयीन घडामोड घडली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाईनंतर अटकेची शक्यता निर्माण झाल्याने बारचे मालक नितीन रामराव शाहकार यांनी अकोला जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी धाव घेतली. जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रमांक २ तेजवंत सांधू यांच्या न्यायालयाने अर्जावरील प्राथमिक सुनावणीनंतर शाहकार यांना अंतरिम अटकपूर्व जामीन मंजूर करून तात्पुरता दिलासा दिला आहे.

प्रकरणातील माहितीनुसार, २१ जून २०१८ रोजी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने गीतानगर येथील न्यू नितीन बारवर छापा टाकला होता. या कारवाईत कथित बनावट विदेशी मद्यसाठा आणि इतर साहित्य जप्त करण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता. त्यानंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने नितीन रामराव शाहकार, सचिन मुळे आणि नितीन वानखडे यांच्याविरुद्ध मुंबई विदेशी मद्य अधिनियम तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायद्यातील विविध तरतुदींनुसार गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

### ८ ऑगस्टला चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश



**न्यायालयाच्या महत्त्वाच्या अटी**

- न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर करताना काही स्पष्ट अटी घातल्या आहेत.
- अर्जदाराने ८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तपास अधिकाऱ्यांसमोर चौकशीसाठी हजर राहावे.
- तपासात संपूर्ण सहकार्य करावे.
- चौकशीदरम्यान अटक झाल्यास ?५० हजारांच्या वैयक्तिक जामिनावर मुक्त करण्यात यावे.
- सरकार पक्षाने पुढील सुनावणीत आपले म्हणणे सादर करावे.

दरम्यान, अटकेची शक्यता लक्षात घेऊन नितीन शाहकार यांनी अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला.

**२१ ऑगस्टच्या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष**

सध्या न्यायालयाने दिलेला दिलासा हा अंतरिम स्वरूपाचा असून, अटकपूर्व जामीन अर्जावरील अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. सरकार पक्षाची बाजू आणि तपासातील प्रगती लक्षात घेऊन पुढील सुनावणी २१ ऑगस्ट २०२६ रोजी होणार आहे. त्यामुळे या प्रकरणात न्यायालय कोणती भूमिका घेते, याकडे कायदेवर्तुळासह सर्वांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणात अर्जदार नितीन रामराव शाहकार यांच्या वतीने अधिवक्ता गणेश परियाल यांनी न्यायालयात काम पाहिले.

न्यायालयाने अर्जासोबत सादर करण्यात आलेली कागदपत्रे, प्रकरणातील उपलब्ध नोंदी आणि प्राथमिक वस्तुस्थितीचा विचार करून अंतरिम संरक्षण देण्याचा निर्णय घेतला.

# दिग्रस बु. ग्रामपंचायतीच्या चौकशीसाठी त्रिसदस्यीय समिती

▶▶ गटविकास अधिकाऱ्यांचे आदेश

▶▶ सात दिवसांत अहवाल सादर करण्याच्या सूचना

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समितीअंतर्गत दिग्रस बुद्रुक ग्रामपंचायतीतील विविध विकासकामे व पंधरावा वित्त आयोगाच्या सामान्य निधीसह इतर निधीच्या कथित गैरवापराच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी अखेर त्रिसदस्यीय समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. पातूरचे गटविकास अधिकारी यांनी ४ ऑगस्ट रोजी यासंदर्भातील आदेश काढत समितीला सात दिवसांच्या आत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

दिग्रस बुद्रुक ग्रामपंचायतीत निधीचा अपहार झाल्याचा आरोप करत तक्रारदार विजयकुमार बळीराम ताले यांनी संबंधित विभागाकडे वारंवार तक्रारी केल्या होत्या. मात्र, चौकशीला विलंब होत असल्याचा आरोप करत त्यांनी २७ जुलै रोजी पातूर पंचायत समिती कार्यालयासमोर अनोखे 'भीक मांगो' आंदोलन छेडले. आंदोलनादरम्यान जमा झालेली २१३ रुपयांची रक्कम ग्रामपंचायत सचिवांना मनीऑर्डरद्वारे पाठविण्यासाठी त्यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केली होती.

या आंदोलनासह संपूर्ण प्रकरणाचे वृत्त दैनिक जनमाध्यमने २८ जुलैच्या अंकात प्रसिद्ध केले होते. या वृत्ताची दखल घेत पंचायत समिती प्रशासनाने चौकशीची प्रक्रिया सुरू करत तीन अधिकाऱ्यांची समिती गठित केली आहे. समितीने ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारांची तपासणी करून वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.




▶▶ **ग्रामस्थांच्या नजरा चौकशीकडे**

दिग्रस बुद्रुक ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी होऊन दोषींवर कारवाई होणार का, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. गटविकास अधिकाऱ्यांनी चौकशी अहवालासाठी सात दिवसांची मुदत निश्चित केल्याने समिती वेळेत अहवाल सादर करते का आणि पुढे प्रशासन कोणती भूमिका घेते, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

# तहसीलदारांच्या आश्वासनानंतर पांगरा शिवदांड आंदोलनाला स्थगिती

### १० ते १२ दिवसांत पाहणी करून कारवाईचे आश्वासन; शेतकऱ्यांचा इशारा कायम



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील चान्नी परिसरातील पांगरा शिवदांडवरील अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी गुरुवारी (दि. ६) संतप्त शेतकऱ्यांनी पातूर तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले. मात्र, तहसीलदार राहुल वानखेडे यांनी दहा ते बारा दिवसांत प्रत्यक्ष शेतरस्त्याची पाहणी करून आवश्यक ती पुढील कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर शेतकऱ्यांनी आंदोलनाला तूर्तास स्थगिती दिली. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, पांगरा शिवदांडावर गेल्या २० ते २५ वर्षांपासून अतिक्रमण असल्यामुळे शेतात जाण्याचा पारंपरिक रस्ता बंद झाला असून शेतीची कामे करताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याबाबत अनेकदा महसूल प्रशासनाकडे तक्रारी करूनही ठोस कारवाई झाली नसल्याने अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. आंदोलनादरम्यान तहसीलदार राहुल वानखेडे यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून लवकरच संबंधित जागेची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येईल तसेच नियमानुसार पुढील कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले. त्यानंतर शेतकऱ्यांनी आंदोलन तात्पुरते मागे घेतले. मात्र, दिलेल्या मुदतीत कारवाई न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी देविदास काकड, कैलास पाटील, प्रमोद बंड, रामा इंगळे, ज्ञानेश्वर येनकर, रवी सोनोने, विठ्ठल घोरे यांच्यासह परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

# शरद ढगे यांची भाजप अकोला महानगर उपाध्यक्षपदी नियुक्ती



**अकोला :** भारतीय जनता पक्षाच्या अकोला महानगर संघटनात्मक बैठकीत शरद ढगे यांची अकोला महानगर उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. आमदार रणधीर सावरकर यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

लोकसभा, विधानसभा तसेच नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुकांमध्ये पक्षासाठी केलेल्या सक्रिय कार्याची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविल्याचे यावेळी सांगण्यात आले. आगामी काळात संघटन अधिक बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांशी समन्वय साधून पक्षविस्तारासाठी काम करण्याची अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

नियुक्तीप्रसंगी आ. रणधीर सावरकर यांच्यासह सौ. सुहासिनीताई धोत्रे, जयंत मसने, विजय अग्रवाल, किशोर मांगटे पाटील, संतोष शिवरकर, महापौर शारदा खेडकर, माधव मानकर, संजय गोटफोडे, प्रशांत अवचार, ॲड. देवाशीष काकड तसेच भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सर्पदंशाने अल्पभूधारक शेतकऱ्याचा मृत्यू

■ प्रतिनिधी | अकोट ■



अकोट तालुक्यातील देऊळगाव येथील अल्पभूधारक शेतकरी प्रभुदास सुखदेवराव गिरनाळे यांचा सर्पदंशामुळे दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत असून गिरनाळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रभुदास गिरनाळे हे ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी सुमारे ८ ते ८.३० वाजण्याच्या सुमारास घरातील गुरांना चारा टाकण्यासाठी जात होते. त्यावेळी त्यांना विषारी सर्पाने दंश केला. काही वेळाने ते खाली बसलेल्या अवस्थेत दिसून आल्याने ग्रामस्थांनी धाव घेतली. सर्पदंश झाल्याचे लक्षात येताच त्यांना तातडीने अकोट येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांनी प्राथमिक उपचार केल्यानंतर त्यांची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी अकोला येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात हलविण्याचा सल्ला दिला. त्यानुसार त्यांना अकोल्यात दाखल करण्यात आले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. प्रभुदास गिरनाळे यांच्यावर ५ ऑगस्ट रोजी देऊळगाव येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले आणि आप्तपरिवार असा परिवार आहे. वडिलांच्या अकाली निधनामुळे दोन मुलांच्या डोक्यावरचे छत्र हरपले असून कुटुंबावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे.प्रभुदास गिरनाळे हे अल्पभूधारक शेतकरी असून त्यांच्या मालकीची सुमारे तीन ते चार एकर शेती असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.

# काशीराम साबळे महाराष्ट्र धनगर समाज महासंघाच्या अकोला जिल्हाध्यक्षपदी



**अकोट :** महाराष्ट्र धनगर समाज महासंघाच्या अकोला जिल्हाध्यक्षपदी मुंडगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तथा बहुजन महासंघाचे पदाधिकारी काशीराम साबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समाजकार्यातील त्यांच्या योगदानाची दखल घेत महासंघाने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविली.

एका कार्यक्रमात ज्येष्ठ पदाधिकारी श्रीराम पुंडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन काशीराम साबळे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र धनगर समाज महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी मंत्री अण्णासाहेब डांगे, प्रदेशाध्यक्ष ॲड. राजेंद्र उर्फ चिमण डांगे, प्रदेश उपाध्यक्ष शरद वसतकार यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर समाज संघटन व समाज उन्नतीसाठी सुरू असलेल्या कार्याचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला श्रीराम पुंडे, शरद वसतकार, मनोहर पाचपोर, अनिल सुलताने, संजय गाडगे यांच्यासह अनेक पदाधिकारी व समाजबांधव उपस्थित होते. काशीराम साबळे यांच्या जिल्हाध्यक्षपदी झालेल्या निवडीचे धनगर समाजातून स्वागत करण्यात येत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली समाज संघटन अधिक बळकट होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# अजितदादांसारखे नेतृत्व पुन्हा होणे नाही - कृष्णा अंधारे

**पातूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या ६७ व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या'जनसेवा सप्ताह'चा शिर्ली येथे उत्साहात समारोप झाला.या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २५ मान्यवरांचा तसेच इयत्ता १० वी व १२ वीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष तथा अकोला महानगरपालिकेचे माजी महापौर मदनजी भरगुड होते.प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती मेघाताई देशमुख,श्रीमती रेखाताई बिडकर,पांडुरंग अर्वट,मेहबूब खान,विनोद भुटे,प्रा. विजयरत्न उगवणे, डॉ.अशोकराव मेतकर, किशोरराव झुके, रामकुमार अमानकर, हेमलता अंधारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.यावेळी बोलताना राष्ट्रवादी



**शिर्ला येथे जनसेवा सप्ताह उत्साहात, समारोप विविध क्षेत्रातील २५ मान्यवर व गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान**

काँग्रेसचे अकोला जिल्हा (ग्रामीण) माजी जिल्हाध्यक्ष कृष्णा अंधारे म्हणाले, 'अजितदादांसारखे नेतृत्व पुन्हा होणे नाही. त्यांनी सहा वेळा उपमुख्यमंत्री म्हणून राज्याची सेवा केली असून अकरा वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे.विकासाभिमुख दृष्टीकोन, प्रशासकीय कार्यक्षमता आणि सर्वसामान्य जनतेसाठी दिवसाचे १८ ते १८ तास काम करण्याची त्यांची कार्यशैली प्रत्येक कार्यकर्त्यासाठी प्रेरणादायी आहे.'अध्यक्षीय भाषणात मदनजी भरगुड यांनी जनसेवा सप्ताहानिमित्त राबविण्यात आलेल्या सामाजिक,शैक्षणिक व जनहिताच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले.हा सप्ताह यशस्वी करण्यासाठी कृष्णा अंधारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी घेतलेल्या परिश्रमांचे त्यांनी विशेष अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.राजेश पाटील ताले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गजानन पाटील, प्रतीक ताले, गोपाल वाकरे, गोपाल देवके, पुरुषोत्तम महल्ले, शुभम झुके, ज्ञानेश्वर ताले,अरुण पन्हरे, मुस्ताक बेग, विजय पाटील, सहदेवराव लांडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला नागरिक, विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती लाभली.

# राजस्थानी सेवा संघाची साधारण सभा संपन्न

**अकोला :** राजस्थानी समाजाच्या विविध जातींना एकत्र करून सामाजिक विकास कार्य करणाऱ्या राजस्थानी सेवा संघाची सर्व साधारण सभा स्थानिक खंडेलवाल भवनात बुधवारी पार पडली.संघाचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल यांच्या अध्यक्षतेत संपन्न या आमसभेत यावेळी संघाचे माजी अध्यक्ष श्यामसुंदर खंडेलवाल, सिद्धार्थ शर्मा, निकेश गुप्ता,ब्रिजमोहन चितलांगे, संघाचे सचिव संजय खंडेलवाल, दीपक शर्मा आदी उपस्थित होते.सभेत मागील सभेच्या कार्यवाहीचे आणि उत्पन्न-खर्चाचे आढावा मान्य करण्यात आला. वर्ष २०२६-२८ साठी सर्वसहमतीने राजेश नवलचंद जैन यांची नियुक्ती नवीन अध्यक्ष म्हणून करण्यात आली. परंपरेनुसार या वर्षी अध्यक्षपद ओसवाल समाजाला मिळाले.म्हणून समाजातील सेवाभावी राजेश नवलचंद जैन यांची अध्यक्षपदी निवड झाली; सभेतील मान्यवरांनी जोरदार टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले. या वेळी संघ व राजस्थानी समाजाच्या सेवाकार्याबद्दल सिद्धार्थ शर्मा, निकेश गुप्ता,ब्रिजमोहन चितलांगे यानी आपले विचार मांडले आणि समाजाच्या एकतेवर भर दिला.

# शनिवारी पु साई सेहरा वालेजी यांच्या भव्य सत्संगाचे आयोजन

■ प्रतिनिधी | अकोला ■

सिंधी कॅम्प येथील भाटिया ग्राऊंड येथे इष्टदेव भगवान झूलेलाल साईंचे परम भक्त साई सेहरा वालेजी यांचे शनिवार, दि. ८ ऑगस्ट रोजी अकोल्यात आगमन होत आहे.त्यानिमित्त भव्य शोभायात्रा, सत्संगचे आयोजन करण्यात आले आहे.सायंकाळी ५ वाजता शोभायात्रेला सिंधी कॅम्प येथील एसएसडब्लू संस्थेचे अध्यक्ष अशोक बोधानी यांच्या निवासस्थानापासून प्रारंभ होईल. ही शोभायात्रा बाबा जेठानंद दरबार, प्रताप मनवाणी चौक, नारायण दूध डेअरी, झूलेलाल पानपोई, अनिल कोल्ड्रिंक, आसवानी झेरॉक्स, एसएसडी. धाम, राजा एसटीडी पीसीओ, गुरु जनकराज मंदिर, पाटील दूध डेअरी, कोटवानी कलेक्शन आणि झूलेलाल वाटिका मार्गे आदर्श कॉलनीतील निरंकारी भवनासमोरील भाटिया ग्राऊंड येथे पोहोचेल.यानंतर सायंकाळी ७ वाजता पू साई सेहरावालेजी यांच्या मधुर वाणीतील सत्संग होणार आहे.तसेच साई सेहरा वालेजी प्रत्येक भाविकाशी आशीर्वादरूपाने वैयक्तिक संवाद साधणार आहेत.सत्संगानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे.

**Change In Name**

I have change my name, My old name is **Rizwana Parveen Afzal Khan** & **New name is Rizwana Khatoon Afzal Khan**
Hence for this all correspondence will be done as per her new name, Please consider the same.
Address Nav Gazi Plot Akot 444101

## पाहिजेत

**श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित,**
श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय निंबा,
ता. बाळापूर, जि. अकोला
तासिक तत्ववार (अनुदानित) सत्र २०२६-२७ एच. एस. सी. व्होकेशनल कोर्सकरिता

**उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमासाठी**

| अ. क्र. | विषय | शैक्षणिक पात्रता | पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | मराठी | एम. ए. मराठी (द्वितीय) बी. एड. | ०१ |
| २ | इंग्रजी | एम. ए. इंग्रजी (द्वितीय) बी.एड. | ०१ |
| ३ | जनरल फाऊं. कोर्स | एम.बी.ए./एम.सी.ए/बी.ई. कॉम्प्युटर एम. एस्सी. कॉम्प्युटर/ एम. कॉम. बीएड | ०१ |

इच्छूक उमेदवारांनी दि. १०/०८/२०२६ रोजी सोमवार श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय, निंबा येथे ठिक सकाळी ९.०० वाजता प्रत्यक्ष मुलाखतीसाठी मुळ कागदपत्रासह स्वखर्चाने उपस्थित रहावे.

**टिप :-** उमेदवार वरील दोन विषयात पदव्युत्तर पदवी अर्हता धारक असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

| मा. श्री. हर्षवर्धनजी देशमुख | मा. श्री. हर्षवर्धनजी देशमुख | मा. पी. एम. पावडे |
|---|---|---|
| अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती | अध्यक्ष, शाळा समिती श्री शिवाजी क.म.वि. निंबा | प्राचार्य, श्री शिवाजी क.म.वि. निंबा |

**Change In Name**

I Have Changed My Name From
**TUSHAR MAHADEV THOSARE**
-TO-
**TUSHAR MAHADEO THOSARE**
My Residential Address in:- Bhagirathi Nagar Near Narhari Maharaj Mandir Gudadhi Akola 444005

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२०६/२०२६ — प्रोसेस नं.९६७९/२०२६
चौ.ता. ०८/०९/२०२६ — दिनांक : २९/०७/२०२६

**अर्जदार :** १. संजय सुखदेवराव चौधरी रा. आनंद नगर, खदान, अकोला. ता. जि. अकोला. २. यमुना नारायण शहापुरे रा. खंडेलवाल भवन जवळ, आळशी प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. सुखदेवराव उमाजी चौधरी २. शांताबाई सुखदेवराव चौधरी
**पत्ता :-** रा. आनंद नगर, खदान, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुखदेवराव उमाजी चौधरी यांचे दि. २४/०१/२०२६ रोजी व मयत शांताबाई सुखदेवराव चौधरी यांचे दि. २५/०८/२०२१ रोजी अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही.सबब वारस प्रमाणपत्रं मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०८/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२८०/२०२६ — प्रोसेस नं.१००३५/२०२६
चौ.ता. २२/०९/२०२६ — दिनांक : ०४/०८/२०२६

**अर्जदार :** १. अन्नपूर्णा शालिग्राम आमले रा. माळीपुरा, वार्ड नं. ४, पारस, ता. बाळापूर, जि. अकोला. २. समर्थ किशोर आमले रा. पंचमाळी, माळीपुरा, अकोला. ता. जि. अकोला. सध्या रा. माळीपुरा, वार्ड नं. ४, पारस, ता. बाळापूर, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : किशोर शालिग्राम आमले
**पत्ता :-** रा. बाभुळगाव, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत किशोर शालिग्राम आमले यांचे दि. ०४/०३/२०२६ रोजी वेदांत क्रिटीकेअर मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, शिरूर, पुणे येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०४/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २३८**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# नाट्यगृहासाठी पालकमंत्र्याची सांस्कृतिक मंत्र्यांकडे निधीची मागणी

## वर्धा येथील सांस्कृतिक वैभवाला नाट्यगृहाची जोड मिळणार; ४३ कोटी ६६ लाखांचा होणार खर्च

**वर्धा/जनमाध्यम**

महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांची कर्मभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वर्धा जिल्ह्याला समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभला आहे.

मात्र, शहरात अद्याप सुसज्ज बंदिस्त नाट्यगृह नसल्याने कलाकार, साहित्यिक आणि कलारसिकांची अनेक वर्षांपासूनची मागणी प्रलंबित होती.

या मागणीची गांभीर्याने दखल घेत तत्कालीन आमदार तथा विद्यमान पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी नाट्यगृह उभारणीचा विषय सातत्याने शासन दरबारी लावून धरला आहे.यासंदर्भात त्यांनी राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांची भेट घेऊन निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली

यासंदर्भात पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. शहरातील बस स्टॅन्ड लगतच्या महात्मा गांधी विद्यालयाच्या परिसरात बंदिस्त नाट्यगृह उभारण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे.सदर प्रस्तावाला सांस्कृतिक कार्य विभागाने १६ फेब्रुवारी २०१८ व ३० जानेवारी २०१९ च्या शासन निर्णयाव्दारे मान्यता दिली होती.



मात्र नाटयगृहासाठी निधी उपलब्ध न झाल्यामुळे नाटयगृहाचे काम प्रारंभ होऊ शकले नाही.२२ ऑगस्ट २०२५ रोजी आशिष शेलार वर्धा येथे आले असता त्यांनी नाटयगृहासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. त्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभागाने जागेच्या उपलब्धतेनुसार अंदाजपत्रक तयार करून मुख्य अभियंता यांच्या तांत्रिक सहमतीसह जिल्हाधिकारी यांनी सदर प्रस्ताव प्रशासकीय मान्यता करिता १ जून २०२६ रोजी शासनाकडे सादर केला आहे. तथापि, बंदिस्त नाटयगृहाच्या कामास प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याी मागणी आशिष शेलार यांच्याकडे केली. सदर मागणीच्या अनुषंगाने शेलार यांनी सांस्कृतिक विभागाच्या प्रधान सचिवांना तातडीने मंजूरी देण्याचे निर्देश दिले.

**नाटयगृहासाठी ४२ कोटी ६६ लाखांचा प्रस्ताव**

महात्मा गांधी विद्यालयाच्या परिसरात नाटयगृहाची निर्मिती करण्यात येणार आहे. यासाठी ४२ कोटी ६६ लाख ४० हजार रूपये खर्च होणार आहे. ४३७५.९२० स्के. मीटर मध्ये १२०० आसन असलेल्या नाटयगृहाची निर्मीती होणार असून सुसज्ज असे नाटयगृह राहणार आहे. लोअर ग्राऊंड फ्लोअर ४२८.९७० स्के.मी., ग्राऊंड फ्लोअर २८१२.२८० स्के. मी. व फर्स्ट फ्लोअर ११३४.६७० स्के. मीटरचा राहणार आहे. सुरक्षेच्यादृष्टिने सर्व उपाययोजना करण्यात येणार आहे.

### कलाकारांना दर्जेदार व्यासपीठ मिळणार

नाट्यगृहाची मागणी स्थानिक कलावंतानी केली होती. त्यांच्या मागणीची दखल घेत शासनाकडे प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे नाट्यगृहाला मान्यता मिळाली होती. मात्र जागेचा प्रश्न निर्माण झाल्याने काही अडचण आली होती. ती अडचण दूर करण्यात येऊन नव्याने प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. नाट्यगृहामुळे स्थानिक कलाकारांना दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध होईल, विविध सांस्कृतिक कार्यक्रमांना चालना मिळेल आणि जिल्ह्याच्या सांस्कृतिक ओळखीला नवी उंची प्राप्त होईल.

**डॉ. पंकज भोयर** पालकमंत्री वर्धा

# नाट्यदिग्दर्शक राजू बावणे यांना अण्णाभाऊ साठे साहित्यरत्न पुरस्कार

**वर्धा/जनमाध्यम**

बहुजन रयत परिषद, जिल्हा वर्धा यांच्या वतीने आयोजित साहित्यसम्राट लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंती महोत्सवानिमित्त सुप्रसिद्ध नाट्यदिग्दर्शक राजू बावणे यांना 'साहित्यसम्राट लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे साहित्यरत्न पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.



नगरपरिषद चौक येथे उत्साहात झालेल्या कार्यक्रमाचे उद्घाटन वर्धा नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी बहुजन रयत परिषदचे विदर्भ तथा जिल्हाध्यक्ष अजय डोंगरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अशोक चोपडे, विजय देशमुख, राजेंद्र निखाडे, इम्रान राही, नीरज त्रिपाठी, प्रवीण धोपटे, अजिज शेख, भीमराव डोंगरे तसेच हिरा खडसे उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलनाने झाली. कलाक्षेत्रातील उल्लेखनीय योगदान, सामाजिक भान जपणारी नाट्यदिग्दर्शनाची वाटचाल आणि अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा सातत्यपूर्ण अभ्यास याची दखल घेत राजू बावणे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत टिळले यांनी केले, तर आभार प्रदर्शन चित्रकार संजय टिळले यांनी केले. कार्यक्रमास अण्णाभाऊ साठे समाज बांधवांसह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वर्धा नगरपालिकेच्या अधिकृत वकीलपदी ॲड. गुरुराज राऊत

**वर्धा/जनमाध्यम**

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात कार्यरत असलेले ॲड. गुरुराज राऊत यांची वर्धा नगरपालिकेच्या अधिकृत वकीलपदी नियुक्ती करण्यात आली आहे. न्यायालयीन कामकाजातील त्यांचा अनुभव आणि विविध प्रकारच्या प्रकरणांवरील सखोल अभ्यासामुळे नगरपालिकेच्या कायदेशीर कामकाजाला अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

ॲड. राऊत हे गेल्या आठ वर्षांपासून मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई व नागपूर खंडपीठासह विविध दिवाणी आणि फौजदारी न्यायालयांमध्ये वकिली व्यवसाय करत आहेत. त्यांनी महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी (एमएनएलयू), मुंबई येथून पदव्युत्तर विधी शिक्षण (एलएल.एम.) पूर्ण केले असून, न्यायालयीन युक्तिवाद आणि विविध स्वरूपाच्या प्रकरणांतील अनुभवामुळे त्यांनी विधी क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.



दिवाणी, फौजदारी, घटनात्मक तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित प्रकरणांमध्ये त्यांना विशेष अनुभव आहे. त्यामुळे वर्धा नगरपालिकेच्या न्यायालयीन प्रकरणांचा प्रभावी पाठपुरावा करण्यास त्यांच्या अनुभवाचा उपयोग होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

वकिली व्यवसायाबरोबरच ॲड. राऊत यांनी सामाजिक बांधिलकीही जपली आहे. कायद्याविषयी जनजागृती, सामाजिक प्रश्नांवर कायदेशीर मार्गदर्शन आणि विविध लोकहिताच्या उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. त्यामुळे युवा विधिज्ञ म्हणूनही त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.


परिशिष्ट-१

## ई-निविदा सुचना

### नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२

**जाहीरात क्रमांक व दिनांक: २.**

**कार्यालयाचा पत्ता-उपविभागीय कृषि अधिकारी, हिंगणघाट**

**C/o** श्री. प्रकाश मोटवाणी यांचे घरी, संत कवंरराम भवन रोड, सिंधी कॉलनी, हिंगणघाट जि. वर्धा

**ई-निविदा सूचना क्र. २ सन २०२६-२७**

उपविभागीय कृषि अधिकारी, हिंगणघाट जि. वर्धा कार्यालयामार्फत महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाकडून **नोंदणीकृत खुला प्रवर्ग कंत्राटदार** यांचेकडून खालील मृद संधारणाच्या क्षेत्र उपचाराच्या कामांकरीता ई-निविदा प्रणालीव्दारे ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. निविदाबाबतची कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावीत.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार उपविभागीय कृषि अधिकारी, हिंगणघाट यांनी राखून ठेवलेला आहे. ठेकेदाराने अटी व शर्ती असलेली निविदा सादर केल्यास ती स्वीकारली जाणार नाही.

| अ. क्र. | गावाचे व तालुक्याचे नाव | कामाचे नाव व गट क्र. | निविदेची अंदाजीत रक्कम (लाख) | कामे पूर्ण करण्याचा कालावधी (दिवस) | निविदा फी (रू.) | इसारा रक्कम (रू.) | कोरे निविदा संच विक्रीसाठी उपलब्ध कालावधी | ठेकेदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजा पिपरी ता. हिंगणघाट | ढाळीचे बांध गट क्र. १,२,३,४,५,६ | २३५६९९६ | ३० दिवस | ५९० | २३५७० | ११/०८/२६ ते २५/०८/२६ | ६व त्यावरील |
| २ | मौजा पिपरी ता. हिंगणघाट | ढाळीचे बांध गट क्र ७,८,९,१०,११,१२ | २२०६३९८ | ३० दिवस | ५९० | २२०६४ | ११/०८/२६ ते २५/०८/२६ | ६व त्यावरील |
| | **एकूण** | | **४५६३३९४** | | | | | |

**(टिप :- सदर ई-निविदेतील रक्कम ही GST व इतर लागू करापासून वगळून (exclusive) आहेत.)**

**निविदापूर्व बैठक :-** दिनांक २०/०८/२०२६

**बैठकीचे ठिकाण :-** उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, हिंगणघाट **वेळ:** सकाळी ११.०० वाजता

**ई-निविदा उघडणे :-** दिनांक २७/०८/२०२६

१. नोंदणीकृत कंत्राटदार यांनी निवीदा पूर्व अर्हता संचाच्या रू. ५९०/- व अनामत रक्कम हे Net Banking Transanction व्दारे e-payment gateway च्या माध्यमातून हया online जमा करण्यात यावी. याशिवाय आपले ई-निविदा फॉर्म स्विकार करण्यात येणार नाही.
२. निविदेचा सविस्तर कार्यक्रम WWW.mahatender.gov.in या वेबसाईटवर पहावयास मिळेल.
३. संकेतस्थळावर प्रसिध्द होणा-या निविदा उघडण्याची तारीख व वेळेनुसार नोंदणीकृत कंत्राटदार किंवा त्यांचा अधिकृत प्रतिनीधी यांनी उपस्थित राहावे अन्यथा निविदा उघडण्यास कोणतेही तक्रार स्विकारली जाणार नाही.
४. निविदा लिफाफा क्र. १ (तांत्रीक लिफाफा) व लिफाफां क्र. २ (आर्थिक लिफाफा) मधील सर्व कागदपत्रे नोंदणीकृत कंत्राटदार त्यांच्या देकारासह अपलोड करावीत तसेच सदर कंत्राटदारांनी निविदा व निविदेतील अटी मान्य असल्याबाबत ऑनलाईन प्रमाणित करावे.
५. प्रत्येक निविदा धारकांना निविदा भरण्यापूर्वी कामाचे स्थळ, गौण खनिज क्षेत्र व इतर महत्वाच्या कार्यक्षेत्राची पाहणी करणे बंधनकारक राहील.
६. निविदा (तांत्रीक) उघडतेवेळी संबधीत कंत्राटदाराने छाननीसाठी आवश्यकतेनुसार मुळ कागदपत्रे निविदा समितीस उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

**उपविभागीय कृषि अधिकारी**
**हिंगणघाट जि. वर्धा**

**क्र. जिमाका-वर्धा/९४/२०२६-२७**


# पोलिसांच्या संवेदनशीलतेने वाचला उमलता जीव



## वेळीच धाव घेत सेलू पोलिसांनी वैद्यकीय विद्यार्थ्याला दिले नवजीवन

**सेलू/जनमाध्यम**

संकटाच्या क्षणी दाखविलेली संवेदनशीलता, तत्परता आणि माणुसकी यामुळे एका होतकरू वैद्यकीय विद्यार्थ्याचा जीव वाचविण्यात सेलू पोलिसांना यश आले.तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने विद्यार्थ्याचा मागोवा घेत पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने त्याला सुरक्षित बाहेर काढले. या धाडसी कारवाईमुळे एका कुटुंबावरील मोठे संकट टळले असून, सेलू पोलिसांच्या मानवी दृष्टिकोनाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नागपूर येथील शासकीय आयुर्वेद महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या २२ वर्षीय विद्यार्थ्याबाबत ५ ऑगस्ट रोजी सायंकाळी गंभीर माहिती प्राप्त झाली. माहिती मिळताच सेलू पोलीस ठाण्याचे निरीक्षक पंकज वाघोडे यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने विशेष शोध पथक सक्रिय केले. विद्यार्थ्याच्या मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण करून त्याचा मागोवा घेण्यात आला आणि नागपूर–वर्धा मार्गावरील परिसरात शोधमोहीम सुरू करण्यात आली.

शोधमोहीमेदरम्यान विद्यार्थ्याचा ठावठिकाणा लागताच पोलिसांनी क्षणाचाही विलंब न करता स्थानिक पोहणाऱ्या नागरिकांच्या मदतीने त्याला सुरक्षित बाहेर काढले. त्यानंतर तातडीने ग्रामीण रुग्णालय, सेलू येथे नेऊन वैद्यकीय उपचार आणि समुपदेशनाची व्यवस्था करण्यात आली. प्रकृती स्थिर झाल्यानंतर त्याला नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.

ही कारवाई केवळ एका व्यक्तीचे प्राण वाचविणारी नव्हती, तर संकटात सापडलेल्या नागरिकांच्या मदतीसाठी पोलीस दल किती संवेदनशील आणि सज्ज आहे, याचेही ती उदाहरण ठरली.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक पंकज वाघोडे, एएसआय जावेद धामिया, एएसआय विनोद कोडापे आणि पोलीस हवालदार मंगेश राऊत यांनी ही उल्लेखनीय कामगिरी पार पाडली.पोलिसांच्या या माणुसकीपूर्ण कार्याबद्दल नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# संक्षिप्त

## आगीच्या धक्क्यानंतर शेतकऱ्याची आत्महत्या

**वर्धा -** गोठ्याला लागलेल्या आगीत एका बैलाचा मृत्यू व दुसरा गंभीर जखमी झाल्याच्या धक्क्यातून आर्थिक विवंचनेत सापडलेल्या शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना जऊळगाव शिवारात घडली. बंडू सिताराम राऊत (वय ५८, रा. नेरी-मिरापूर) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. आगीत झालेल्या मोठ्या नुकसानीमुळे ते मानसिक तणावात होते, अशी प्राथमिक माहिती समोर आली आहे. त्यांनी विहिरीत उडी घेतल्याचे निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच सेवाग्राम पोलिसांनी पंचनामा करून आकस्मिक मृत्यूची नोंद केली. पुढील तपास सुरू आहे.

## वृद्धाची गळफास घेऊन आत्महत्या

**वर्धा -** दीर्घकाळापासून प्रकृतीच्या त्रासामुळे त्रस्त असलेल्या एका वृद्धाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सेलू तालुक्यातील घोराड येथे घडली. रामदास मारोतराव निलसकर (वय ६५) असे मृताचे नाव आहे. कुटुंबीयांच्या माहितीनुसार ते काही दिवसांपासून प्रकृतीच्या तक्रारींमुळे अस्वस्थ होते. घरात त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे उघड झाले. घटनेची माहिती मिळताच सेलू पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## मनोरा येथे व्यक्तीची आत्महत्या

**हिंगणघाट -** हिंगणघाट तालुक्यातील मनोरा येथे एका व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. प्रशांत सुरेश सिडाम असे मृताचे नाव असून, त्यांनी राहत्या घरी टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. घटनेची माहिती मिळताच हिंगणघाट पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृत्यूमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू असून मृत्यूचे कारण शोधण्याचे काम सुरू आहे.

## बसप्रवासात ८० ग्रॅम सोन्याचे दागिने लंपास

**तळेगाव (श्या. पंत.) -** वर्धा-वरूड बसमधून प्रवास करणाऱ्या दाम्पत्याच्या पर्समधून अज्ञात चोरट्यांनी ८० ग्रॅम सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना उघडकीस आली. नागपूर येथील सुरेश वानखेडे (वय ६७) हे पत्नीसह साहूर येथे जाण्यासाठी बसने प्रवास करीत होते. प्रवासादरम्यान अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या पत्नीच्या पर्समधून चार तोळ्यांचा सोन्याचा कंठीहार आणि चार तोळ्यांचे मंगळसूत्र असा सुमारे ८० ग्रॅम सोन्याचा ऐवज चोरून नेला. बसमधून उतरल्यानंतर हा प्रकार लक्षात येताच त्यांनी तळेगाव पोलिसांत तक्रार दिली. तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून तपास सुरू आहे.

## उसनवारीच्या पैशावरून युवकाला काठीने मारहाण

**पुलगाव -** उसने दिलेल्या पैशांची मागणी केल्याचा राग मनात धरून युवकाला काठीने मारहाण करण्यात आल्याची घटना विरुळजवळील समृद्धी महामार्गाच्या एक्झिट पुलाखाली घडली. प्रशिल निकोसे (वय २६, रा. नाचणगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या मामाकडून संदीप तोडसाम याने काही रक्कम उसने घेतली होती. त्या पैशांची मागणी करण्यासाठी प्रशिल गेले असता आरोपीने शिवीगाळ करत काठीने मारहाण केली. या हल्ल्यात प्रशिल जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच पुलगाव पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## मद्यपी भावाला हटकल्याने भावालाच मारहाण

**हिंगणघाट -** दारू पिऊन घरात गोंधळ घालणाऱ्या भावाला समजावण्याचा प्रयत्न एका युवकाला चांगलाच महागात पडला. संत ज्ञानेश्वर वॉर्डातील ही घटना असून शुभम हिवज (वय २८) याला मोठा भाऊ सागर याने पावशीने मारहाण करून जखमी केले. सागर हा मद्यधुंद अवस्थेत घरी आला आणि आई-वडिलांना शिवीगाळ करू लागला. यावेळी शुभमने त्याला विरोध करून शांत राहण्यास सांगितले. मात्र संतापलेल्या सागरने पावशीने हल्ला करत शुभमला जखमी केले. जखमीवर उपचार करण्यात आले असून तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## गोवंशासह अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त

**देवळी -** देवळी पोलिसांनी गुरांची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करत तीन गोवंशाची सुटका केली. या कारवाईत गोवंशासह मालवाहू वाहन असा एकूण २ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गुरांची कत्तलीसाठी वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर सोनेगाव (आबाजी) मार्गावरील आदमने फार्म परिसरात नाकाबंदी करण्यात आली. दरम्यान, एमएच ४८ टी ९५१७ क्रमांकाचे वाहन अडवून तपासणी केली असता त्यामध्ये तीन गोवंश आढळून आले. चौकशीत त्यांची कत्तलीसाठी वाहतूक होत असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पोलिसांनी कारवाई करत जनावरे आणि वाहन ताब्यात घेतले. या प्रकरणी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास देवळी पोलीस करीत आहेत.


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - २५१

आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१

फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८

**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

# संयुक्त कामगार-किसान मोर्चाचे जेलभरो आंदोलन १० रोजी

## प्रलंबित मागण्यासाठी आक्रोश




**अमरावती/प्रतिनिधीः-** केंद्र आणि राज्य सरकारच्या कामगार व शेतकरी विरोधी धोरणांविरोधात संयुक्त कामगार कर्मचारी संघटना कृती समिती आणि संयुक्त किसान मोर्चाच्या वतीने सोमवार १० ऑगस्ट रोजी देशव्यापी जेलभरो आंदोलन पुकारण्यात आले आहे. अशी माहिती आज गुरुवार ६ ऑगस्ट रोजी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये आयोजकांनी दिली. त्यांनी सांगितले की, २९ जुलै २०२६ रोजी दिल्लीतील रामलीला मैदानावर झालेल्या संयुक्त कामगार आणि किसान संघटनांच्या राष्ट्रीय संमेलनात हा निर्णय घेण्यात आला. त्याचाच एक भाग म्हणून १० ऑगस्टला देशभरात जेलभरो आंदोलन होणार आहे. या दिवशी सकाळी ११ वाजता इरविन चौकातून मोर्चाला सुरुवात होईल. हा मोर्चा थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकेल. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून आंदोलनाला सुरुवात होणार आहे. ४ कामगार विरोधी श्रम संहिता रद्द करा. सर्वांना ८ तास काम, ३० हजार किमान वेतन आणि सरकारी दर्जा द्या. अंगणवाडी, आशा, शालेय पोषण कर्मचाऱ्यांना पेन्शन, पीएफ, ईएसआय लागू करा. सरकारी आणि खाजगीतील सर्व रिक्त जागा भरा. बेरोजगारांना बेरोजगार भत्ता द्या. शेतमालाला उत्पादन खर्च + ५०% नफा प्रमाणे हमीभाव द्या. शेतकरी विरोधी ३ कृषी कायदे रद्द करा. कर्जमाफी करा.पेट्रोल, डिझेल, गॅस आणि जीवनावश्यक वस्तूंची महागाई कमी करा. जुनी पेन्शन योजना लागू करा.

एनपीए रद्द करा. जीएसटी कमी करा. सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण थांबवा. एन टी ए संस्था च्या परीक्षा रद्द करा. यासह इतर मागण्यांसाठी आंदोलन करण्यात येणार आहे. मोदी सरकारच्या गेल्या १२ वर्षांच्या धोरणांमुळे शिक्षण, आरोग्य, रोजगार या मूलभूत गरजांपासून जनता वंचित राहिली आहे, असा आरोप यावेळी करण्यात आला. यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेमध्ये अशोक सोनारकर, महादेव गारपगार, एस. पवार, सुभाष बानखडे, डॉ. एम. कोरटकर, नीलकंठ डोके, अशोक सोनारकर, प्रा. साहेबराव विघाते, प्रा. विनय रोडे, शाम शिंदे आदी उपस्थित होते.

---

**पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात**

(मान्य दिनांक २०.०७.२०२६)
(प्रसिध्दी दिनांक २४.०७.२०२६)

**शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चांचणी-२०२५**

**संस्थेचे नांव-** (270708SCO17) THE YEODA EDUCATION SOCIETY OF YEODA (Secondary/Higher Secondary) - With Interview
**शक्षणिक स्तर -** Secondary/Higher Secondary
THE YEODA EDUCATION SOCIETY OF YEODA या व्यवस्थापनाच्या शाळेमध्ये खाली नमुद केलेल्या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**आरक्षण निहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ. क्र. | प्रवर्ग | महिला | माजी सैनिक | अंशकालीन | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षण व्यतिरिक्त (उर्वरित पदे) | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अनु.जाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २. | अनु.जमाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३. | अनु.जमाती (PESA) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४. | वि.जा.(अ) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५. | भ.ज.(ब) | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ६. | भ.ज.(क) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७. | भ.ज.(ड) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८. | इ.मा.व. | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ९. | वि.मा.प्र. | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| १०. | ई.डब्ल्यू.एस. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११. | एसईबीसी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १२. | खुला | २ | १ | १ | ० | ० | ० | २ | ६ |

**दिव्यांग (४ टक्के)**

| अस्थिव्यंग (१ टक्का) | कर्णबधिर (१ टक्का) | अंध/अल्पदृष्टी (१ टक्का) | Intellectual Disability and Multiple Disability (1%) ID | MD | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| ० | ० | ० | 0 | 0 | ० |

**अनाथ(१ टक्के)**

| अनाथ संस्थात्मक | अनाथ संस्थाबाह्य | एकुण |
|---|---|---|
| ० | ० | ० |

| अ. क्र. | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३.. | **एकुण** | २ | १ | १ | ० | ० | ० | ५ | ९ |

**पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहीरात**

(प्रसिध्दी दिनांक २४.०७.२०२६)
(मान्य दिनांक २०.०७.२०२६)

**शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चांचणी-२०२५**

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशिल**

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतनश्रेणी/ मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Marathi | Under Graduate Teacher Std.(1-4/5) | Consolidated Pay - UGT (16000) | Aided | All Subjects | Marathi | HSC (Std.12th) | Diploma | TET Paper 1/CTET Paper-1 | 1 |
| 2. | Marathi | Graduate Teacher Std (9-10) | Consolidated Pay-GT 9-10 (18000) | Aided | Mathema-tics | Marathi | Graduation | Gradua-tion | - | 2 |
| 3. | Marathi | Graduate Teacher Std.(9-10) | Consolidated Pay-GT 9-10 (18000) | Aided | Science | Marathi | Graduation | Gradua-tion | - | 2 |
| 4. | Marathi | Graduate Teacher Std.(9-10) | Consolidated Pay-GT 9-10 (18000) | Aided | Physical Education | Marathi | Graduation | Gradua-tion | - | 2 |
| 5. | Marathi | Graduate Teacher Std (9-10) | Consolidated Pay-GT 9-10 (18000) | Aided | Language (English) | - | Graduation | Gradua-tion | - | 2 |
| | | | | | | | | **Total** | - | **9** |

**सर्वसाधारण सुचना -**
१) अभियोग्यता व बुध्दिमत्ता चांचणी २०२५ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे असे उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील. **२)** ईच्छुक व अर्हता प्राप्त करणारे उमेदवार ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदासाठी पसंती क्रमांक नमुद करुन पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करतील. **३)** शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व अध्यापनाचे विषय, वयोमर्यादा, आरक्षण, अन्य पात्रता व आवश्यक कागदपत्रे इत्यादीसाठी सर्वसाधारण सुचना सविस्तर तपशिलासह https://tait2025.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये **उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना** या शिर्षाखाली उपलब्ध आहेत. सदर सुचना व सुचनामध्ये नमुद आवश्यक शासन आवश्यक शासन निर्णय यांचे अवलोकन करुन स्वतःची खात्री करुनच ऑनलाईन अर्ज करावेत.

**अध्यक्ष,**
**येवदा शिक्षण संस्था,**
**ता.दर्यापूर, जि.अमरावती**

**सचिव,**
**येवदा शिक्षण संस्था,**
**ता.दर्यापूर, जि.अमरावती**

---

## अमरावती महानगरपालिका, अमरावती

### कार्यकारी अभियंता-२ विभाग

क्र.अमनपा/का.अ.-२/नि.सु.क्र./१३/२०२६ — दि.०६/०८/२०२६

अमरावती महानगरपालिका कार्यकारी अभियंता-२ विभागामार्फत ई-निविदा कामासाठी ब-१ निविदा करारावरील अमरावती महानगरपालिकेत योग्य श्रेणीत नोंदणी करण्यात आलेल्या कंत्राटदाराकडून ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन मागविण्यात येत आहे.

**ई-निविदा प्रसिध्दीचा तपशिल :-**

| | |
|---|---|
| **ई-निविदा प्रसिध्दी** | दि.०६/०८/२०२६ |
| ई-निविदा दस्ताऐवज डाउनलोड प्रारंभ **(Start )** | दि.०६/०८/२०२६ सायं.६.०० वाजेपासून |
| ई-निविदा दस्ताऐवज डाउनलोड समाप्त **(End )** | दि.१२/०८/२०२६ सायं.६.०० वाजेपासून |
| ई-निविदा दाखल करण्याची सुरुवात दिनांक | दि.०६/०८/२०२६ सायं.६.०० वाजेपासून |
| ई-निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दि.१२/०८/२०२६ सायं.६.०० वाजेपासून |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक **(Technical )** | दि.१४/०८/२०२६ सका.१०.०० वाजता (शक्य झाल्यास) |

(Financial) ई-निविदा उघडण्याची दिनांक व वेळ Mail व SMS द्वारे कळविण्यात येईल.

निविदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर सविस्तर निविदा सुचना पाहवण्यास मिळेल.

Digitally signed by
SUHAS NANDKISHOR CHAVHAN
Date : 06-08-2026 16:30:11

**(सुहास चव्हाण)**
**कार्यकारी अभियंता-२**
**महानगरपालिका, अमरावती**

---

## जिल्ह्यात १२ सप्टेंबर रोजी 'राष्ट्रीय लोकअदालत'

### प्रलंबित खटले तडजोडीने मिटवण्याचे आवाहन




**अमरावती :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार, शनिवार १२ सप्टेंबर २०२६ रोजी अमरावती जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये 'राष्ट्रीय लोकअदालती' चे आयोजन करण्यात आले आहे.

न्यायालयात दाखल असलेली आणि दाखलपूर्व (प्री-लिटीगेशन) प्रकरणे या लोकअदालतीमध्ये तडजोडीने व सामंजस्याने निकाली काढण्यात येणार आहेत.

या लोकअदालतीचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे पक्षकारांना यासाठी कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क भरावे लागणार नाही. तसेच, यामध्ये ठेवण्यात आलेल्या प्रकरणांचा अंतिम निकाल त्याच दिवशी लावण्यात येणार आहे. यामुळे पक्षकारांचा वेळ आणि पैसा दोन्हींची बचत होणार आहे.

नागरिकांनी आपले तडजोडपात्र प्रलंबित खटले 'राष्ट्रीय लोकअदालती'मध्ये ठेवून सामंजस्याने मिटवण्यासाठी संबंधित न्यायालयात त्वरित अर्ज करण्याचे आवाहन, अमरावती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश उज्वला एम. नंदेश्वर आणि सचिव संजय ता. सहारे यांनी केले आहे. तसेच, दाखलपूर्व प्रकरणांबाबत नागरिकांनी आपल्या नजीकच्या संबंधित जिल्हा किंवा तालुका न्यायालयाशी संपर्क साधावा आणि १२ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित होणाऱ्या 'राष्ट्रीय लोकअदालती'चा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असेही प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

---

## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्क:**
**९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९**

---

**मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२०८/२०२६** — **ने.ता.१८.०८.२०२६**

**१. सुनिता सुनिल कुटेमाटे, रा. ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती**

**// वि //**
**निरंक**

**ज्याअर्थी, मयत प्रशांत सुनिल कुटेमाटे यांचा मृत्यू दि.२१.०२.२०२६ मध्ये नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला. मयताचे अर्जदार ही आई आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक ०४ ऑगस्ट, २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय,**
**नांदगाव खंडेश्वर**

---

**मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२०८/२०२६** — **ने.ता.१८.०८.२०२६**

**१. हरीदास विश्वनाथ कराळे, रा. सातरगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती**
**२. मोनाजी सतिश ठाकरे, रा.कवठा कडु, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती**
**३. शैलेश हरिदास कराळे रा.सातरगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती**

**// वि //**
**निरंक**

**ज्याअर्थी, मयत वनिता हरिदास कराळे यांचा मृत्यू दि.१६.०६.२००३ मध्ये जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती, जि.अमरावती** येथे झाला. **मयताचे अर्जदार क्र.१ हे पती असून अर्जदार क्र.२ ही मुलगी व अर्जदार क्र.३ हा मुलगा आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक ०५ ऑगस्ट, २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय,नांदगाव खंडेश्वर**

---

## सार्वजनिक सूचना
## (PUBLIC NOTICE)

सर्व संबंधित नागरिक, खरेदीदार, विकासक, बिल्डर, वित्तीय संस्था, बँका तसेच सर्वसामान्य जनतेस याव्दारे जाहीर सूचना देण्यात येते की, माझ्या अशील **सौ.अरुणा पती स्व.प्रमोद ठाकरे,** वय ६५ वर्षे, व्यवसाय- गृहिणी, रा.नारायण नगर, पो.तिवसा, ता. तिवसा, जि.अमरावती यांच्या वतीने ही सार्वजनिक सूचना प्रसिध्द करण्यात येत आहे. माझ्या अशील यांचा असा दावा आहे की, त्यांची सून **सौ.सुवर्णा पती स्व.विवेक ठाकरे,** रा.''परिश्रम'', इस्कॉन मंदिर रोड, राठी नगर, अमरावती हिने विश्वासाचा गैरफायदा घेऊन, खोटी कारणे सांगून व फसवणुक करुन माझ्या अशील यांच्या सहया विविध नोंदणीकृत **हक्क सोडलेख व बक्षीसपत्रांवर** घेतल्या असून, त्या आधारे माझ्या अशील यांच्या मालमत्तेवरील हक्क स्वतःच्या नावावर करुन घेतल्याचा आरोप आहे.

या संदर्भात माझ्या अशील यांनी संबंधित पोलीस स्टेशन, तिवसा येथे आरोपीविरुध्द फौजदारी कारवाईसाठी लेखी तक्रार दाखल केली असून, संबंधित प्रकरणात सक्षम दिवाणी न्यायालयात वरील हक्क सोडलेख, बक्षीसपत्रे, व त्या अनुषंगिक नोंदी रदद करणे, घोषणा, ताबा, कायमस्वरुपी मनाई आदेश व इतर योग्य दिलासे मिळण्यासाठी दिवाणी दावा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे.

सदर वादग्रस्त मालमत्तांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-
१. मौजे डेहणी, ता.तिवसा, जि.अमरावती, गट नं. ७२/२
२. मौजे डेहणी, ता.तिवसा, जि.अमरावती, गट नं. ७२/१/ड.
३. मौजे तिवसा, जुना सर्व्हे नं.५१९/१, नवीन सर्व्हे नं. २८६/१, प्लॉट नं.११
४. नगरपंचायत तिवसा, वार्ड क्र.३, मालमत्ता क्र.३८०.
५.मौजे तिवसा, जुना सर्व्हे नं.५०९/२, नवीन सर्व्हे नं. ४२४/२/४२४/२-अ, प्लॉट नं.३१

**त्यामुळे सर्व संबधितांना याव्दारे स्पष्ट सूचना देण्यात येते की, वरील कोणत्याही मालमत्तेबाबत सौ.सुवर्णा पती स्व.विवेक ठाकरे किंवा त्यांच्यामार्फत कोणत्याही व्यक्तीने खरेदी-विक्री, बक्षीसपत्र, गहाण, विकास करार, भाडेपट्टा, तारण, हस्तांतरण अथवा कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये.**

जर कोणत्याही व्यक्तीने सदर सार्वजनिक सूचनेकडे दुर्लक्ष करुन वरील मालमत्तांबाबत कोणताही व्यवहार केला, तर तो व्यवहार पूर्णपणे संबंधित व्यक्तीच्या स्वतःच्या जोखीम, खर्च व परिणामांवर राहील. अशा कोणत्याही व्यवहारास माझ्या अशील यांची संमती नसून, तो व्यवहार माझ्या अशील यांच्यावर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही. तसेच भविष्यात उदभवणा-या कोणत्याही कायदेशिर व आर्थिक परिणामांसाठी संबंधित व्यवहार करणारी व्यक्ती स्वतः जबाबदार राहील आणि त्याबाबत माझ्या अशील यांच्यावर कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

ही सार्वजनिक सूचना सर्व संबंधितांच्या माहितीसाठी व हितसंरक्षणाच्या उददेशाने प्रसिध्द करण्यात येत आहे.

**दि.०६.०८.२०२६.**

**Adv. Raja S.Z. Ali**
**"SABA"** Khare Layout,
Camp, Amravati.
**M - 9890902806**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

किरकोळ अर्ज क्र.१५२८/२०२६
**श्रीकांत व इतर विरुध्द निरंक**
पुढील ता.११.०९.२०२६

**अर्जदार :**
1. **Shrikant Vasantrao Chaudhari**
Age 37 Yrs. Occu.: Labour
R/o. Near Amba Gate Patvipura, Amravati
2. **Shriram Vasantrao Chaudhari**
Age 36 Yrs. Occu.: Labour
R/o. Maltakhidki Road, Inside Amba Gate, Patvipura, Amravati, Tq. & Dist. Amravati

**विरुध्द**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **वसंत दत्तुसा चौधरी आणि कमल वसंत चौधरी हे अनुक्रमे** दिनांक **०६.०४.२०२५** आणि **०६.०२.२०२६** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **श्रीकांत व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीकांत व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२३.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**तहसिलदार, तिवसा (राजस्व )यांचे कार्यालय**

**रा.मा.क्र. / एम.आर.सी.-८१/ /नगर पंचायत तिवसा /२०२५-२६**

**क्र./प्रस्तु-१/स.म.अ./जन्म-मृत्यू नोंद/अह./कावि-७९६ /२०२६** — **दिनांक ३१/०७/२०२४**

## जाहीरनामा

या व्दारे सर्वत्र नागरिकांना सुचित करण्यात येते की,**अर्जदार श्री.वासुदेव महादेवराव होले, रा.वार्ड नं.०७, भवानी चौक, तिवसा, ता.तिवसा, जि.अमरावती** यांनी महाराष्ट्र जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) व जन्म-मृत्यू नोंदणी सुधारणा कायदा, २०२३ भारत राजपत्र दिनांक ११/०८/२०२३ व मा.जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश क्रमांक - अका/एमएजी/डे-२७/जन्म व मृत्यू नोंदणी (सुधा.) अधि./आदेश/कावि-८१९/२०२३, दिनांक २३/१०/२०२३ व सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे निर्णय क्रमांक - जमृनो-२५२५(ई.ऑ.९९११८१)प्र.क्र. २२/ कु.क.दिनांक १२ मार्च २०२५ नुसार अर्जदार **श्री.वासुदेव महादेवराव होले** यांनी त्यांची मुलगी **कु.संध्या वासुदेवराव होले** यांचा दिनांक १७/०६/१९७४ रोजी मौजा तिवसा येथे जन्म झाला असल्यामुळे त्यांचे जन्माची नोंद नगर पंचायत, तिवसा येथे होण्याकरिता ओदश मिळावा म्हणुन अर्ज दाखल केलेला आहे.

तेव्हा ज्या कोणाला सदर प्रकरणी आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी सदहू जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसाचे** आंत आपला आक्षेप अर्ज लेखी स्वरुपात आवश्यक पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा, मुदतीनंतर प्राप्त झालेला आक्षेप अर्ज स्विकारण्यात येणार नाही तथा त्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

शिक्का

**सही/-**
**(मयुर कळसे)**
**तहसिलदार, तिवसा**

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 97/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **ताजुद्दीन बाबा दरबार ट्रस्ट मोरचुंद, ता.वरुड, जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री.दुर्गेश गंगाधरराव भोयर**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२७.०७.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**(श्रीमती डी.बी.गायकवाड)**
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 66/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **बेथसाडा मिनीस्ट्रीज ॲण्ड चॅरिटेबल ट्रस्ट, बोरगांव धांडे, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री.गजानन क्रिष्णाजी डोंगरे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२०.०५.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर,५ थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१५३५/२०२६
**रविंद्र अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.२९.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Ravindra Mahadevrao Choudhari, Age 51 Yrs. Occu.: Farmer
2. Shobha Ramdas Kavale, Age 60 Yrs. Occu.: Household
All R/o Dhangar Pura, Nandgaon Peth, Po.Nandgaon peth, Dist.Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** NIl

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Raju Mahadev Choudhari हे दिनांक **१०.०४.२०२४** रोजी **नांदगांव पेठ, जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Ravindra Mahadevrao Choudhari+1 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Ravindra Mahadevrao Choudhari+1 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०१.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर,५ थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१५३२/२०२६
**मंदा अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.२९.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Manda Suresh Choudhari, Age 73 Yrs. Occu.: Household
2. Sudhir Sureshrao Chaudhari, Age 43 Yrs. Occu.: Labour
All R/o Dhangar Pura, Nandgaon Peth, Po.Nandgaon peth, Dist.Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** NIl

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Suresh Pundlikrao Chaudhary हे दिनांक **२९.११.१९९९** रोजी **नांदगांव पेठ, जि.अमरावती** येथे मयत झाले. तसेच Ashok Sureshrao Chaudhari हे दिनांक **११.१०.२०२५** रोजी **नांदगांव पेठ, जि.अमरावती** येथे मयत झाले.अर्जदार Manda Suresh Chaudhary+1 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Manda Suresh Chaudhary+1 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०१.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३३०**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त



### खल्लार हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**खल्लार**-राज्य परीक्षा परिषद पुणे आयोजित पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा वर्ग ७ वी २०२६ मध्ये श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित असलेल्या खल्लार हायस्कूल येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून तालुक्यात अव्वल स्थान पटकावले आहे. या परीक्षेत विद्यालयाचे २ विद्यार्थी पात्र ठरले आहेत.विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा अधिक दृढ झाली आहे. शिष्यवृत्ती पात्र,सुशांत नंदकिशोर हरसुले,यश संतोष भारती हे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहे. या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे विद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.या यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख,प्राचार्य केशवरावजी गावंडे कार्यकारणी सदस्य,विनायकरावजी गावंडे,मधुसूदनजी धाबे, पंजाबराव टवलारे,वनिता राऊत, शिष्यवृत्ती प्रभारी ए डब्ल्यू बागडे,सुरेश कुऱ्हाडे शाखा व्यवस्थापक अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँक खल्लार यू डी राणे, पी डब्ल्यू घुरडे, ऋतुजा बोंडे, अमोल मोपारी, सय्यद अब्दुल , शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक पालक संघ,माता पालक संघ, सर्व पालक वर्ग, सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.



### अभियंतापदी संजय श्रृंगारे रुजू

**लेहेगाव**-महावितरण कार्यालय शहर विभाग अमरावतीच्या कार्यकारी अभियंता पदी संजय श्रृंगारे नुकतेच रुजू झाले.त्यांचे महाराष्ट्राचे वीज कर्मचारी अधिकारी अभियंता सेनेतर्फे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी रामकृष्ण चिखलकर, संजय खेडकर व अजय बावणे उपस्थित होते. राजेश घाटोळे कार्यकारी अभियंता यांची अकोला येथे अधीक्षक अभियंता पदी नियुक्ती व बदली झाल्यामुळे त्या जागेवर संजय श्रृंगारे कार्यकारी अभियंता पदी रुजू झाले आहेत.

# सीसीएमपी पात्रता असलेल्या बीएचएमएस डॉक्टरांचा एमएमसी नोंदणीला विरोध; प्रशासनाकडे निवेदन

**अमरावती/का.प्र.**



सीसीएमपी पात्रता प्राप्त बीएचएमएस डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल एमएमसी मध्ये नोंदणी करून आधुनिक वैद्यक (Modern Medicine) करण्यास परवानगी देण्याच्या प्रस्तावाला विरोध करत संबंधित प्रशासनाकडे निवेदन सादर करण्यात आले आहे. या प्रस्तावामुळे रुग्णांच्या सुरक्षिततेसह आधुनिक वैद्यकीय शिक्षणाच्या दर्जावर गंभीर परिणाम होऊ शकतात, अशी भूमिका निवेदनात मांडण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, एक वर्षाचा सीसीएमपी अभ्यासक्रम हा MBBS अभ्यासक्रमाद्वारे मिळणाऱ्या व्यापक वैज्ञानिक आणि क्लिनिकल प्रशिक्षणाचा पर्याय ठरू शकत नाही.

त्यामुळे संपूर्ण MBBS शिक्षण व प्रशिक्षणाशिवाय आधुनिक वैद्यकाची परवानगी देणे हे रुग्ण सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते. तसेच पुराव्यावर आधारित वैद्यकीय सेवेचा दर्जा आणि विश्वासार्हतेवरही त्याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

एमएमसी मध्ये नोंदणी झाल्यास सीसीएमपी पात्रता असलेले बीएचएमएस डॉक्टर हे MBBS डॉक्टरांप्रमाणेच पात्र असल्याचा गैरसमज जनतेमध्ये निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, हा विषय सध्या मुंबई उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्याने अंतिम निर्णय होईपर्यंत कोणतीही अंमलबजावणी करू नये, अशी मागणी करण्यात आली आहे.

बीएचएमएस डॉक्टरांची नोंदणी आधीच महाराष्ट्र होमिओपॅथी परिषदेत असल्यामुळे महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये एमएमसी दुहेरी नोंदणीची आवश्यकता नसल्याचाही मुद्दा निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे.

प्रशासनाकडे करण्यात आलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये वैद्यकीय क्षेत्राने व्यक्त केलेल्या आक्षेपांची तातडीने दखल घेणे, हे निवेदन मुख्यमंत्री व संबंधित विभागांकडे पाठविणे, मुंबई उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय येईपर्यंत सीसीएमपी पात्रता असलेल्या बीएचएमएस डॉक्टरांची एमएमसी मधील नोंदणी स्थगित ठेवणे आणि आधुनिक वैद्यकीय शिक्षण व वैद्यकीय व्यवसायाचे उच्च मानदंड कायम राखण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणे यांचा समावेश आहे.

रुग्णांच्या सुरक्षिततेसह जनहित लक्षात घेऊन या विषयात तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## अतिवृष्टी बाधित नुकसानग्रस्तांना तात्काळ सानुग्रह अनुदान द्या

### मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे निवेदनातून मागणी

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**



ढगफुटीसदृश्य अतिवृष्टीमुळे नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर शेती, घरे, दुकाने व जनजीवनाचे नुकसान झाले आहे.

या पार्श्वभूमीवर सर्व नुकसानग्रस्तांना कोणताही भेदभाव न करता तात्काळ सानुग्रह अनुदान व आर्थिक मदत देण्यात यावी,अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (माकप) यांनी केली आहे.

माकपच्या वतीने मुख्यमंत्री यांना तहसीलदारांमार्फत निवेदन देण्यात आले. निवेदनात पूरग्रस्त व स्थलांतरित कुटुंबांना तातडीने रू१०,००० सानुग्रह अनुदान देण्यात यावे,सानुग्रह मदतीसाठी घर ४८ तास पाण्यात बुडालेले असण्याची अट शिथिल करावी,प्रत्यक्ष नुकसान झालेल्या सर्व कुटुंबांना मदतीच्या कक्षेत समाविष्ट करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच पूर्णतः व अंशतः नुकसान झालेली घरे,झोपड्या, घरगुती साहित्य, नदीकाठावरील खरडून गेलेली शेती तसेच शेतकरी, मच्छीमार, दुकानदार, कामगार, हस्तकला कारागीर आणि इतर सर्व पूरग्रस्तांना विशेष आर्थिक सहाय्य द्यावे,अशीही मागणी करण्यात आली पंचनामे युद्धपातळीवर पूर्ण करून नुकसानभरपाईची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करावी, जेणेकरून पूरग्रस्तांना तातडीचा दिलासा मिळेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदन देतेवेळी माकप तालुका सचिव शाम शिंदे, दिलीप महहले, अशोक केसरखाने, गणेश बरगट, तुळशीराम जेठे, शाकीर भाई, गजानन कांबळे, प्रभाकर खडसे, राजेंद्र राऊत, दीपक अंबाडरे, यांचे सह आदी उपस्थित होते.

## शालेय पोषण आहार योजनेतील त्रुटी दूर करा

### प्राथमिक शिक्षक समितीची शासनाकडे मागणी

**अमरावती/का.प्र.**



राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांमध्ये राबविण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहार (मध्यान्ह भोजन) योजनेच्या अंमलबजावणीत अनेक मूलभूत अडचणी असून, त्या तातडीने दूर कराव्यात तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध करून न देता मुख्याध्यापक व शिक्षकांवर कारवाई करू नये, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने राज्य शासनाकडे केली आहे.

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अतिरिक्त मुख्य सचिव रणजितसिंह देओल, उपसचिव तुषार महाजन, राज्य आयुक्त (शिक्षण) सचिंद्र प्रतापसिंह आणि प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांना समितीने निवेदन सादर केले आहे.समितीने निवेदनात नमूद केले आहे की,अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाने शालेय पोषण आहार योजनेची कठोर तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. शिक्षक समितीने शासनाकडे शाळांना सुरक्षित धान्य साठवणूक, स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वयंपाकघरातील आवश्यक साहित्य, स्वच्छता साधने, FSSAI परवान्यासाठी मार्गदर्शन, आवश्यक निधी आणि पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाकडून होणाऱ्या तपासणीपूर्वी शाळांमधील प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेऊन मुख्याध्यापक व शिक्षकांना संरक्षण द्यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.समितीचे राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर आणि राज्याध्यक्ष विजय कोंबे यांच्या स्वाक्षरीने हे निवेदन शासनाला पाठविण्यात आले असून, संबंधित अधिकाऱ्यांनाही प्रती पाठविण्यात आल्या आहेत.

## विकास विद्यालयमध्ये लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक विलास नगर स्थित विकास विद्यालयामध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहामध्ये झाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विकास विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा मेश्राम उपस्थित होत्या, प्रमुख अतिथी म्हणून देशमुख, पी.आर.पाटील शिक्षण महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ.धर्माळे, शिक्षक डी.एस.चव्हाण विचार मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रास्ताविक डॉ. संदीप जुनघरे यांनी विशद केली.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी प्राध्यापिका डॉ. धर्माळे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व बाळ टिळक यांच्या जीवनातील वेचक प्रसंग सांगितले. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी देशमुख यांनी महामानवांच्या जीवनाची शैक्षणिक सुरुवात व त्यांनी केलेल्या सामाजिक कार्य याविषयी उपस्थित विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मेश्राम यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणांमधून उपस्थित विद्यार्थ्यांना लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांनी केलेले विस्तृत लेखन त्यांनी लिहिलेल्या विविध कादंबऱ्या, पुस्तके,




पोवाडे, गवळणी तसेच यांच्या जीवनाविषयी सविस्तर माहिती सांगितली. कार्यक्रमाचे संचालन प्रवीण भागवत व कल्याणी काळे यांनी केले. यावेळी मनीष सोनवाल, दिनेश निंगोट, अनिल बडगे, अजय बिजवे, निकिता शिरभाते, रक्षा कैथवास,शिवानी देशमुख, त्रिवेणी तारेकर, केशव पाटमोरे, नितेश बांबल, सुरज मुरमुरे, शुभम गवळी, मीना सरवटे, प्रफुल्ल सदांशिवे उपस्थित होते. कार्यक्रमाकरिता विद्यालयातील सर्व विद्यार्थी पालक व परिसरातील गणमान्य व्यक्ती मोठ्या संख्येत उपस्थित होते.

## चोर आले' अफवांवर विश्वास ठेवू नका शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांची जनजागृती बैठक'

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

गेल्या काही दिवसांपासून ग्रामीण भागात 'चोर आले... चोर आले...' अशा अफवा सोशल मीडियावर आणि व्हॉट्सअप या माध्यमातून पसरवल्या जात असल्याच्या पार्श्वभूमीवर वलगाव पोलीस स्टेशनतर्फे जनजागृती व समन्वय बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत पोलीस स्टेशन हद्दीतील पोलीस पाटील, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, शांतता समितीचे सदस्य, ग्राम सुरक्षा दलाचे सदस्य, महिला प्रतिनिधी तसेच विविध गावांतील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत गावामध्ये शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक रिता उईके यांनी नागरिकांना संबोधित करताना सांगितले की, कोणतीही संशयास्पद व्यक्ती अथवा हालचाल आढळल्यास स्वतः कायदा हातात न घेता तात्काळ वलगाव पोलीस स्टेशन किंवा डायल ११२ वर संपर्क साधावा. अफवा पसरविणे अथवा खोटी माहिती प्रसारित करणे हा कायद्याने दंडनीय गुन्हा असून अशा प्रकारांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

बैठकीत सहायक पोलीस निरीक्षक (API) अशोक शिर्के यांनीही मार्गदर्शन करून ग्रामपातळीवर सतर्कता वाढविणे, ग्राम सुरक्षा दल सक्रिय ठेवणे आणि पोलिसांशी सातत्याने संपर्क ठेवण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमाचे समन्वयन पोलीस हेड कॉन्स्टेबल निलेश मधुकरराव घाटे यांनी केले. उपस्थितांनीही गावांमध्ये अफवा रोखण्यासाठी जनजागृती करण्यास तसेच पोलिसांना सहकार्य करण्याची ग्वाही दिली. यावेळी पोलिसांनी नागरिकांना 'अफवांवर नाही, तर सत्य माहितीवर विश्वास ठेवा','अफवा थांबवा, सुरक्षित समाज घडवा' हा संदेश देत सुरक्षित वलगाव आणि सुरक्षित समाज निर्माण करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे सहकार्य करण्याचे आवाहन केले.

## भारत स्वाभिमान ट्रस्ट आणि पतंजली परिवारातर्फे गुरुपौर्णिमा उत्सव

**अमरावती/का.प्र.**

भारत स्वाभिमान ट्रस्ट आणि पतंजली परिवाराच्या पाच संघटनांच्या संयुक्त विद्यमाने, अमरावती येथील अयोध्या कॉलनीतील हनुमान मंदिरात भक्ती, श्रद्धा आणि योगाच्या वातावरणात गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने योग साधक, कार्यकर्ते आणि भक्त सहभागी झाले हो

कार्यक्रमाची सुरुवात गुरुपूजेने झाली. याप्रसंगी, दैनंदिन योग वर्गाच्या संचालिका कल्पना उल्हे यांनी भारतीय संस्कृतीतील गुरूंच्या महत्त्वावर प्रकाश टाकत सांगितले की, गुरू हे असे आहेत जे जीवनाला योग्य दिशा देतात, ज्ञान, मूल्ये आणि आत्म-साक्षात्काराची प्रेरणा देतात.

या कार्यक्रमात, भारत स्वाभिमान जिल्हा प्रभारी योगेश राठी यांनी पतंजली योगपीठाद्वारे,



हरिद्वार येथे राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी आणि राष्ट्रउभारणी उपक्रमांविषयी सविस्तर माहिती दिली.

किसान सेवा समितीचे जिल्हा प्रभारी रतिलालजी सातपुते, संघटन मंत्री हरिहरजी गिलोरकर, युवा भारत राज्य प्रभारी अक्षयजी धनोरकर, सुधीरजी आस्तकार यांनी गुरुतत्त्वाचे महत्त्व स्पष्ट केले.

तसेच, हा कार्यक्रम यशस्वी करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानले. पतंजली परिवाराच्या अधिकारी डॉ. वंदन पराटे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन आणि समन्वय केले.जिल्हा प्रभारी अशोकजी बेंडे, नरेंद्रजी गावंडे, भीमरावजी सांगोळे उपस्थित होते.कार्यक्रमास प्रामुख्याने नेहा काकपुरे,संजय काकपुरे,मीनाक्षी कोरडे, मृणाल घाटेकर, कांता वाकोडे,स्वाती मंडापुरे,वंदना रोडे, कल्पना बोके, ममता निंभोरकर, प्रीती बजाज,संगीता टवलारे,जोत्ना पाटील,वर्षा बंड,वर्षा बंड,वर्षा बंड,ऋषी पाटील आदींची उपस्थिती होती. शिरभाते, आणि इतर योग शिक्षक आणि अयोध्या कॉलनीतील योगप्रेमी. कार्यक्रम यशस्वी झाला.

## महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात करिअर कट्टा सत्र प्रेरण कार्यक्रम

**अमरावती/का.प्र.**



अस्मिता शिक्षण मंडळ, अमरावती द्वारा संचालित स्थानिक महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयामध्ये महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दूरदृश्यप्रणालीद्वारा करिअर कट्टा सत्र प्रेरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून IQAC समन्वयक प्रा.डॉ. जगदीश बावणे तसेच महाविद्यालयाचे करिअर कट्टा समन्वयक प्रा.डॉ. सुशांत ठोके उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामधून डॉ. सुशांत ठोके यांनी महाविद्यालयामध्ये करिअर कट्टा स्थापनेमागील भूमिका विशद केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.जगदीश बावणे यांनी महाविद्यालयीन तरुणांनी करिअर कट्टाच्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होऊन केवळ सरकारी नोकरीवर अवलंबून न राहता उद्योगधंद्याकडे वळावे असे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

या कार्यक्रमाचे संचालन व आभार करिअर कट्टा प्रशासन मंत्री उर्वशी अंभोरे,बी.कॉम.भाग २ हिने केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील करियर कट्टा संसदेचे सर्व मंत्रिमंडळ, महाविद्यालयाचा प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी बांधव तसेच बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# जन्म-मृत्यू नोंदणीची प्रक्रिया सात दिवसांत पूर्ण करा

## प्रमाणपत्रांचे तातडीने वितरण करा-श्रीचंद तेजवानी

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी यांनी ५ ऑगस्ट रोजी स्व.सुदामकाका देशमुख सभागृहात महानगरपालिकेच्या जन्म-मृत्यू विभागाचा आढावा घेत विभागाच्या दैनंदिन कामकाजाची, प्रलंबित प्रकरणांची तसेच नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांची माहिती जाणून घेतली. यावेळी जन्म-मृत्यू नोंदणीची प्रक्रिया अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्यावर भर देत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

बैठकीदरम्यान महापौरांनी जन्म व मृत्यू नोंदणीची प्रक्रिया निश्चित कालमर्यादेत पूर्ण होणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. प्रत्येक अर्जाची पडताळणी करून संबंधित जन्म किंवा मृत्यू नोंदणी सात दिवसांच्या आत पूर्ण करण्यासाठी नियोजनबद्ध कार्यवाही करण्यात यावी,असे त्यांनी स्पष्ट निर्देश दिले. तसेच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना जन्म अथवा मृत्यू प्रमाणपत्रासाठी कार्यालयाच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागू नयेत, यासाठी प्रमाणपत्रांचे तातडीने वितरण करण्यात यावे, असेही त्यांनी सांगितले.

महापौर श्रीचंद तेजवानी म्हणाले की,



जन्म आणि मृत्यू नोंदणी ही नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची सेवा आहे. शासकीय योजना, शैक्षणिक प्रवेश, वारसाहक्क, बँकिंग, विमा तसेच इतर अनेक प्रशासकीय कामांसाठी जन्म व मृत्यू प्रमाणपत्रांची आवश्यकता असते. त्यामुळे या प्रक्रियेत होणारा कोणताही विलंब नागरिकांसाठी अडचणीचा ठरू शकतो. म्हणून संबंधित विभागाने प्रत्येक अर्जाकडे गांभीर्याने पाहून वेळेत नोंदणी पूर्ण करण्यास प्राधान्य द्यावे

महापौरांनी विभागातील अभिलेख व्यवस्थापन, डिजिटल नोंदणी, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया तसेच प्रमाणपत्र वितरण प्रणालीबाबतही माहिती घेतली. नागरिकांना अधिकाधिक ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना योग्य मार्गदर्शन मिळावे, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. सेवा वितरणात कोणतीही दिरंगाई होऊ नये तसेच नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यात यावे, यावर त्यांनी विशेष भर दिला.

याशिवाय, विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करून शासनाने निर्धारित केलेल्या नियमांचे काटेकोर पालन करावे, कामकाजात पारदर्शकता राखावी आणि नागरिकांना गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा, असे आवाहनही महापौरांनी केल

या बैठकीत सभागृह नेता चेतन गावंडे, शहर सुधार समिती सभापती राधा कुरील, राजु कुरील, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त भाग्यश्री बोरेकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रतिभा आत्राम, जन्म-मृत्यु विभागातील कर्मचारी उपस्थित होते.

## जि.प. शिक्षक बदली घोटाळा

# ३३ बोगस शिक्षक निलंबित; आता 'मास्टरमाईंड'वर कारवाईची मागणी

### १२ महिन्यांच्या कायदेशीर पाठपुराव्याला यश; शिक्षण विभागातील 'सिंडिकेट'वर चौफेर प्रश्नचिन्ह

### -प्रेस नोटमधून श्रेय लाटण्याचा प्रयत्न? चौकशीसमोर मूळ कागदपत्रेच न ठेवल्याचा आरोप

**अकोला** : अकोला जिल्हा परिषदेच्या २०२५-२६ च्या आंतरजिल्हा शिक्षक बदली प्रक्रियेत उघडकीस आलेल्या कथित गैरव्यवहाराने अखेर मोठे प्रशासकीय वळण घेतले आहे. संवर्ग-१ आणि संवर्ग-२ मधील बदल्यांसाठी कथितरीत्या बनावट दिव्यांग प्रमाणपत्रे, बोगस यूडीआयडी कार्ड, खोटे अंतराचे दाखले तसेच बनावट घटस्फोट व परित्यक्ता प्रमाणपत्रांचा वापर केल्याचा आरोप असलेल्या ३३ शिक्षकांना निलंबित करण्यात आले असून ६५ शिक्षकांची वेतनवाढ रोखण्याची कारवाई करण्यात आली आहे. मात्र, या कारवाईनंतर आता संपूर्ण प्रकरणाचा केंद्रबिंदू बदलला असून, या कथित घोटाळ्यामागील प्रशासकीय जबाबदारी निश्चित होणार का? हा प्रश्न अधिक तीव्र झाला आहे.

गेल्या बारा (पान २ वर)

### ■ एसआयटी स्थापन करून गुन्हे दाखल करण्याची मागणी-

मुख्य तक्रारदार गणेश गजाननराव कुरई यांनी या संपूर्ण प्रकरणी पोलीस अधीक्षकांकडे सुधारित महाफौजदारी तक्रार दाखल केल्याचा दावा केला आहे. या तक्रारीत विशेष तपास पथक स्थापन करून संपूर्ण शिक्षक बदली प्रकरणाची सखोल चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, बीएनएस, माहिती तंत्रज्ञान कायदा आणि इतर लागू कायद्यांनुसार संबंधित शिक्षणाधिकारी, तत्कालीन वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, बदली प्रक्रियेशी संबंधित आयटी कंपनी तसेच दोषी शिक्षकांविरुद्ध गुन्हे नोंदवून फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. या मागणीवर प्रशासन आणि पोलीस यंत्रणा पुढे कोणती भूमिका घेते, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### बच्चू कडू यांच्या आक्रमक पाठपुराव्याला मोठे यश

# शेळया-मेंढ्यांसह पशुधन विमा योजना पुन्हा सुरू

### वन चराईबाबत दोन दिवसांत जीआरचे आश्वासन

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील मेंढपाळ समाजाच्या प्रश्नांसाठी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने संघर्ष करणारे विधान परिषदेचे सदस्य आमदार बच्चू कडू यांच्या आक्रमक, अभ्यासपूर्ण व सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. पशुसंवर्धन विभागाने शेळ्या, मेंढ्यांसह पशुधन विमा योजना पुन्हा सुरू करण्याचा निर्णय जाहीर केला असून, वन चराईच्या प्रश्नावरही शासनाने सकारात्मक भूमिका घेत पुढील दोन दिवसांत शासन निर्णय (जीआर) काढण्याचे आश्वासन दिले आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो मेंढपाळ कुटुंबांना मोठा दिलासा



मिळणार आहे.

मेंढपाळ समाजाच्या प्रश्नांवर आमदार बच्चू कडू यांनी केवळ विधान परिषदेतच नव्हे तर रस्त्यावर उतरूनही सातत्याने लढा उभारला. वाडा आंदोलन, 'सातबारा कोरा' आंदोलन, 'कोरा यात्रा', अन्नत्याग आंदोलन, अधिवेशनातील आंदोलने तसेच राज्यभर उभारलेल्या विविध संघर्षांमधून त्यांनी मेंढपाळ समाजाच्या प्रश्नांना शासनासमोर प्रभावीपणे मांडले. विधान परिषदेत अनेकदा सरकारला धारेवर धरत त्यांनी वन चराई, पशुधन विमा, पारंपरिक चराई हक्क, वन विभागाकडून होणारी कारवाई आणि मेंढपाळांच्या मूलभूत (पान २ वर)

# ग्रँड विदर्भ-स्तरीय सायकलिंग स्पर्धा रविवारी

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती सायकलींग असोसिएशन, दिशा ऑर्गनायझेशन आणि डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन च्या सहकार्याने रविवार ९ ऑगस्ट रोजी ग्रँड विदर्भ-स्तरीय सायकलिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा सकाळी ६:३० ते १०:३० या वेळेत अंजनगाव बारी परिसरातील राम मेघे अभियांत्रिकी महाविद्यालय परिसरातून सुरू होणार



### ४०० पेक्षा अधिक खेळाडू होणार सहभागी

### सायकलिंग असोसिएशनचा उपक्रम

असल्याची माहिती आज गुरुवार ६ ऑगस्ट रोजी पत्रकार परिषदेमध्ये आयोजकांनी दिली. त्यांनी सांगितले की स्पर्धेसाठी विदर्भातील विविध जिल्ह्यांमधून ४०० हून अधिक खेळाडूंनी नोंदणी केली आहे. ही स्पर्धा शालेय स्तरापासून मोठ्यांपर्यंत सर्व वयो गटांसाठी खुली आहे. प्रत्येक गटात (पान २ वर)

# मुथूट फिनकॉर्पच्या गोल्ड लोनमध्ये मोठा गैरव्यवहार उघड

### शाखा व्यवस्थापकाला अटक, कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील मुथूट फिनकॉर्पच्या शाखेत गोल्ड लोनच्या नावाखाली मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ग्राहकांनी तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांमध्ये कोट्यावधीचा अपहार केल्याप्रकरणी शाखा व्यवस्थापकासह संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी शाखा व्यवस्थापकाला अटक केली



आहे. इतर संबंधित कर्मचाऱ्यांच्या भूमिकेचाही तपास सुरू आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोग्य विस्तार अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या एका महिलेने २०२१ मध्ये वैयक्तिक गरजेसाठी मुथूट फिनकॉर्पकडून गोल्ड लोन घेतले होते. त्यासाठी त्यांनी ५८.०८ ग्रॅम सोन्याचे दागिने तारण ठेवून ५ लाख ९४ हजार ५८२ रुपयांचे कर्ज घेतले होते.

३१ मार्च २०२६ रोजी संबंधित महिलेने कर्जाची थकबाकी फेडण्यासाठी ४ लाख ९९ हजार रुपये रोख बँकेत जमा केले. मात्र, सुरुवातीला तांत्रिक अडचणीचे कारण देत अधिकृत पावती किंवा मोबाईल संदेश देण्यात आला नाही. नंतर आग्रह धरल्यानंतर (पान २ वर)

# मोर्शीत घरफोडी उघड : २४ तासांत दोन आरोपी जेरबंद

### ५.३० लाखांचा मुद्देमाल जप्त

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी पोलिसांनी घरफोडीच्या गुन्ह्याचा अवघ्या २४ तासांत छडा लावत दोन आरोपींना अटक केली असून त्यांच्या ताब्यातून चोरीतील रोकड, सोन्याचे दागिने आणि गुन्ह्यात वापरलेली चारचाकी असा ५ लाख ३० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पिंपळखुटा येथील सिताराम पुनाजी भानगे (वय ६०) यांनी ४ ऑगस्ट रोजी मोर्शी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यांनी घर बांधण्यासाठी आठ बकऱ्या विकून



मिळालेले ९० हजार रुपये, पत्नीचे १० हजार रुपयांचे मंगळसूत्र आणि महत्त्वाची कागदपत्रे लोखंडी संदुकात ठेवली होती. सकाळी बकऱ्या चारण्यासाठी (पान २ वर)

# घातक शस्त्रांसह तरुण जेरबंद

### गुन्हे शाखेची धडक कारवाई

अमरावती/प्रतिनिधीः- शहरात अवैधरित्या घातक शस्त्रे बाळगून दहशत निर्माण करणाऱ्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत अमरावती शहर गुन्हे शाखेने गुरुवारी एका तरुणाला दोन धारदार चाकूंसह ताब्यात घेतले. आरोपीविरुद्ध खोलापुरी गेट पोलिस ठाण्यात आर्म अॅक्ट आणि महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या निर्देशानुसार गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली. गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार गडगडेश्वर मंदिरासमोर एक इसम संशयास्पदरीत्या उभा असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत संबंधित तरुणाला (पान २ वर)

# भाजप पश्चिम विदर्भ विभागीय संघटना समीक्षा बैठक संपन्न



### -राष्ट्रीय सह-संघटन महामंत्री शिवप्रकाश यांची उपस्थिती

अमरावती/प्रतिनिधीः- पश्चिम विदर्भ विभागातील भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक बळकटीसाठी आयोजित विभागीय संघटना समीक्षा बैठक भाजपचे राष्ट्रीय सह-संघटन महामंत्री शिवप्रकाशजी यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली उत्साहपूर्ण (पान २ वर)

# शाळेबाहेरून भरदिवसा सात लाखांची कार चोरी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाहनचोरांचा धुमाकूळ सुरूच असून, भरदिवसा शाळेबाहेर उभी असलेली सुमारे ७ लाख रुपये किमतीची किया सेल्टोस कार अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली. या घटनेमुळे वाहनधारकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शंकर महेशकुमार आहुजा (वय ३९, रा. रामपुरी कॅम्प, गल्ली क्र. २) यांनी ३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी सुमारे ९ वाजता आपली क्लिअर व्हाईट रंगाची किया सेल्टोस डी १.५ एमटी (क्रमांक एमएच-२७-डीयू-४७७२) ही कार पत्रकार कॉलनीतील विद्या भारती विद्यालयाच्या (पान २ वर)

# करजगावात गोवंश तस्करीवर शिरजगाव पोलिसांची धाड

### पाच आरोपींविरुद्ध गुन्हे, ९.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** ग्रामीण पोलिसांनी गोवंश तस्करी व अवैध कत्तलीविरोधात मोठी कारवाई करत चांदूर बाजार तालुक्यातील करजगाव येथे पाच आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. या कारवाईत ४२ गोवंश जनावरे, २३० किलो गोमांस व कत्तलीसाठी वापरलेले साहित्य असा एकूण ९ लाख २५ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणातील



काही आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत शिरजगाव कसबा पोलिसांनी ४ ऑगस्ट रोजी सकाळी करजगाव येथील कुरेशी मोहल्ल्यात गोपनीय माहितीच्या आधारे छापेमारी केली. छाप्यात विविध ठिकाणी केलेल्या कारवाईत शेख फिरोज अब्दुल अजीज, शेख दानिश शेख मुश्ताक (पान २ वर)

# विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे कराटे प्रशिक्षण

### अमरावती शहर पोलिसांचा पुढाकार

**अमरावती/प्रतिनिधीः-** शालेय विद्यार्थिनी व महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अमरावती शहर पोलिसांनी आयोजित केलेले तीन दिवसीय स्वसंरक्षण कराटे प्रशिक्षण शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरामध्ये शहरातील विविध शाळांमधील ९७० विद्यार्थिनी व शिक्षकांनी सहभाग घेत स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण घेतले.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या संकल्पनेतून तसेच पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके (परिमंडळ-१), श्याम घुगे (परिमंडळ-२) आणि प्राजंली सोनवणे (मुख्यालय) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस आयुक्तालय अमरावती शहरातर्फे



हा उपक्रम राबविण्यात आला.

शहरातील शालेय विद्यार्थिनी व महिलांवरील वाढत्या अप्रिय घटनांच्या पार्श्वभूमीवर अचानक उद्भवणाऱ्या संकटाच्या प्रसंगी पोलीस किंवा इतरांची मदत मिळण्यापूर्वी स्वतःचा बचाव करता यावा, या उद्देशाने ४ ते ६ ऑगस्ट २०२६ दरम्यान पोलीस (पान २ वर)

# अस्वच्छतेचा कळस, रोशनी हॉटेलचा परवाना निलंबित

### एफडीएची कारवाई; त्रुटी दूर होईपर्यंत हॉटेल-रिफ्रेशमेंट बंद

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील पंचवटी चौकाजवळील नागपूर रोडवरील प्रसिद्ध रोशनी हॉटेल आणि रोशनी रिफ्रेशमेंट यांच्यावर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) गुरुवारी सकाळी धडक कारवाई करत दोन्ही प्रतिष्ठानांचे अन्न व्यवसाय परवाने तात्पुरते निलंबित केले. तपासणीदरम्यान किचनमध्ये गंभीर अस्वच्छता, स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन आणि अन्न




सुरक्षा निकषांची पायमल्ली उघड झाल्याने (पान २ वर)

# CCMP विरोधात IMA अमरावतीचा भव्य मोर्चा

**अमरावती/प्रतिनिधीः-** BHMS डॉक्टरांसाठी CCMP प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केलेल्यांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल MMC मध्ये नोंदणी करू नये या मागणीसाठी IMA अमरावतीच्या वतीने आज इरविन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय असा भव्य मोर्चा काढण्यात आला.

आज सकाळी ११ वाजता इरविन चौक, गर्ल्स हायस्कूल चौक येथून सुरू झालेला मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. मोर्चात IMA अमरावतीचे अध्यक्ष डॉ. दिनेश वाघाडे, सचिव डॉ. विक्रम वानखेडे, National IMA Joint Secretary डॉ. वसंत लुंगे यांच्यासह ८००+ डॉक्टर सहभागी



झाले होते. मोर्चाच्या शेवटी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

IMA ने निवेदनात म्हटले की CCMP हा (पान २ वर)

# उच्च न्यायालयाच्या आवाहनानंतर आयएमएचे सेवा बंद आंदोलन मागे

### CCMP नोंदणीविरोधातील लढा सुरूच राहणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** मुंबई उच्च न्यायालयाने घेतलेल्या स्वतःहून (Suo Motu) दखल आणि प्रभारी मुख्य न्यायमूर्तींनी केलेल्या आवाहनाचा आदर राखत इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) महाराष्ट्र राज्य शाखेने आपले 'सेवा बंद' आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे.

आयएमए महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी, राज्य सचिव डॉ. विक्रांत देसाई आणि राज्य खजिनदार डॉ. अमोल गिते यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.

न्यायालयाने महाराष्ट्र शासनाला ३ ऑगस्ट २०२६ च्या शासन निर्णयाची तत्काळ आणि पूर्ण अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, (पान २ वर)